# माणूस

शनिवार ५ मे १९७९
७५ पैसे

# कापड गिरणी कामगार संपाचा गर्भपात कोणी केला? कसा झाला?

अमळथा प्रकरण
(उत्तरार्ध)

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक एकुणपन्नासावा

५ मे १९७९

मूल्य ७५ पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

◻

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

◻



प्रकाशित लेख चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

◻

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

◻

मुखपृष्ठ : माधव फळणीकर


## सप्रेम नमस्कार

◻ माणूस (१४ एप्रिल १९७९) मधील हिंदुस्थान अँटिबायोटिक्स रौप्यमहोत्सवानिमित्त खास लेखाबद्दल आपले अभिनंदन. सामान्य नागरिक सरकारला जे कर भरतात, त्यांचा काही भाग हिंदुस्थान अँटिबायोटिक्ससारख्या कारखान्यात भांडवल म्हणून वापरला जातो. या पैशाचा विनियोग कशा प्रकारे होतो, हे सामान्य नागरिकांना 'माणूस'-सारख्या नियतकालिकांमधूनच समजते.

प्रचंड भांडवलगुंतवणूक करून उशिरा फलदायी होणाऱ्या कारखान्यात खाजगी भांडवलदारांना रस नसतो म्हणून सरकारलाच असे कारखाने सुरू करणे आवश्यक असते आणि त्यांना स्वायत्तता मिळावी म्हणून असे कारखाने सार्वजनिक क्षेत्रात काढले जातात.

कारखाना फायद्यात चालविण्याची जी क्षमता आणि जिद्द खाजगी क्षेत्रातील संचालकांकडे असते, तिचा अभाव सार्वजनिक क्षेत्रात आढळतो. आपल्या लेखात सांगितल्याप्रमाणे अशा कारखान्यात नवीन कार्यकारी संचालक आले की, नवी विट्टी नवे राज्य सुरू होते. खाजगीत बोलताना आधीच्या उच्चपदस्थांवर दोष टाकला जातो. नाचता येईना अंगण वाकडे, या न्यायाने कामगारांवर अपयशाचे किंवा तोट्याचे खापर फोडले जाते. सार्वजनिक क्षेत्रातील बहुतेक कारखान्यांचे उच्चपदस्थ संस्थानिकांच्या इतमानाने वावरतात. कारखान्याशी संबंधित असलेल्या विषयाचे अज्ञान, मनात पक्के रुजलेले गैरसमज, छांदिष्टपणा, पुतणेगिरी, अचूक आणि ठाम निर्णय घेण्याची अपात्रता यासारख्या कोणत्याही एकामुळे अशा कारखान्यांचे मॅनेजिंग डायरेक्टर हाताखालच्या अधिकाऱ्यांना आणि कामगारांना खरोखरचे डायरेक्शन (दिग्दर्शन) करू शकत नाहीत. वैयक्तिक असमर्थतेची किंवा अपात्रतेची मनोमन खात्री नीट झाली की, मग येथील उच्चपदस्थ स्वार्थ साधण्याच्या मागे लागतात. कारखान्यासंबंधीच्या कोणत्याही प्रश्नाच्या मुळाशी जाऊन तो सोडवण्याऐवजी वरवर रंगसफेदी किंवा तात्पुरती मलमपट्टी करण्याकडे प्रवृत्ती या उच्चपदस्थांत निर्माण होते. कनिष्ठ कामगाराने एक रुपयाचा गैरव्यवहार किंवा नुकसानी केली तर त्याच्यामागे खातेनिहाय चौकशीचा भुंगा लावते. प्रसंगी त्याला नामुष्कीने नोकरीसुद्धा सोडायला सांगितले जाते. कारखान्याचे लक्षावधी किंवा कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणारे निर्णय जे उच्चपदस्थ घेतात, त्यांच्यावर मात्र या चुकांचे उत्तरदायित्व व्यक्तिशः टाकले जात नाही, हा करदात्यांवर होणारा क्रूर अन्याय आहे. नुकताच हिंदुस्थान अँटिबायोटिक्समध्ये दहा दिवसांचा संप झाला. खोपोलीमध्ये काही वर्षांपूर्वी खोपडीने अनेकजण मरण पावले होते. त्या खोपडीचे बेकायदेशीर उत्पादनात वापरलेले मिथिनॉल नावाचे औषध पिंपरी येथून चोरलेले होते, असे वर्तमानपत्रांत येत होते आणि या चोरीच्या संदर्भात तीन कामगारांना काढून टाकले, म्हणून हा संप झाला होता. या तथाकथित चोरीला सदरहू तीन कामगारांचे पर्यवेक्षक, खातेप्रमुख, सुरक्षा विभागाचे प्रमुख आणि सुरक्षा कर्मचारी कोणत्याच प्रमाणात जबाबदार नाहीत काय? ऑर्गनिझेशनल स्ट्रक्चरमध्ये कनिष्ठ पातळीवर चोरीसारखा गैरप्रकार चालतो आणि दीर्घकाळपर्यंत तो उच्चपदस्थांना समजतसुद्धा नाही, हे काय गौडबंगाल आहे? श्री. चारी यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थान अँटिबायोटिक्सला प्रचंड नुकसान झाले; पण ते सहीसलामत युनोच्या ऑफिसमध्ये जाऊन बसले, हे आपण दिलेले उदाहरण या दृष्टीने बोलके आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील गैरकारभारात ज्यांचा हातभार लागतो, ते लोक करदात्यांच्या मनात संभ्रम निर्माण करण्यासाठी डोकेबाजपणे युक्तिवाद करतात. आपणही अशा युक्तिवादाला बळी पडला आहात हे पाहून मात्र सखेद आश्चर्य वाटले. सर्वसाधारणपणे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग त्यातील अंगभूत दोषांमुळे तोट्यात चालतात. त्या दोषांचा कमीत कमी परिणाम व्हावा

असे निर्णय (उच्चपदस्थांनी) घ्यायला पाहिजेत, असे आपण लिहिता. खाजगी क्षेत्रातील (औषधी) कारखान्यांशी सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांची तुलना करणे योग्य नाही, असेही आपण लिहिले आहे. दारुगोळ्याचा कारखाना, रेल्वे आणि पोस्टखात्यासारखे या कारखान्यांचे सरकारी खाते असे स्वरूप न ठेवता, त्यांना पूर्ण स्वायत्तता दिलेली आहे. तो त्यांनी ना नफा ना तोटा या तत्त्वावर व्यवहार करावेत, म्हणून हा मूलभूत मुद्दा आपण का दुर्लक्षित करावा ?

खाजगी क्षेत्रातील उच्चपदस्थांचे पगार गोठविण्याचा दुर्दैवी निर्णय जनता सरकारने कार्यवाहीत आणला आहे; पण राजकारणी लोक एखाद्या गोष्टीकडे सोयिस्करपणे कसा कानाडोळा करतात, त्याचेच हे उदाहरण आहे. खाजगी क्षेत्रातील उच्चपदस्थ भरमसाठ पगार, सोयी-सवलती उपभोगतात, हे खरे आहे; पण हेच लोक त्यांच्या कंपनीला नफा मिळवून देतात. कंपनीच्या असंख्य भागधारकांना (ज्यांच्यापैकी बहुतेक मध्यमवर्गी असतात) शेअरवर नफा मिळेल अशी खात्री असते ती याच उच्चपदस्थांमुळे. या सत्यस्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही.

हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या बाबतीत काय स्थिती आहे याची दोन उदाहरणे येणेप्रमाणे आहेत. भविष्यकाळात डॉक्टर कोणत्या औषधांची रोगनिवारणासाठी निवड करतील, (Selection of new drugs in future) यासंबंधीचा परिसंवाद या कंपनीने खूप थाटमाट आणि खर्च करून आखला होता. ज्या कंपनीला पेनिसिलिन आणि स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनात सातत्य टिकवता येत नाही, ज्या कंपनीला हेमायसिन, अँपिसिलिन, ऑरोफंगिन या उत्पादनात अपयश येते, ती कंपनी अशा तऱ्हेच्या परिसंवादातून काय साधते ? परिसंवादाच्या चर्चेचे निष्कर्ष कंपनीच्या किती आणि कसे उपयोगाचे आहेत ? याचा हिशेब कोण देणार आहे ? दुसरे उदाहरण आहे कुप्रवाही द्रवांचे बाबतीतले. (Problems of pumping of viscious fluids) कंपनीने भरविलेल्या परिसंवादाचा सदर विषय हा सर्वस्वी केमिकल इंजिनियरिंगसंबंधीचा आहे. औषधी कारखान्यांशीही या विषयाचा फार घनिष्ठ संबंध आहे असे नव्हे; कारखान्यातील उच्चपदस्थ केमिकल इंजिनियरिंग विषयाचे पदवीधर आहेत. (फॉर्माकॉलॉजी, फार्मसी या विषयाचे नाहीत.) त्यांची प्रतिमा पुणे परिसरात उजळ करण्यासाठी हा खटाटोप आहे, असा कोणी निष्कर्ष काढला तर तो चूक आहे काय ?

उच्चपदस्थांच्या अनियंत्रित वागण्यामुळे सरकारी क्षेत्रातील कारखाने म्हणजे तळ नसलेल्या विहिरी झाल्या आहेत. केंद्र सरकार किंवा अन्य कोणीही कितीही कर्जपुरवठा केला तरी तो अशा कारखान्यांना अपुराच पडत आलेला आहे. पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी सार्वजनिक क्षेत्रातील उच्चपदस्थांना, नफा कमवून दाखवा नाही तर जागा खाली करा, हा दिलेला इशारा म्हणूनच अभिनंदनीय आहे. सार्वजनिक क्षेत्रामुळे देशाचा, आम जनतेचा फायदा होतो, अशी जाहिरात केली जाते; पण प्रत्यक्षात फायदा होत असतो लक्षावधी करदात्यांच्या पैशांशी अनियंत्रितपणे वागून, ब्युरो ऑफ पब्लिक अंडरटेकिंगची मार्गदर्शक सूत्रे धाब्यावर बसवून स्वार्थ साधणाऱ्या उच्चपदस्थांचा. आपण सदरहू लेखात लिहिता की, हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या जेंटामायसिनच्या उत्पादनाबरोबर खाजगी क्षेत्रातील उत्पादकांनी किंमती कमी केल्या आणि त्यामुळे समाजाचा फायदा झाला आहे. अशा तऱ्हेने किंमती कमी झाल्या हे सत्य आहे; पण हा अल्पकालिक परिणाम आहे की दीर्घकालिक परिणाम आहे ? पंचवीस वर्षांच्या कारकीर्दीत हिंदुस्थान अँटिबायोटिक्सने कोणत्या उत्पादनांबाबतीत सातत्य दाखवले आहे ? ( कारणे काहीही असोत ) पण आपणच वर्णन केल्याप्रमाणे हेमायसिन हे नवीन औषध शोधले; पण त्याचे उत्पादन बंद केले. अँपिसिलिन बनवण्याची प्रक्रिया शोधली तरी आता उत्पादन शून्य. दीड वर्षाचा कालावधी लोटूनसुद्धा व्हिटॅमिन सी चे उत्पादन सुरू झालेले नाही. पेनिसिलिन आणि स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनातील वाढ टिकविता आली नाही. या परिस्थितीत जेंटामायसिनच्या बाबतीत मात्र अपवाद होईल असे आपण छातीठोकपणे सांगू शकता काय ?

राष्ट्रीयीकरणाबाबत प्रत्यक्ष उदाहरणावर वास्तववादी चर्चा करणारा आपला लेख खरोखरच अभिनंदनीय आहे.

पुणे **मंगेश फातरफेकर**

---

**" चरणसिंगांना अर्थशास्त्र कळत नाही त्याला मी काय करू ?"**

**पश्चिम बंगालच्या डाव्या सरकारचे अर्थमंत्री प्रा. अशोक मित्रा ' माणूस ' प्रतिनिधीला मुलाखत देताना म्हणून गेले.**

**मग प. बंगालमध्ये कामगार-किसानांच्या हितासाठी कोणती धोरणे अंमलात आणली जात आहेत ?**

**खरोखर प. बंगालची डावी राजवट क्रांतिकारक आहे की कामगार-किसानांच्या मध्यमवर्गीय प्रतिनिधींचे हे सरकार आहे ?**

**या सरकारला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने माणूस प्रतिनिधीने प. बंगालचा दौरा करून मुलाखती-भेटीगाठी या आधारे सादर केलेला खास आढावा–**

# माणूस : किसान-कामगार विशेषांकात : प्रसिद्धी लवकरच

# अमळथ्यातील असंघटित आता संघटित होत आहेत

श्री. ग. मा.

गेल्या अंकात सिंदखेडा मोर्चाची तारीख २० मार्च ठरली असे चुकून लिहिले. मोर्चा २१ तारखेला निघाला अमळथ्याप्रमाणेच आसपासच्या गावातून दलित-आदिवासी मंडळी मोठ्या संख्येने सिंदखेड्याला सकाळपासूनच जमू लागली होती. मोर्चा प्रथम गावातून फिरला व शेवटी तहसीलदार कचेरीवर सभा होऊन विसर्जित झाला. मोर्चा मोठा तसा बंदोबस्तही मोठा होता. सुमारे दोन हजार लोक मोर्चात सहभागी झालेले होते. समितीने आपल्या निवेदनात म्हटले आहे–

'अमळथे येथे चार महिन्यांपूर्वी दलित, आदिवासी, कोळी यांच्या ५० एकरातील ४०० पोती दादर (ज्वारी) कापून लुटली गेली हे दुष्टकृत्य आठ दिवस चालले होते व पोलीस फक्त साक्षीदाराची भूमिका बजावीत होते. याशिवाय रु. ८००० चा कडवाही लुटण्यात आला व ३०० गुरे उरलेल्या शेतात चारण्यात आली. या अत्याचाराची नुकसानभरपाई मिळावी असा करार महसूलमंत्र्यांसमक्ष झाला होता; पण तीन वेळा तारखा ठरूनही त्या मोडण्यात आल्या व नुकसानभरपाई देणार नाही, अशी भाषा सुरू झाली. वर गावात आदिवासी, दलितांवर खोट्या केसेस करणे, त्यांना मारहाण करणे, असे प्रकार सुरू झाले. म्हणून (१) नुकसानभरपाई मिळावी. (२) दलितांना संरक्षण मिळावे यासाठी हा मोर्चा आयोजिला होता.'

अमळथा व सिंदखेडा अंतर पाच-सहा मैलांचे आहे. अमळथ्याहून दलितमंडळी सकाळी ८-८॥ च्या सुमारास पायी सिंदखेड्याला जायला निघणार होती. सुरुवातीसच सिंदखेडा मोर्चातील या प्रमुख अमळथा तुकडीला प्रतिबंध करावा, मोर्चातील हवाच काढून घ्यावी असा काही तरी कट शिजला असावा. कारण अमळथ्याला सकाळी-सकाळीच बंदोबस्तासाठी पन्नासएक जणांची खास पोलिसपार्टी एरवी दाखल व्हायचे काही कारण नव्हते. पूर्वतयारीसाठी ग्राम स्वराज्य समितीचे प्रभाकर बिरारी व उल्हास राजज्ञ हे दोघेजण आदल्या रात्रीपासून अमळथ्यालाच मुक्काम टाकून होते. त्यांना पोलिसपार्टी घेऊन आलेल्या अधिकाऱ्यांनी सकाळी उठता-उठताच शाळेसमोरच्या पटांगणात बोलावून घेतले. मोर्चाबाबत काही सूचना, अटी वगैरे सांगण्यासाठी हे बोलावणे असेल असे वाटल्यावरून हे दोघेजण आणखी कुणाला बरोबर न घेता तसेच पोलिसअधिकाऱ्यांसमोर दाखल झाले. एकाचे तर तोंडधुणेही झालेले नव्हते. अधिकाऱ्यांपैकी बनकर यांनी एकदम दमदाटीची भाषा सुरू केली व शांतताभंग होतो म्हणून या दोघांना अटक करण्यापर्यंत मजल गाठली. 'आम्हाला मंत्र्यांचे आदेश आहेत' वगैरे मुक्ताफळेही उधळली जात होती. अटक केल्यावर या दोघांना शाळेच्या एका खोलीकडे नेण्यात आले. नेताना पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना धक्के मारले. उल्हास राजज्ञ याने धक्के मारण्याच्या कृतीला हरकत घेतली व 'हे थांबले नाही तर मी येथेच उपोषण सुरू करीन!' म्हणून सक्रीय निषेधही नोंदवला. त्यांना खोलीत डांबून अधिकारी जेमतेम बाहेर येतात तो पटांगणात दलित-आदिवासींचा जमाव! उल्हास व प्रभाकर यांना अटक झाल्याची बातमी दलितवस्तीत पोचली होती व सन्याभाऊ भिल याने सगळ्यांना एकत्र करून शाळेवर त्यांच्या सुटकेसाठी मोर्चाच आणून उभा केलेला होता. अधिकारी गडबडले. मोर्चाने घोषणा देण्यास सुरुवात केली. अधिकारी बुचकळ्यात पडले. मोर्चा उल्हास-प्रभाकरला ठेवले होते त्या खोलीच्या दारावर गर्दी करू लागला. 'आम्हाला अटक करा नाही तर या दोघांची सुटका करा!' अशी मोर्चाने मागणी केली. दारावर रेटारेटी झाली. काही लोक आत घुसले व त्यांनी उल्हास-प्रभाकरभोवती कडे केले. पोलीस दारावर लोकांना अडवीत होते, लोक आत अधिकाधिक संख्येने घुसतच होते. मारामारीपर्यंत पाळी आली. मोर्चेवाल्यांना पोलिसांचा मार खावा लागला. उलट मोर्चातील बायकांनी पोलिसांनाही–अगदी त्यांच्या वरिष्ठांनाही चप्पलचे पाणी दाखवले. या सर्व १००–१२५ प्रक्षुब्ध लोकांना अटक करून प्रकरण अधिक चिघळवायचे, की उल्हास-प्रभाकर यांना सोडून देऊन माघार घ्यायची असा पेच अधिकाऱ्यांसमोर उभा राहिला. शेवटी माघार घेणे शहाणपणाचे आहे असा निर्णय घेऊन त्यांनी प्रभाकर व उल्हासची सुटका करून टाकली. थोडी दमदाटी करून, कार्यकर्त्यांना २-४ तास अटकेत ठेवून मोर्चाचा बेत मुळातच उखडून टाकता येईल, ही कल्पना साफ धुळीला मिळाली. उल्हास, प्रभाकर व समितीचे अन्य कार्यकर्ते यांनी अमळथ्याला दलितवस्तीत गेल्या १-२ महिन्यात जे पेरले होते ते व्यवस्थित, वेळेवर उगवले होते. त्यांना अटक झाली हे कळताच उत्स्फूर्तपणे अवघी दलितवस्ती त्यांची सुटका करण्यासाठी शाळेवर चालून जाते, पोलिसांशी झटापटी करण्याइतका धीटपणा दाखवू शकते, त्यांची सुटका न झाल्यास त्यांच्यासोबत स्वतःलाही अटक करवून घेण्यासाठी पुढे सरसावते व अखेरीस त्यांची सुटका करण्यास पोलिस अधिकाऱ्यांना भाग पाडू शकते, हे यश शेवटी या कार्यकर्त्यांच्या श्रमाचेच म्हटले पाहिजे. अमळथ्याच्या दलितांनी असे यश पूर्वी कधीही अनुभवले नव्हते. अमळथा गावानेही पूर्वी कधी अशी चकमक पाहिलेली नव्हती.

## दुसरा हल्ला

कार्यकर्त्यांची सुटका झाल्यावर दलितमंडळी वस्तीकडे परत न फिरता शाळेच्या पटांगणातून तशीच परस्पर सिदखेड्याकडे मोर्चाने निघाली. १-२ जण भाकऱ्या आणण्यासाठी परतले. ते वस्तीत जाऊन, भाकऱ्या गोळा करून मोर्चाला नंतर थोड्या वेळाने मिळणार होते; पण इथेच घोटाळा झाला. ते एकटे सापडले आहेत असे पाहून त्यांच्यापैकी एकावर, झिपा गणा कोळी याच्यावर 'घे नुकसान भरपाई!' म्हणून दिवसाढवळ्या, पोलिसपार्टीच्या देखतच काठ्यांनी हल्ला-चढविण्यात आला. एका लहान मुलाने धावत जाऊन मोर्चातील लोकांना ही बातमी सांगितली. मोर्चा तोवर गावाबाहेर पडून दोन-एक फर्लांग पुढे गेलेला होता. बातमी कळल्यावर सर्व मोर्चाने तोंड फिरवून गावाकडे धाव घेतली. पुढची हकीकत समितीने तयार केलेल्या व शासनाकडे पाठवलेल्या निवेदनावरूनच समजून घेणे चांगले. निवेदन सांगते—

'मोर्चेकरी गावात आल्याबरोबर त्यांनाही काठ्यांचे तडाखे बसण्यास सुरुवात झाली. आदिवासी गोंधळून गेले व मार खात राहिले. ही धुमश्चक्री व काठ्यांचे हल्ले थांबावे म्हणून कार्यकर्त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. बिरारी यांनी अनेकांच्या काठ्या हिसकावून घेतल्या. उल्हास राजज्ञ यांनी मार खाणारा शंकर धनगर याच्या अंगावर स्वतःस झोकून दिले. त्याला झाकून घेतल्याने त्याचे प्राण वाचले. राजज्ञ यांनाही यामुळे फटके बसले. अनेकांना शांत करून, पुन्हा मोर्चा संघटित करून मोर्चा गावाबाहेर आला. झिपा गणा कोळी याला गुलाब शंकर पाटील, माधव शंकर पाटील, विजय संभाजी पाटील वगैरे लोक मारीत असताना श्री. बनकर (पोलीस इन्स्पेक्टर) हे फक्त पाहत होते. बनकर यांच्या बोलण्याने व वागण्याने वातावरण चिघळत होते. 'भाषण करता काय?' असे म्हणून त्यांनी राजज्ञ यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्यावर काठी मारली. यामुळे काही लोक बनकरांच्या अंगावर धावून गेले; पण त्यांना शांत करून राजज्ञ यांनी मागे फिरविले.

'या हाणामारीत ताराचंद महादू नगराळे (दलित), बळीराम तानका कोळी, बुवा हिरामण भिल, झोपडू दगा सोनवणे आदी गरिबांना जबर मार बसला. बुला हिरामण भिल याच्या उजव्या पायाला मोठी जखम झाल्याने त्याला सिदखेडा येथे रुग्णालयात पाठवावे लागले. इन्स्पेक्टर बनकर यांनी ताराचंद नगराळे व सौ. सिंधू नगराळे यांना काठीने झोडपले. सिंधूबाईच्या हाताला हिसडा मारल्याने त्यांच्या बांगड्या फुटल्या. शांताबाई सोमा ईशी व बायजाबाई सदाशिव ईशी या दलित स्त्रियांना जातीवाचक शिवीगाळ करत ओंकार गिरासे, दिवाण हिरा ठाकूर यांनी लाथाबुक्क्यांनी तुडविले.'

¤

आणखी काही नावनिशीवार तपशील सादर करून निवेदन शेवटी म्हणते : 'एवढा अन्याय सहन करूनही सर्व गरीब मोर्चाने दहा किलोमीटर अंतर पायी जाऊन सिदखेड्याला पोचलाच.' तेथे इतर गावाहून असेच छोटे-मोठे मोर्चे येऊन दाखल झालेले होते. कॉलेजच्या पटांगणावर सगळ्यांचे एकत्रीकरण झाले व नतर हा संयुक्त मोर्चा गावातून हिंडून तहसीलदार कचेरीवर धडकला. अमळथ्याच्या जमीनदार मंडळींचा व त्यांना आतून सामील झालेल्या पोलिसअधिकाऱ्यांचा डाव असा पूर्णपणे उधळला गेला. मोर्चा ठरल्याप्रमाणे व्यवस्थित पार पडला. मोर्चावर दोन हल्ले झाले. दोन्हीही हल्ले दलितांनी यशस्वीरीत्या परतवून लावले. ग्रामस्वराज्य समिती यापूर्वी शहादे-तळोदे भागातच काम करीत होती. या मोर्चामुळे सिदखेडा भागातही समितीचे पाय रोवले गेले. अंबरसिंगांच्या मृत्यूनंतर समितीला थोडी मरगळ आलेली होती ती दूर झाली. अमळथ्याचा प्रश्न समितीने आता धसाला लावण्याचा निर्णय घेतला आहे. तिला साथ मिळणार की नाही? शहरात कामगार-कारकुनांनी संप केला की, खेड्यातल्या असंघटितांच्या नावाने त्यांना झोडपण्याची फॅशन आहे; पण हा असंघटितांचा पुळका संघटितांना झोडपण्यापुरताच टिकून असतो. असंघटितांना संघटित करण्याचे कष्टाचे व अत्यंत जिकिरीचे काम करण्यास व अशा कामांना सक्रीय मदत देण्यास मात्र कुणी पुढे येत नाही. गोविंदराव शिंदे व त्यांचे तरुण सहकारी वर्षानुवर्षे शहादे व इतर भागात हे असंघटितांना संघटित करण्याचे काम निरपेक्षपणे करीत आहेत. त्यांच्या दैनंदिन खर्चाची देखील सोय नाही. असंघटितांचा पुळका असणारे शहरातले वाचीवीर आणि संघटितांचे ठेकेदार या दोघांनी अशा खेडोपाडी चालू असणाऱ्या कामांशी, कार्यकर्त्यांशी नाते प्रस्थापित करायला हवे, काही किमान जबाबदारीही उचलायला हवी. ग्रामीण भागाचे परिवर्तन, समाजक्रांती, व्यवस्थाबदल यातून होईल की नाही, या लांबच्या गोष्टी आहेत. आपल्या बोलण्याचालण्यात, लिहिण्यात थोडा तरी प्रामाणिकपणाचा अंश त्यामुळे दिसून येत राहील. अमळथ्याची घटना घडून चार महिने उलटले; पण कुणीही तथाकथित दलितनेता, कवी, लेखक तिकडे फिरकलेला नाही. अशा लहान लहान घटना दुर्लक्षित राहतात, अन्याय विसरले जातात आणि मराठवाड्यासारखा भडका उडाल्यावर मग जो तो आपली खरीखोटी पश्चातबुद्धी पाजळायला लागतो. दलितांमधील नवे नेतृत्वही याला अपवाद नाही. एखादा अन्याय दूर करून घेण्याऐवजी शहरात कविसंमेलने आणि परिसंवाद गाजवण्याचे महत्त्व व आकर्षण या नवनेतृत्वाला अधिक वाटत असावे. उल्हास राजज्ञसारखा तरुण धुळ्यातली आपली नोकरी सांभाळून, वेळप्रसंगी तिच्यावर पाणी सोडूनही अमळथ्याला धावतो, दलितांना एकत्रित आणतो, मोर्चे काढतो, पोलिसांचा मार खातो, तुरुंगात जायचीही तयारी ठेवतो आणि धुळ्यातले, पुण्या-मुंबई-नागपूरचे जुने-नवे दलित नेतृत्व कशात रममाण झालेले दिसते? अगदी मराठवाडा विद्यापीठाला आंबेडकरांचे नाव दिले तरी अमळथ्यासारखे ठिकठिकाणी चालू असणारे प्रकार थांबणार आहेत का? गरज आहे कार्यकर्त्यांची. पीक मात्र फोफावले आहे शब्दांचे—ठरावांचे, एकाहून एक जहाल भाषणांचे. थोडे तरी आत्मपरीक्षण आपण केव्हा करणार?

¤

वरील सिदखेडा मोर्चापूर्वी चार दिवस, १७ मार्चला गोविंदराव शिंदे यांनी महसूलमंत्री श्री. उत्तमराव पाटील यांना पत्र पाठवून

पृष्ठ २४ वर

संध्याकाळचे पुणे । दि. बा मोकाशी

# वैशाखमासि वासंतिक समय शोभतो

' फुलांचे खिदळणे तुम्हाला ऐकू येत आहे का? भृंगे मस्त होऊन गुंजारव करीत आहेत. कोकिळा कुहुकुहु ओरडत आहेत. घाम कसा छान वाटतो. हवा गोड केली आहे त्यानं. कठोर, प्रचंड कामानं वसंत भरून गेलाय. एक वेळ हजार दूतींना कुमारिकेला आपल्या प्रियकराकडे नेता येणार नाही; पण वसंत एकटा ते काम करतो!

प्राचीन वाङ्मयातील हे वसंतऋतूचे वर्णन आहे. पुण्यातही वसंतऋतूस आरंभ झाला आहे. कोकिळा ओरडू लागली आहे आणि वसंत-ऋतूबरोबर ज्ञानऋतु सुरू झाला आहे. कुमारिकांना वसंतऋतु प्रियकरांकडे नेत आहेच तसा ज्ञानऋतु ज्ञानपिपासू नागरिकांना ज्ञानसत्राकडे नेत आहे. टिळकरोडवरील टिळक स्मारक मंदिरात वसंत व्याख्यानमाला सुरू झाली आहे. थोड्याच दिवसांनी मॅजेस्टिक चर्चासत्र सुरू होईल. शिवाय पुस्तकांची प्रदर्शने भरतीलच. पुण्यातील निवृत्त म्हाताऱ्यांचा हा आनंदाचा महिना आहे. संध्याकाळचा वेळ कुठे घालवावा हा प्रश्न या महिन्यापुरता सुटला आहे.

पुण्यामध्ये वृद्धांच्या करमणुकीसाठी अनेक गोष्टी वर्षभर चालू असतात. पुण्यातील देवळांतून कथा-प्रवचने चालू असतात. त्यांना गर्दी होतेच. पण असे वृद्ध स्त्रीपुरुष आहेत की ज्यांची देवाधर्मावर श्रद्धा नाही. शास्त्र, तर्क आणि मनुष्याचे कर्तृत्व यावरच ज्यांची श्रद्धा आहे. जे मानवतावादाचे भोक्ते आहेत, अशा लोकांची जी थोडी व्यासपीठे पुण्यात आहेत त्यांपैकी एक वसंत व्याख्यानमाला होय. या मालेच्या यंदाच्या पहिल्या उद्‌घाटनाच्या व्याख्यानाचे वेळी अध्यक्षपदावरून जयवंतराव टिळक म्हणाले की, पुण्यात ज्या संस्थांनी शंभरी पाहिली त्यात वसंत व्याख्यानमाला मोडते. या मालेचे यंदाचे एकशेपाचावे वर्ष आहे!' तिचे उद्‌घाटन यंदा प्रसिद्ध रॉयिस्ट व मानवतावादी विद्वान लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले व त्यांनीच मालेचे पहिले पुष्प गुंफिले. उद्‌घाटनाच्या प्रास्ताविकात त्यांनी म्हटले की 'या मालेचा पाया घालणारे न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर हे भारताच्या आधुनिकतेचे अग्रदूत होते. आधुनिकता म्हणजे काय हे सांगताना ते म्हणाले, ' मध्ययुगीन पारलौकिक जाणिवेतून बाहेर पडून या जगी ऐहिक मूल्यातून जाणीव घेऊन पाहणे ही आधुनिकता!'

लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वय ऐंशीच्या जवळपास असेल. नाटकातील नायकसुद्धा शेवटच्या अंकातील शेवटच्या प्रवेशात, नरम होतो, शरण येतो, क्षमा मागतो; पण हा मानवतावदी म्हातारा मानवेंद्र रॉय यांनी दिलेला मानवतावादाचा झेंडा घेऊन अजून उभा दिसतो. धर्माला किंवा देवाला शरण जाण्याचे अजूनही त्याच्या मनात येत नाही. आपल्या व्याख्यानात, (व्याख्यानाचा विषय होता—मानवी मूलभूत हक्क व धर्मसंस्था) त्यांनी जगातले सर्व धर्म आता निकामी झाल्याचे सांगितले. धर्म कधीच एक नव्हते. प्रत्येक धर्माचा ईश्वर वेगळा आहे. जुन्या करारतील ईश्वर कडक आहे. नव्या करारातला प्रेमळ आहे, तर मुसलमानी धर्मात राजाच परमेश्वर आहे. हिंदुधर्मातील ईश्वर सर्व व्यक्त आहे, अव्यक्त आहे, त्रिगुणातीत आहे, अगोचर आहे. हिंदु पुनर्जन्म मानतात. धर्म तपासले पाहिजेत. धर्माची समीक्षा हा सर्व समीक्षेचा आरंभ आहे. ...एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाण्याची कल्पना कुठेही धर्मात बसत नाही. बाटवाबाटवीची संस्थाच हिंदुधर्मात नव्हती हे चांगलं झालं. धर्मांतराचा अधिकार कुणालाही नसावा. बाटवाबाटवी ही कालबाह्यच आहे.

शास्त्रीबुवांनी सांगितलेली ही तत्त्वे बरोबरच आहेत; पण धर्मपरिवर्तन ही गोष्ट हिंदु मनाला नेहमीच भयंकर वाटत आलेली आहे. धर्मपरिवर्तन हा साधा शब्दप्रयोग झाला. धर्मांतर हा त्यापेक्षा बरोबर व जबरीने धर्मांतर हा त्याहीपेक्षा बरोबर शब्दप्रयोग आहे. अशा धर्मांतराची धास्ती गझनीच्या महंमदाने घातली ती अगदी आमच्या पिढीपर्यंत चालत आली. तोपर्यंत आमच्याकडे परिवर्तने होत होती. पण त्याचे स्वरूप मतपरिवर्तनाचे होते. दोन पंथांच्या अध्वर्यूत वाद होई जो पराभूत होई त्याने जे त्याचे शिष्यासह शिष्यत्व पत्करावे असे ठरलेले असे. बुद्धाने असे वाद जिंकले व त्याचा पंथ वाढत चालला. शंकराचार्यांनीही हेच केले; पण कुणी तलवार घेऊन धर्म बदलायला सांगतो आहे ही गोष्ट आमच्याकडे नव्हती. कुठलेही परिवर्तन याच तऱ्हेने व्हावे असे मला नेहमी वाटते.

धर्मांतराची पहिली भीती माझ्या पोटात बसली ती ' वाईकर भटजी ' या पुस्तकाच्या वाचनातून. त्यात वाईकर भटजीचा एक मुलगा ख्रिस्ती होतो, त्या वेळी त्या कुटुंबात झालेले दुःख वाचून माझ्यावर इतका परिणाम झाला की, ती कादंबरी मी पुन्हा हाती घेतली नाही आणि जेव्हा जेव्हा मी धर्मांतराबद्दल ऐके तेव्हा तेव्हा मला त्रास होई. लक्ष्मणशास्त्री म्हणाले की, धर्मांतर ही गोष्ट कालबाह्य आहे; पण धर्मांतरामुळे जे दुःख होत आले आहे ते मानवताबाह्य आहे. त्यातून जबरीने स्त्रिया पळविणे व त्यांचे धर्मांतर करणे हे तर राक्षसीच आहे. पानिपतच्या वेळी अबदालीने ज्या स्त्रिया आपल्याबरोबर नेल्या त्यांचे काय झाले असेल? अशा स्त्रिया जगभर पळविल्या गेल्या. परवा मला वाटते, एका अंकात पानिपतमध्ये पळवल्या गेलेल्या एका स्त्रीच्या काबूलमधील वंशजांची हकीगत आलेली आहे. पानिपतच्या लुटीतील स्त्रियांपैकी काही स्त्रिया एका हिंदु व्यापाऱ्याने लिलावात घेतल्या. पुढे एकीशी त्याने विवाहही केला. ती पेशवे घराण्यातील स्त्री होती. अशा थोड्या स्त्रिया धर्मांतरातून वाचल्या तरी त्यांचे दुःख मोठेच होते.

आपल्या धर्मात धर्मांतर नसल्याने धर्मांतर ही गोष्ट आपणास अतिशय दुःखद होते. सेतुमाधव पगडी यांचे आत्मचरित्र वाचताना हैद्राबादेत मुसलमान करीत असलेली धर्मांतरे सांगताना त्यांचे हृदय केवढे व्यथित होते हे कळते. धर्मांतराचा आपणास संताप येण्यापेक्षा आपण दुःखी होतो. एकदा प्रसिद्ध

मुस्लिम सत्यशोधक हमीद दलवाई जेव्हा ते लघुकथालेखक व कादंबरीकारच होते तेव्हा आमच्या बोलण्यात एक हकीगत सांगत म्हणाले की, 'कोकणात त्यांच्या गावी एका मुसलमानाचे घरासमोर एक ब्राह्मण कुटुंब रहात असे. त्यात एक सोवळी तरुण सुंदर विधवा होती. या मुसलमानाने तिला पळवून घरात आणली. पुढे ती त्याच्याकडे राहिली. पहिल्या कुटुंबातील लोकांसमोर– सर्व हिंदूंसमोर ती त्याला पान लावून देत ओटीवर बसे. जर हा प्रकार उलट झाला असता तर पळवणाऱ्या हिंदूंचा खून झाला असता; पण ती बाई सर्व गावासमोर तशीच त्या मुसलमानाकडे आयुष्यभर राहिली. हिंदु भ्याड आहेत. एकालाही चीड आली नाही.'

ही हकीगत सांगताना पान लावण्याच्या प्रसंगाच्या वेळी हमीद त्यांचे एक गालातले मिष्किल हसू हसले. पहा मुसलमान कसा जोरदार असतो!

हिंदू भ्यायले यात शंका नाही. त्यांना चीड आली नाही यातही शंका नाही; पण धर्मांतर ही गोष्ट त्यांच्या समजुतीत कुठेच बसत नव्हती. त्यामुळे त्याला वाईट मात्र वाटले. सबंध हिंदुगाव तेव्हा दुःखी झाले.

दुःख हीच आमची पूर्वापार शक्ती होती हे हमीदला किंवा कुणा बाहेरच्यांना कळले नाही. त्या दुःखातून आम्ही खूप शिकलो. त्याचे प्रत्यंतर म्हणजे आमची निधर्मी मानवतावादी घटना.

बरीच वर्षे मी मुसलमान जास्त असलेल्या गावी रहात होतो. तेव्हाही असले अनेक दुःखाचे प्रसंग पाहिले. घाटावरचे परिस्थिती खालावलेले शेतकरी स्त्री-पुरुष तिथल्या स्टेशनावर हमाली करावयास येत. मसलमान घेवारी त्यातील तरुण मुली व स्त्रिया यांना हमाली देऊन मोहल्ल्यात नेत व तिथे त्यांच्या अंगावर कधी हात टाकीत. यापैकी एखाद-दुसरी स्त्री मुसलमान ठेवून घेई व तिला हमालीचे काम देई त्या वेळी आम्हा मुलांच्या जगालाही मुसलमानी मुलांचा अरेरावीचा जाच सोसावा लागे. आमच्या खेळात येऊन ती वारंवार दांडगेगिरी करीत. आमचे स्टंप उपटीत, चेंडू पळवीत; पण आम्ही मार दिला की वठणीवर येत. पठाणांचे प्रस्थ तर फार. झोपडपट्टीशी जाऊन पठाण कर्ज घेतलेल्याला मारहाण करी. त्याच्या बायकोच्या अंगावर हात टाकी. घरात मिळेल ते घेऊन जाई. हे सर्व दुःखद होते. अशा वागण्यात मुसलमानांची अशी धारणा होती की, मुसलमानांशिवाय बाकीचे सर्व तुच्छ व त्यांना लुबाडले, त्यांच्या स्त्रियांची अब्रू घेतली तर पाप नाही, गुन्हा नाही.

आणि आमचे त्या उलट होते. आम्हाला माणुसकी आमच्या धर्मापुरती ठेवता येत नव्हती. नीति आमच्या धर्मियांपुरती राखता येत नाही. आपत्तीत कुणीही असो आम्ही हळहळत होतो मुसलमानास लुबाडले की पुण्य, हे आमच्या धर्माच्या समजुतीत बसत नव्हते. त्यामुळे मुसलमान व ख्रिश्चन यांच्याकडून होणाऱ्या जबरी आम्हाला आकलन होत नव्हत्या. असा निर्घृणपणा माणसात असतो हे पटत नव्हते.

मुसलमान व ख्रिश्चन धर्मप्रसारकांकरवी आम्ही जे गेले कित्येक शतके दुःख भोगले ते कुणाला यापुढे भोगावे लागू नये, म्हणून आम्ही मूळ प्रवृत्तीतूनच निधर्मी राज्याचा पुरस्कार केला व सर्व धर्मांचे जननस्थान असलेल्या आशिया खंडात निधर्मी झालो. त्याची सुंदर फळे आम्हाला मिळताहेत व मिळतील यात शंकाच नको. आज आमचा पाक व बांगला झाला नाही. आम्ही आमच्यात कुणाला हुकूमशहा होऊ दिले नाही. ती प्रवृत्तीही आमच्यात कधी रुजली नाही व रुजणार नाही. कारण आमचा धार्मिक ढाचा लोकशाहीमय आहे. आम्ही एक ग्रंथ मानीत नाही. एकमेव किंवा एक प्रेषित मानीत आम्ही अनेक प्रवृत्तीचे अनेक देव मानतो व ज्याला हवे त्याने हवा तो देव भजावा. सगळे देव सारखे असे आम्ही मानतो व कुणी कुठल्याही देवाला भजले, अनेक धर्मग्रंथांतला कुठलाही वाचला तरी तो परमेश्वरापर्यंत जातो असे आम्ही समजतो. रक्तातल्या या लोकशाहीने आम्हाला आजही लोकशाहीत ठेवले आहे.

◻

निधर्मी राहण्याचे ठरवून आम्ही परत आमच्या प्राचीन स्वातंत्र्याकडे वळलो आहोत. अधिक शहाणे होऊन वळलो आहोत. शास्त्रीबुवा म्हणाले, आम्ही जे धर्मांतराचे चळवळीत (हिंदु करून घेण्याच्या) कांही काळ पडलो ती प्रतिक्रिया होती. स्वतःच्या समर्थनार्थ हे त्यांना म्हणावे लागले. पण महात्मा गांधी व विनोबा भावे यांनी ही मतस्वातंत्र्याची प्राचीन परंपरा उचलून धरली. शास्त्रीबोवा हे गांधींचे भक्त झाले. पण विनोबा हे म. गांधींचे शिष्य आहेत की नाही ही शंका त्यांनी व्यक्त केली ते ठीक केले नाही. आज-काल विनोबांविरुद्ध कुणीही उठावे नि बोलावे असे झाले आहे. शास्त्रीबोवांसारख्या विचारवंतांनी त्या लोकांच्या पंक्तीस बसावे हे त्यांना शोभणारे नाही एवढेच.

शास्त्रीबोवांनी जे सांगितले की जगातील धर्म किंवा त्यांचे परमेश्वर हे एकासारखे एक नाहीत हा त्यांचा विचार बरोबर आहे आणि तिथेच न थांबविता आणखी पुढे न्यावा असे मला वाटते. जगातील धर्म व ईश्वर यांची स्वरूपे वेगळी आहेत तसाच जगातले कम्युनिझमही एक नाहीत, जगातील लोकशाही, भांडवलशाही किंवा राज्यशाही एकसारख्या नाहीत असे मला वाटते. रशियाचा कम्युनिझम वेगळा, कॅस्ट्रोचा वेगळा, अमेरिकन लोकशाही वेगळी, ब्रिटीश लोकशाही वेगळी, आपल्या देशातही या नव्या तत्त्वांच्या अनेक तऱ्हा झाल्या आहेत. सोशालिस्टांत पंथ निघाले, कम्युनिष्टांत निघाले, काँग्रेसमध्ये निघाले. त्याचप्रमाणे मानवी हक्काचे तत्त्वही सर्वत्र सारखे राहणार नाही.

◻

माणसांची तऱ्हा अशी आहे. तो निसर्गासारखी आहे. खेडेगावांतील परसूत आंबे खाऊन कोया फेकतात त्या जागजागी उगवतात. चिचुके फेकतात त्यांची रोपे उगवतात. जांभळीच्या बिया पडतात तेथे जांभळी उगवितात, निसर्गाची फुलण्याची अशी रीत आहे. तसेच जगभर विविध वृत्तीचे व अवस्थेतले समाज उगवलेले दिसतात. एखादा हिटलर हे न सहन होऊन सर्वांना एका शिस्तीत एका दाव्यात बांधायला जातो तेव्हा फसतो. कारण ते निसर्गाविरुद्ध असते. कम्युनिझमसारखे एखादे तत्त्व सर्वांची एक गाठ गांधायला पहाते पण जमत नाही. एखादी साम्राज्यशाही आपले साम्राज्य वाढवावयास जाते व त्यांना अनपेक्षित भिंत लागते. तेव्हा हा एकत्र बांधण्याचा मार्ग आता निरुपयोगी झाला आहे. या खेरीज आणखी एखादा मार्ग माणसाला शोधायला हवा.

यासाठीच भारताचा निधर्मीपणाचा प्रयोग महत्त्वाचा आहे. आमच्या परसूत सर्व धर्मांची रोपे वाढली, आता सर्व इझम वाढू द्या. आमचे परसूत नैसर्गिक रम्यतेने नटू द्या. हे परसू असेच सुंदर अद्वातद्वा वाढू द्या.

◻

# मुक्ताफळे

ग्यानबा

## □ गोगलगाईचे मागणे

दोन वर्षांपूर्वी आम्ही पवनारला गेलो होतो. धाम नदीच्या किनारी असलेल्या परंधामाला. रावणटेकडीजवळ उगम पावणारी ही नदी आम्ही गेलो तेव्हा जवळजवळ कोरडी ठणठणीत होती. मुख्य रस्ता सोडून नदीच्या काठाने रखरखीत धूळ तुडवीत गेल्यावर या नदीकाठी एका उंचवटयावर हिरव्या गर्द झाडांच्या सावलीत एक लाल इमारत भेटली. हाच तो पवनारचा आश्रम. स्व. जमनालाल बजाज यांनी १९३५ साली बांधलेल्या या बंगल्यात १९३८ मध्ये विनोबा रहायला आले. गेल्या ४० वर्षांत विनोबांच्या वास्तव्यामुळे या आश्रमाभोवती आश्रमाचे काहीसे उदासवाणे वातावरण निर्माण झालेले होते.

दुरून जो लाल महाल वाटत होता त्याच्या सर्वांगाला छपऱ्या सोडल्यामुळे जवळून तो एखाद्या आश्रमीय झोपडीसारखा भासत होता. या बंगल्यासमोर एक छोटेसे पक्के मंदीर होते. मंदिराचे जोते चांगले चार फूट उंच होते. या जोत्याभोवती नदीकाठी उत्खननात सापडलेले दगडी चिरे, जुन्या मूर्तींचे काटले–छाटलेले अवशेष, शिल्पांची पॅनेल्स टेकवून ठेवलेली होती. भरत–राम-भेट, रामजन्म, रामाला वनात सोडून रथातून परतणारा सुमंत, भगवती गंगा, कंसवध अशा दृश्यांची ही भग्न शिल्पे म्हणजे हा भूभाग एके काळी बुराणशहा निजामाच्या ताब्यात होता, तेव्हा त्याने येथील मंदिरावर केलेल्या आघातकलेचे व्रण होते.

मंदिराला लागून परिश्रमालय होते. तिथे प्रकाशन-विक्री आणि छापखाना दिसला. या इमारतीत टोकाच्या एका खोलीभोवती अगदी निःस्तब्ध शांतता होती. सकाळचे ९॥– १० वाजलेले असावेत. विनोबा भेटू शकतील का ? असे तेथील एका लुंगीधाऱ्या सेवकाला विचारल्यावर–

' बाबा झोपले आहेत. आता उठायची वेळ झालीच आहे, ' असे त्याने भाविक मुद्रेने सांगितले. झोपलेले विनोबा कसे दिसतात हे पाहण्यासाठी आम्ही पाय न वाजवता, विनोबांच्या निद्रालयात खिडकीतून डोकावले. एका छोट्या चौपाईवर पाय पोटाशी घेऊन बाबा गाढ झोपलेले होते. एखाद्या गोगल-गाईसारखे आम्हाला ते दिसले. या गोगल-गाईने अवघ्या जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या व्यक्तीत स्थान मिळवावे हे आश्चर्य होते.

बाबा जागे झाल्यावर आम्ही त्यांचे दर्शन घेतले. आणीबाणीचा काळ होता. अर्ध्या तासात इंदिराजी तिथे यायच्या होत्या, याची इशारत मिळालेली होती. पंधरा-वीस मिनिटात आम्ही परंधाम सोडले.

तेव्हापासून गोगलगाय म्हटली की, आम्हाला विनोबा आठवतात आणि विनोबा म्हटले की, गोगलगाय डोळ्यांसमोर येते आणि यातले काहीही एक झाले रे झाले की, सावरकरांच्या सोनेरी काडीच्या चष्म्या-आडचे लकलकते डोळे बजावू लागतात–

' हिंदु लोकांनी आमच्या संस्कृतीचे ध्येय-चिन्ह म्हणून याच्यापुढे गाईला पूज्य न मानता, गोगलगाईलाच पूज्य मानावे. गाईची पूजा करता करता आपण हिंदू गाय झालो; पण आता सात्त्विकतेची पुढची पायरी आपणास गाठलीच पाहिजे. '

या हिंदू देशात पवनारच्या या गोगल-गाईला जे असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे ते पहाता सावरकरांची ही भविष्य-वाणीही खरी ठरल्याचा आनंद अनेकांना झाल्याशिवाय रहाणार नाही. परंधामीची ही गोगलगाय, गाईच्या रक्षणासाठी सज्ज होताच काय धुमाकूळ उडाला पहा ! केरळ आणि बंगाल राज्यात गोवधबंदी व्हावी म्हणून २२ एप्रिलपासून आपण आमरण अनशन करणार, असे या गोगलगाईने जाहीर करताच पुणे-मुंबईतील काही महान पत्रकर्त्यां-पासून तो गल्लीतल्या संपादकांपर्यंत सर्वजण एकसमयावच्छेदेकरून या गोगलगाईवर संता-पून उठले. कोण हा विनोबा ? आणीबाणीत का स्वस्थ होता ? जनता पक्षाला अडचणीत टाकण्याचा याचा डाव आहे ! याच्याकडे कुणी लक्ष देऊ नये... लुच्चा आहे– ढोंगी आहे... असे वाग्बाण चहूबाजूंनी सुटू लागले. अग्रलेखांची आणि आगंतुक पत्रलेखकांची वैचारिक भेंडोळी आमच्या अंगावर सारखी कोसळत होती. बैलांचे अर्थकारण, गाईचे अर्थकारण, म्हशीचे अर्थकारण, संकरित गाईंची पैदास, भाकड गाईंचा प्रश्न, बेका-रीचा प्रश्न, दारुड्यांचा प्रश्न, दलितांवरील अत्याचार आणि विनोबांचे उपोषण– या विषयांवर आम्ही इतके वाचले आहे की, आता आमच्या आकलनशक्तीवरच विश्वास उरलेला नाही.

' महाराष्ट्र टाईम्स 'चा हा अग्रलेख पहा – ' दुराग्रही उपोषण ' !

' भुत्तो यांना फाशी देऊ नये अशी जगा-तल्या अनेक नामवंत अधिकारपदस्थ व्यक्तींनी विनंती केली असतानाही पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल झिया यांनी ती मानली नाही... याबद्दल विनोबांनी आश्चर्य प्रकट केले; पण विनोबा मात्र सर्वपक्षीय खासदार आणि पंतप्रधान यांचे ऐकण्यास तयार नाहीत.. हे बरोबरच आहे. झिया स्थूलात आहेत व विनोबा सूक्ष्मात आहेत ! '

संत झिया आणि जनरल विनोबा यांच्यात संपादकांनी मार्मिक साधर्म्य दाखवले आहे की नाही ? स्थूलमानाने हे साधर्म्य बरोबर आहे. आता सूक्ष्मपणे पहाणारा कदाचित असे म्हणेल की वाईट गोष्ट करणाऱ्याने अनेकांचे न ऐकणे आणि आपण करतो आहोत ती चांगली गोष्ट आहे असे म्हणणाऱ्याने लोकांचे न ऐकणे ही दोन्ही एकच कशी ? बायकोला मारहाण करणारा नवरा आणि बायकोने नीट वागावे म्हणून उपवास करणारा नवरा हे दोघे स्थूलमानाने नवरेच असतात.

याच अग्रलेखात संपादक म्हणतात –

' गोवधबंदीची मागणी मुळातच अशास्त्रीय आणि शेतकऱ्यांच्या हिताची पर्वा न करणारी आहे . जयप्रकाशांना हे कळेल तेव्हा त्यांच्या प्रकृतीवरही परिणाम होईल. '

भारताच्या घटनेत गोरक्षा हे मार्गदर्शक तत्त्व आहे. भारताच्या महान घटनेचे शिल्प-कार म्हणून आपण ज्यांचा उदो उदो करतो त्यांनी अशास्त्रीय व शेतकऱ्यांच्या हिताची पर्वा न करणारे तत्त्व घटनेत घातले याबद्दल आपण त्या घटनाकारांनाच कधी धारेवर

धरले आहे का? आज हे मार्गदर्शक तत्त्व विनोबांच्या बाबतीत 'स्वर्गदर्शक' तत्त्व ठरण्याची शक्यता निर्माण होताच आपण गोरक्षा हे तत्त्व अशास्त्रीय व देशातील चरणसिंगाच्या हिताची पर्वा न करणारे आहे असे जर म्हणू लागलो तर त्या महान शिल्पकारांच्या आणि इतर अनेक गवंड्यांच्या आत्म्यांना काय वाटेल बरे? आता हे जयप्रकाशांना कळेल तेव्हा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होणारच मुळी! आधीच संत स्त्रियांनी कुणाचे न ऐकल्याने त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झालेला, त्यात जनरल विनोबांचे हे दुष्कृत्य. जयप्रकाशांचे वय काय? इतक्या वृद्धावस्थेत हे आघात सहन कसे होणार—विनोबांना आता कुठे ८४ पूर्ण होताहेत.

एका अग्रलेखाने भागेना म्हणून पहिल्या अग्रलेखाअखेर सरकार व लोकांनी या विनोबाकडे लक्ष देऊ नये, असे बजावले असूनही संपादकांनी दुसरा अग्रलेख लिहिला 'गाईचे अर्थशास्त्र!' यातल्या आकडेवारीने तर आम्ही चकित झालो.

'देशात ५१ साली १९ कोटी ९० लक्ष गाई होत्या. ७२ साली ही संख्या २३ कोटी ७० लाखांवर गेली' वगैरे...

हा समग्र अग्रलेख वाचून आम्हाला असे वाटले की, केरळ व बंगालमधे तर गाई मारल्याच पाहिजेत, पण इतर सर्व प्रांतांतही गाई मारायला ताबडतोब सुरुवात केली पाहिजे. सर्व देशात गाई मारायला सुरुवात केल्याखेरीज आपल्या देशाला तरणोपाय नाही! कारण जे अर्थशास्त्र एका प्रांताला तेच सर्व प्रांतांना लागू असणार! गाय एक पशू, देवता तर नव्हेच नव्हे, हे बजावणाऱ्या सावरकरांनी असेही म्हटले आहे—

'मनुष्याच्या जिवावरच बेतत असेल व राष्ट्रीयदृष्ट्या अपरिहार्य असेल. तर गोमांस खाण्यात काही पारलौकिक पाप आहे असे मनातसुद्धा आणण्याचे कारण नाही!'

म. टाइम्सकारांची आकडेवारी पाहून आमची खात्री झाली की, गोवध हा राष्ट्रीयदृष्ट्या अपरिहार्य आहे. अरेरे? असे असताना केरळ, बंगाल सोडून इतर प्रान्तात तरी ही अनिष्ट 'बंदी' काय म्हणून? गोगलगाईचे उपोषण जाहीर होण्यापूर्वीच — 'शिंगांची रात्र आहे, मुख्यमंत्र्यांनो सावध रहा!' असा इषारा इतर प्रांतांतल्या मुख्यमंत्र्यांना का बरे दिला नाही? उलट लिहितात —'आता गोव्यातही गोवधबंदी होऊन गोवधबंदीचे यश काही टक्क्यांनी वाढले असूनही विनोबांचे समाधान नाही!' अरे, काय हे लिहिणे! आपल्याला विनोबांचे समाधान करावयाचे नाही ना, मग अशास्त्रीय आणि मूर्ख बंदीकरता त्यांच्या विनवण्या कशाला? गोवधबंदी झाल्याने केरळ-बंगालचा तरणोपाय नसेल तर इतर प्रांतांतील 'बुडते हे जन' संपादकांच्या डोळ्यांना पहावतात तरी कसे म्हणतो आम्ही!

संपादकांनी सडेतोड लिहिल्यानंतर वाचकांच्या पत्रव्यवहारात गोगलगाईवर प्रहार करण्याची जी लाट उसळली ती वाचूनवाचूनही आम्ही हतबल झालो. अहमदनगरहून बारा बलुतेदारांनी एक संयुक्त पत्र सर्व वृत्तपत्रांत लिहिले. एस. टी. महाले, अॅड. सोमाणी, प्रो. सादिक अली, निसार, बाटलीवाला, राम निसळ, ह. के. तोडमल, माणिकताई करंदीकर, प्रि. सावळे अशी ही थोर थोर मंडळी. यांनी लिहिले—

'संपूर्ण गोहत्याबंदीसाठी उपोषणाचा मार्ग अवलंबिण्याचे आचार्य भावे यांनी ठरवले, तो मार्ग निश्चित लोकशाहीविरोधी आहे. त्यांच्या मताशी सहमत नसणाऱ्यांना, केवळ दडपणामुळे स्वतःच्या विचार व आचारस्वातंत्र्याला मुकावे लागेल!'

मुकावे लागेल? लागलेलेच आहे! गोवधबंदीमुळे विचारस्वातंत्र्यावर कशी काय आपत्ती येते ते आम्हाला कळले नाही. गाई मारण्याचा खाटकांचा आचार आणि गोमांस खाण्याचा काही मंडळींचा आहार यावर बंधने येतात. केरळात ख्रिश्चन आहेत. बंगालमध्ये मुसलमान आहेत. या दोन्ही प्रांतांत विनोबांच्या उपवासामुळे जे आहारस्वातंत्र्य आहे ते धोक्यात आले आहे हे अगदी खरे; पण आमचे म्हणणे असे की, जर बाटलीवाला काय किंवा माणिकताई काय, यांना हे स्वातंत्र्य इतके महत्त्वाचे वाटत असेल तर गोव्यातल्या ख्रिस्त्यांनी वा मुंबईच्या मुसलमानांनी तरी हा आहारस्वातंत्र्यावरचा आघात का सहन करायचा? गोव्यातले ख्रिश्चन, जम्मू-काश्मीरातले मुसलमान, भेंडी बाजारातले मुसलमान, वांद्र्याचे ख्रिश्चन, सांगलीचे मुसलमान, पाटण्याचे मुसलमान, अहमदाबादचे मुसलमान यांच्यावर तरी अन्याय का? इतके दिवस ही नगरमंडळी स्वस्थ का बसली? अजून वेळ गेलेली नाही! सर्वांनी वृत्तपत्रांत अखंड पत्रे लिहून समस्त भारतात गोहत्या पुनश्च सुरू करण्यासाठी प्रयत्नशील रहावे. आमचा त्यास पाठिंबा राहील.

तर्कतीर्थांनी वसंतव्याख्यानमालेत गोगलगाईवर तोफ डागली. त्यांनी प्रश्न विचारला—'उद्या एखादा जैन साधू चिकन फार्म बंद करण्यासाठी उपासाला बसेल...' हे आम्हाला तर्कात बसणारे वाटत नाही. जैन साधू जर अंडी खात असते तर त्यांच्या मनात असे आले असते, 'अरे, आपण ज्यांची अंडी खातो त्यांनाच मारतो हे बरे नाही!' पण ज्यांना मद्य वर्ज्य आहे आणि मद्याबरोबर अंडी-चिकन चापणे वर्ज्य आहे, त्यांच्या मनात 'चिकन फार्म' बंद करण्याचा विचार संभवत नाही. हा विचार असंभवनीय नाही; पण तो चिकनप्रेमी माणसाच्या मनातच येणे जास्त संभवनीय.

तर अशी 'ही' गाय आणि 'ती' पवनारची गोगलगाय. आम्हाला वाटतं, ही गोगलगाय अहंकारी आहे आणि तिचा अहंकारही नितांत सुंदर आहे. महात्मा गांधींनी आपल्या आत्मकथेत म्हटले होते—

'असा कोणी तेजस्वी पुरुष किंवा तेजस्वी स्त्री उत्पन्न होवो की जो मनुष्यजातीचा या घोर पातकातून उद्धार करील. निरपराध प्राण्यांचे रक्षण करील. अशी प्रार्थना तर मी सदैव करीत असतो. ज्ञानी, बुद्धिवादी, त्यागवृत्तीने पूर्ण व भावनाप्रधान बंगाल ही हत्या कशी सहन करतो बरे!'

विनोबांना वाटले की, महात्मा गांधींना अभिप्रेत असलेला तो तेजस्वी पुरुष आपणच आहोत. म्हणून त्यांनी उपोषण आरंभले. त्यांचे काय बरे-वाईट व्हायचे ते होईलच.

विनोबांना ज्ञान शिकवणाऱ्यांनी आता त्वरित आपल्या कामाला लागावे. अशास्त्रीय व शेतकऱ्यांच्या हिताची पर्वा न करणारी गोवधबंदी लागू करून, देशाचे अतोनात नुकसान करणाऱ्यांना ताबडतोब सत्ताभ्रष्ट करण्याची गरज आहे. नाही तर देशाचे वाटोळे होईल बरे!

गोवधबंदीची देशाला गरज नाही. फक्त निवडणूकचिन्हापुरते 'गाय' नाही तर 'बैल' पुरेसे आहेत. ❑

# दोन प्रश्न
## गाय आणि गोवा
वा. दा. रानडे

गाय आणि गोवा या दोन विषयांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही; पण गेल्या काही दिवसांत हे दोन प्रश्न गाजले. त्यातून उपस्थित होणाऱ्या काही मूलभूत स्वरूपाच्या मुद्यांकडेच लक्ष वेधीत आहे.

संपूर्ण देशात गोवधबंदी व्हावी या मागणीसाठी आचार्य विनोबा भावे यांनी केंद्र सरकार याबाबत घटनादुरुस्ती करून कायदा करील असे आश्वासन पंतप्रधान मोरारजीभाईंनी लोकसभेत दिल्यानंतर पाच दिवसांनी विनोबाजींनी उपोषण सोडले. उपोषण सुटून विनोबाजींचे प्राण वाचले हे चांगले झाले; पण हा प्रश्न योग्य पद्धतीने हाताळला गेला नाही. या प्रश्नाला दोन बाजू आहेत. एक धार्मिक भावनेची आणि दुसरी अर्थशास्त्रीय; पण गोवधबंदीच्या मागणीमागे धार्मिक भावनेचाच पगडा अधिक आहे. आम्ही ग्रामीण अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातूनच या प्रश्नाचा विचार करीत आहोत असे सर्वोदयवादी सांगतात; पण अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करावयाचा तर आपल्या अर्थव्यवस्थेत पशुधनाचे स्थान या व्यापक विषयाचा एक भाग म्हणूनच गाईचा विचार झाला पाहिजे. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात गोवधबंदीचा समावेश आहे. घटनेच्या ४८ व्या कलमात म्हटले आहे: ' शेती आणि पशुसंगोपन, आधुनिक आणि शास्त्रीय पद्धतीने करण्याचा सरकार प्रयत्न करील. विशेषतः गाई, वासरे आणि इतर दुभती व भाकड जनावरे यांच्या हत्येस बंदी करून त्यांचे रक्षण व चांगल्या जातीची निपज वाढविण्यासाठी उपाय योजण्यात येतील.'

ह्या कलमांच्या शब्दरचनेवरूनच असे दिसते की, घटनेतही या प्रश्नाबाबत पूर्ण शास्त्रीय भूमिका घेतलेली नाही. भाकड जनावरांच्या हत्येलाही बंदी करावी हे शास्त्रीय दृष्टिकोनात कसे काय बसते? राज्यांकडे सोपविलेल्या विषयांच्या यादीत ( घटना परिशिष्ट ७, विषय क्रमांक १५ ) यात गोवधबंदीचा स्पष्ट उल्लेख नाही. ' पशुधनाचे जतन, रक्षण आणि सुधारणा, प्राण्यांचे रोगांना प्रतिबंध, पशुवैद्यकाचे शिक्षण व सेवा ' असे या कलमात म्हटले आहे. याचा अर्थ गाईचा त्यात वेगळा विचार केलेला नसून एकंदर पशुधनाचा भाग म्हणून त्याकडे पाहिलेले आहे. आता नव्याने घटनादुरुस्ती करताना तरी सरकार या प्रश्नावर शास्त्रीय भूमिका घेऊन भाकड, जनावरे हत्याबंदीतून वगळणार का?

गाय हा एक उपयुक्त पशु आहे ही सावरकरांची या प्रश्नावरची भूमिकाच बरोबर आहे. विख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ वि. म. दांडेकर यांनी या प्रश्नाच्या अर्थशास्त्रीय बाजू एका व्याख्यानात स्पष्ट केल्या. किती बैल, गाई, वासरे आवश्यक ते ठरवून त्यापेक्षा अतिरिक्त असतील ती कापावयास पाठवावीत. निरुपयोगी गोवंश वाढू देऊ नयेत. तीन वर्षांच्या आतली ७० टक्के वासरे, तसेच तीन वर्षांवरील गाईही उपासमारीने मरतात यावरून गोवंशसंरक्षण व संगोपनाची आपल्याकडे आबाळ होते ती तशीच चालू ठेवून गोवधबंदीची मागणी मान्य करणे ढोंगबाजीलाच उत्तेजन आहे.

पश्चिम बंगाल व केरळ गोवधबंदी करायला तयार नाहीत. त्यांना तसे करण्यास भाग पाडण्यासाठी घटनेत दुरुस्ती करून कायदा करणे हे हृदयपरिवर्तनाच्या गांधीवादी मार्गाशी विसंगत आहे. विनोबाजींच्या गांधीवादात हे कसे बसते? या दोन राज्यांच्या मतपरिवर्तनालाच गांधीवादी व सर्वोदयी कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित करायला हवे. घटनादुरुस्तीने या राज्यांवर सक्ती करू पाहणे हा राज्यांच्या स्वायत्ततेवर आघात आहे. इंदिरा काँग्रेसची अनिश्चित भूमिका लक्षात घेता घटनादुरुस्ती तरी कितपत पास होईल याची शंका वाटते.

दुसरा प्रश्न गोव्याचा. सत्तारूढ महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे तीन सभासद फुटल्याने शशिकला काकोडकर मंत्रिमंडळ गडगडले. विरोधी पक्षांना मंत्रिमंडळ बनविण्याची संधी द्यावयाची की राष्ट्रपति-राजवट पुकारून निवडणुका घ्यावयाच्या हे दोन पर्याय केंद्रापुढे होते. त्यांपैकी दुसरा केंद्राने पत्करला. राष्ट्रपति-राजवट हा शेवटचा उपाय आहे. त्यापूर्वी पर्यायी सरकार बनविण्याची संधी विरोधी पक्षांना द्यावयास हवी होती. हाती सत्ता आली असताना केंद्राच्या या निर्णयामुळे ती गमावली यावद्दल विरोधी पक्षांचा केंद्रावर रोष होणे स्वाभाविक आहे. केंद्रनिर्णयाच्या निषेधार्थ एक मेपासून असहकाराची चळवळ या पक्षांनी सुरू केली आहे.

या प्रश्नाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी. लोकशाहीचे औपचारिक संकेत आपण पाळणार, की लोकशाही अधिक परिपूर्ण करण्यासाठी काही उच्च निकष लावणार? फोडाफोडीच्या मार्गाने झालेले बहुमत हे खरे बहुमत नव्हे. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षातून जे तीन सभासद फुटले त्यांनी वास्तविक राजिनामे देऊन पुन: निवडून यावयास हवे होते. म. गो. पक्षाचे सभासद म्हणून मतदारांनी त्यांना निवडून दिले. पक्षातून फुटण्याचा अधिकार मतदारांनी त्यांना दिलेला नाही; पण राजिनामे दिल्यावर मंत्रिमंडळ होणार कसे? सत्ता मिळविण्यासाठी तर या तीन सभासदांनी बंडखोरी केली. श्री. शंकर लाड यांना मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन काँग्रेस व जनता पक्षांनी आधीच दिलेले असल्याशिवाय ते फुटले नाहीत. काकोडकर मंत्रिमंडळाचा पाडाव करणाऱ्या पक्षांवर ही टीका करताना काकोडकर-मंत्रिमंडळाचे समर्थन येथे कोणत्याही प्रकारे मला करावयाचे नाही. सत्तेचा गैरवापर, भ्रष्टाचार वगैरे दोष या सरकारच्या कारभारात होतेच. सत्तारूढ पक्षाचे सभासद फोडून गोव्यात सत्तेवर येण्याचा काँग्रेस व जनता पक्षांनी अवलंबलेला हा मार्ग या राष्ट्रीयपातळीवरील पक्षांची प्रतिष्ठा वाढविणारा खास नाही.

केंद्रातील जनता सरकार विरुद्ध गोव्यातील जनता पक्ष असा संघर्ष राष्ट्रपती राजवटीच्या निर्णयामुळे गोव्यात उभा राहिला आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाविरुद्ध केंद्रातील सत्तारूढ पक्षाच्याच एका शाखेने आंदोलन उभारणे पक्षशिस्तीशी कितपत सुसंगत आहे? ही बेशिस्त केंद्रीय नेते चालू देणार आहेत का? आंदोलनात सहभागी न होण्याचा आदेश गोव्यातील पक्षशाखेस केंद्रीय नेतृत्वाने द्यावयास हवा आणि तो न मानल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याचा खंबीरपणा दाखवायला हवा; पण केंद्रीय जनता नेत्यांतच सध्या एवढे मतभेद आहेत की, असा काही आदेश देण्याचे धैर्य ते दाखवतील असे वाटत नाही.

गोव्यातील विरोधी पक्षांनी राष्ट्रपति-राजवटीचा निर्णय स्वीकारून निवडणुकांच्या तयारीस लागणे हाच योग्य मार्ग आहे. काँग्रेस व जनता यांच्या आघाडीचा प्रयोग महाराष्ट्रातील शरद पवार गट–जनता आघाडीनंतर आता गोव्यात होत आहे. राजकीय शक्तींच्या फेरमांडणीच्या दृष्टीने ज्या हालचाली चालू आहेत त्याचाच हा एक भाग आहे. जनता पक्ष व काँग्रेस यांच्या सहकार्याबाबत राष्ट्रीय पातळीवर एवढ्यात निर्णय घेतला जाण्याची शक्यता नाही. याला नवीन राज्यातील परिस्थितीनुसार राज्यपातळीवर निर्णय घेण्याची मोकळीक राज्यशाखांना दिली जाईल. पुढच्या वर्षी गुजरात विधानसभा निवडणुकांचे वेळी फेरमांडणीचे चित्र अधिक स्पष्ट होईल. ☐

# कापड गिरणी कामगार वार्ता

## गिरणी कामगारात सध्या तरी मुख्य भेद कम्युनिस्ट विरुद्ध बिगरकम्युनिस्ट असा पडलेला आहे !

# एका संपाचा गर्भपात !

छाया दातार

१६ एप्रिलला दोन लाख कापड-कामगारांचा बेमुदत संप सुरू होणार होता. १९७४ सालच्या ४२ दिवस चाललेल्या संपाच्या आठवणी सतत येत होत्या. तो संप अनेक कारणांमुळे ऐतिहासिक ठरला होता. १९७२ साली पडलेल्या दुष्काळामुळे समुदायांच्या चळवळींना सुरुवात झाली होती. त्या वाढत्या चळवळींच्या पर्वामध्ये कापड-कामगारांच्या संपाने वर्गसंघर्ष पेटवण्यामध्ये चांगलीच भर घातली होती. त्यानंतर लगेचच रेल्वे-कर्मचाऱ्यांचा संप झाला होता. या पार्श्वभूमीवर या वेळी घडून येणारा कापड-कामगारांचा संपही समुदायाच्या असंतोषाला मोठ्या प्रमाणावर तोंड फोडण्यासाठी कारणीभूत होण्याची शक्यता होती. त्याचबरोबर आजपर्यंत कापडधंद्यामध्ये बी. आय्. आर. कायद्यामुळे कामगार चळवळीबाबत आणि ट्रेड युनियनच्या सर्वसाधारण कार्यपद्धतीबाबत जी कोंडी झाली होती तीही फुटेल आणि नव्या पद्धतीच्या कामगार-चळवळीची वाट मोकळी होईल अशीही शक्यता होती आणि या दोन घटकांबरोबरच कापडधंद्यामध्ये बरेच आधुनिकीकरण झाल्यामुळे कामगारांच्या पगाराची व इतर सवलतींची पुनर्रचना होईल आणि बरीच वर्षे अनियमित पगार व अनियमित कामाचा बोजा याखाली गांजलेला कापड-कामगार, ताठ मानेने उभा राहील, त्याला थोडा फार न्याय मिळेल अशीही शक्यता होती. विशेषतः नुकतीच प. बंगालमध्ये ४९ दिवस लढून ज्यूट कामगारांनी आपल्या बरेच दिवस पडून राहिलेल्या पुष्कळशा मागण्यांची तड लावून घेतली आणि धंदा अरिष्टात असूनही २२ टक्के पगारवाढ मिळवून घेतली. या अनुभवामुळेही या वेळी कापडधंद्यामध्ये वेगळे काही घडेल, एक नवे पर्व सुरू होईल असे वाटत होते. कामगार जोरात होते. अनेक अर्थाने १६ एप्रिलचा मुहूर्त चांगला काढला गेला होता. जत्रेचा हंगाम, लग्नकार्याचा हंगाम त्यामुळे घरी बसणे फारसे जड जाणार नव्हते. करार संपून दोन वर्षांहून अधिक काळ लोटला होता. संताप तीव्र होत होता. चरणसिंगांच्या अंदाजपत्रकामुळे महागाई वाढली होती आणि याबरोबरच धंदाही तेजीत चालला होता. एकाही गिरणीमध्ये एकही साचा बंद नव्हता. उलट जेवणाच्या सुट्टीमध्येही साचे चालविण्याची जबरदस्ती होती. निर्यातीच्या मागण्या रोज वृत्तपत्रांमध्ये येत होत्या. बहुसंख्य कामगार संपाच्या मूडमध्ये होते हिसका दाखविलाच पाहिजे; झगडल्याशिवाय कधी काही मिळालेले नाही; याही वेळी जबरदस्त ठोका टाकला पाहिजे ही भावना बहुसंख्यांच्या मनामध्ये होती.

आणि असा हा दोन लाख कामगारांचा महत्त्वपूर्ण ठरणारा संप १४ तारखेला मागे घेतला गेला असे वृत्तपत्रांतून जाहीर झाले. १४ एप्रिलच्या 'नवाकाळ'चे प्रमुख शीर्षक होते 'जॉर्ज फर्नांडिस झिंदाबाद ! शरद पवार झिंदाबाद !' 'लोकसत्ते'चे शीर्षक होते, 'गिरणी-कामगारांच्या झगड्याचा युगप्रवर्तक निकाल !' 'दसऱ्याला सोने लुटावे तसा निवाडा.' लोकमाध्यमांनी असे जणू गृहीत धरले की, जॉर्ज फर्नांडिस आणि शरद पवार यांनी दिलेला निकाल बहुसंख्य कामगारांना पसंत आहे, एवढेच नव्हे तर पूर्णपणे समाधानकारक आहे. इतर सर्व विभागात या निकालाचे स्वागत झाल्याचा सूर दिसून आला आणि दोन लाख कामगार रस्त्यावर न उतरता, कायदा व सुव्यवस्था यांचा प्रश्न उत्पन्न न होता हा प्रश्न सुटल्याबद्दल सर्वच शांतताप्रेमी लोकांनी सुटकेचे निःश्वास टाकले आणि शरद पवार व जॉर्ज फर्नांडिस यांचे अभिनंदन केले.

या सगळ्या समाधानात आणि रकानेच्या रकाने भरभरून येणाऱ्या स्वागताच्या मजकुरातच १५ एप्रिलला 'नवा काळ' आणि 'लोकशक्ती' यांच्या कोपऱ्यात छोटीशी बातमी आली— १६ एप्रिल रोजी एक दिवसाचा निषेधसंप करण्याचे गिरणी-कामगारांना आवाहन. १६ तारखेला वृत्तपत्रांमध्ये इंटकप्रणीत राष्ट्रीय मिल मजदूर संघ आणि जनता पक्षप्रणीत गिरणीकामगार सभा यांची कामगारांना गिरण्या चालू ठेवण्याची व कम्युनिस्टांचे आवाहन उधळून लावण्याची हाक देणारी दोन पत्रके प्रसिद्ध झाली आणि १७ एप्रिलच्या वृत्तपत्रांतील बातम्यांवरून आणि परस्परविरोधी दावे करणाऱ्या पत्रकांवरून असे सिद्ध झाले की, ६० टक्के कामगारांनी निषेधसंपामध्ये भाग घेतला. अर्थातच या सगळ्या घटनांमध्ये 'बेमुदत संपलढ्याचा' गर्भपात झाला आणि कामगारांच्या मनातील धुमसणारा असंतोष उद्रेक न होता दबला गेला, संघर्षाची जाणीव कच्ची झाली, ही या सर्व घटनांची तात्कालिक निष्पत्ती आहे

### असे का झाले ?

कामगार चळवळीतील या महत्त्वाच्या घटनेबद्दल बरीच चर्चा व्हायला हवी. यामध्ये केवळ कामगारांनी किती मागितले आणि काय मिळाले याचे गणित मांडायचे नसून कामगार व कामगार संघटना यांच्यातील परस्पर संबंध, त्यांचा कामगार-चळवळीवर होणारा परिणाम या घटनांद्वारा समजावून घ्यायचा आहे आणि त्याचबरोबर कामगार-चळवळीवर सरकार काय परिणाम घडवून

आणू शकते, विशेषत: सध्याच्या महाराष्ट्रातील पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार आणि केंद्रीय जनता पक्षाचे सरकार यांची प्रवृत्ती काय हेही या घटनांद्वारे उघड होते. त्यातही एके काळचे संपसम्राट जॉर्ज फर्नांडिस, सध्याचे उद्योगमंत्री यांचा यातील महत्त्वाचा वाटा बरेच काही शिकवून जातो.

मुंबई औद्योगिक संबंध कायद्यानुसार कापडधंद्यामध्ये सर्व धंद्यामध्ये मिळून एकच युनियन असली पाहिजे असा नियम आहे. या कायद्याअंतर्गत गुप्त मतदान पद्धतीने कामगारांना आपली युनियन ठरविण्याचा अधिकार नाही. मान्यताप्राप्त युनियनचा दर्जा मिळविण्यासाठी 'आम्ही प्रत्येक तंटा वाटाघाटीने सोडवू, संपाचा मार्ग स्वीकारणार नाही' असे गिरणीमालक असोशिएशनला लिहून द्यावे लागते आणि याहीउप्पर जाऊन मालकसंघटनेची 'मान्यता' घ्यावी लागते. केवळ एकूण संख्येच्या ३० टक्के कामगार युनियनचे सभासद झाल्यास आपोआप मान्यता मिळण्याचा नियम या कायद्यात नाही. एकदा मान्यता मिळाल्यावर मात्र या कायद्याअंतर्गत युनियनला इतके सर्वाधिकार मिळतात की युनियन कामगारांना डावलून त्यांच्या डोक्यावर बसू शकते आणि कामगारांच्या 'ऐवजी' (Substitute) म्हणून काम करू शकते. कामगारांकडून लाचलुचपत घेण्यासाठी उत्तम वातावरण तयार होते व मालकांची हस्तक म्हणूनही काम करणे सहज शक्य होते.

१९४६ साली काँग्रेसने लढविलेल्या स्वातंत्र्यलढ्याच्या पुण्याईचा फायदा घेऊन राष्ट्रीय मिल मजदूर संघ या काँग्रेसप्रणीत युनियनचा गिरणीधंद्यात प्रवेश झाला व तिला मुंबई औद्योगिक संबंध कायद्याच्या अंतर्गत मान्यता मिळाली. कम्युनिस्ट पक्षाच्या गिरणीकामगार युनियनचा केवळ कायदेशीरदृष्ट्याच पराभव झाला असे नसून १९४२ सालातील चुकीच्या राजकीय धोरणाचा परिणाम म्हणून कामगारांचा तोपर्यंत असलेला पाठिंबाही बऱ्याच प्रमाणात कमी झाला होता. तेव्हापासून आजपर्यंत तीस वर्षांहून अधिक काळ आर्. एम्. एम्. एस्. ने गिरणीकामगारांवर अधिराज्य गाजविले आहे आणि गिरणीकामगारांची आर्थिक परिस्थिती मागासलेली ठेवण्यात व गिरणीच्या अंतर्गत भयंकर दडपणुकीचे वातावरण कायम ठेवण्यात तिचा मोठा वाटा आहे.

सध्या गिरणी-कामगारांमध्ये पाच युनियन्स काम करतात. वर सांगितलेल्या आर्. एम्. एम्. एस्. या संघटनेचे अध्यक्ष श्री. वसंतराव होशिंग व कार्यवाह भाई भोसले सध्या इंदिरा काँग्रेस पक्षाचे आहेत. मुंबई गिरणीकामगार युनियन ही १९५९ साली संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांनी एकत्र येऊन तयार झालेली संघटना. एका दिवसात ९०,००० रुपये जमवून ९०,००० कामगार-सभासद नोंदविण्याचा विक्रम या संघटनेने त्या वेळी केला होता. आज ही भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी व आयटकशी संलग्न आहे. लाल बावटा मिल मजदूर युनियन ही सिटूशी आणि पर्यायाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न युनियन. मुंबई कापड कामगार संघटना हीही मुंबई गिरणीकामगार युनियनमधून फुटून तयार झालेली लाल निशाण पक्षाशी संलग्न युनियन. या चार संघटनांची पाळेमुळे तशी गिरणी-कामगारांच्यात खोल रुजलेली. गिरणी-कामगारांचे प्रश्न, त्यांची ताकद त्यांच्या जाणिवा, व्यवहार करण्याची पद्धत, थोडक्यात गिरणी-कामगारांच्या हालचालींचे गतिशास्त्र या संघटनांना बऱ्याच प्रमाणात परिचित. या चारांहून अगदी वेगळी व नवी संघटना १९७७ साली गिरणी-कामगारांच्यात तयार झाली, ती आहे गिरणीकामगार सभा. जनता पक्षाच्या लाटेचा फायदा घेऊन आणि आर. एम. एम. एस. बद्दलच्या असंतोषाच्या पायावर बी. आय. आर. कायद्यात गुप्त मतदानपद्धतीचे कलम घाला ही मागणी घेऊन या संघटनेने दोन वर्षांच्या आत कामगारांच्यात चांगला पाठिंबा मिळविला. आर. एम. एम. एस. मधील काही असंतुष्ट व्यक्ती, कारकुनांच्या सुती मजदूर संघ या जनसंघप्रणीत युनियनमधील कार्यकर्ते व काही समाजवादी पक्षाला मानणारे कार्यकर्ते या नव्या संघटनेमध्ये सामील झाले. युक्रांदचे दोन कार्यकर्तेही पूर्ण वेळ या संघटनेचे काम करीत असतात. या संघटनेमध्ये अशा तऱ्हेने विविध राजकारणाच्या छटा असलेली मंडळी असूनही परिस्थितीच्या दडपणाखाली या संघटनेला सतत लढाऊ भूमिका ठेवावी लागली, तरच सामान्य कामगारांचा पाठिंबा मिळणे शक्य होते. मात्र या संघटनेच्या विरोधाचे टोक केवळ मालकांविरुद्ध नसून प्रतिस्पर्धी सत्ताधारी संघटना आर. एम. एम. एस. हिच्याविरुद्ध सरकारी पाठिंबा व हस्तक्षेप यांच्या आधारे कामगारांचे प्रश्न सोडविण्याकडेही कल दिसून आला आहे.

## घटनांमागील राजकीय अन्वयार्थ

या पार्श्वभूमीवर, घडलेल्या घटनांमधील राजकारण व त्यामध्ये कामगारांचा अपरिहार्यपणे गेलेला बळी समजून येईल. १९७६ साली डिसेंबरमध्ये प्रथम केलेला करार संपुष्टात आला. पहिली दोन वर्षे बोनसचा हक्क पुन:प्रस्थापित करण्यात गेली. आणीबाणीच्या काळात झालेली कामवाढ, कामगार-कपात यांच्या प्रश्नांसाठी लहान मोठे झगडे ठिकठिकाणी झाले. १९७९ च्या जानेवारीपासून नव्या कराराचा व पगारवाढीचा प्रश्न गाजू लागला. आर. एम. एम. एस. मान्यताप्राप्त युनियन असल्याने त्यांनी मालकांना व औद्योगिक न्यायालयाला रीतसर नोटीस पाठविली होती; पण मालकमंडळी बोलायला तयार नव्हती. संघालाही लोकांच्या मनातील मागण्यांचा अंदाज येत नव्हता. इतर युनियन्समध्ये ज्याप्रमाणे जनरल बॉडी बोलावून चार्टर ऑफ डिमांडस् तयार केल्या जातात व मालकांना पाठवून वाटाघाटींना सुरुवात होते त्याप्रमाणे दोन लाख कामगारांना एकत्र बोलावून चार्टर ऑफ डिमांडस् तयार करणे शक्य नसते. त्याच्याऐवजी जी लोकशाही पद्धत वापरायला हवी ती कधीही संघाने वापरली नाही. शिवाय काँग्रेस पक्षाचा पराभव आणि संघाची स्वत:ची भ्रष्टाचारी प्रतिमा यामुळे त्यांचे नीतिधैर्य खचलेले होते. जानेवारीपासून संघाने सर्वसाधारण मागण्यांबद्दल आपल्या कार्यकर्त्यांमार्फत अफवा पसरवायला सुरुवात केली. इतरही युनियन्सनी मागण्यांच्या प्रश्नांवर मोहीम सुरू केली; पण व्यवस्थित तयार केलेला चार्टर ऑफ डिमांडस् कोणीच देऊ शकत नव्हते. गिरणीकामगार सभेच्या अंतर्गत गुप्त मतदानपद्धतीने मान्यतेचा प्रश्न प्रथम घ्यावा की मागण्यांचा प्रश्न प्रथम घ्यावा, याचा निर्णय होत नव्हता. मागण्यांच्या प्रश्नाची जबाबदारी घ्यायला त्यांना पहिल्यापासून भीती वाटत होती. कारण कामगारांच्या अपेक्षा, आकांक्षा वाढलेल्या आहेत. इतर धंद्यांतील

करार वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असतात, त्यांचा प्रभाव कामगारांवर असतो. यामध्ये जनसंघाच्या गटातील लोकांचे दडपणही असायची शक्यता होती. कारण मालकविरोधी जहाल भूमिका घेणे त्यांना नेहमीच कठीण जाते. मागण्या सहजासहजी मिळणे शक्य नाही. विशेषत: मुंबईच्या गिरणीमालकांची संघटना चांगलीच संघटित आहे. तेव्हा कामगारांच्या अपेक्षा पूर्ण करायच्या तर लढा करूनच मागण्या मिळवाव्या लागतील हे स्पष्ट होते. म्हणूनच, 'मान्यते'चा प्रश्न महत्त्वाचा करून त्याची तड लावून त्या विजयाच्या पुण्याईच्या जोरावर मागण्यांसाठी वाटाघाटी करण्यासाठी अवधी मागून घेता येईल व मग तो प्रश्न रेंगाळण्यात कामगारांचे अवसान हळूहळू कमी होत जाईल व वाटाघाटींतून मिळालेल्या मागण्या कामगार मान्य करतील; काही प्रमाणात सरकारी दडपणाचा फायदा करून घेऊन मालकांनाही थोडे जुळते घ्यायला लावू शकू असा त्यांचा अंदाज असावा.

मात्र हे राजकारण इतके सोपे नाही. शरद पवारांच्या गटाला सध्या तरी जनता पक्षाच्या युनियनला मान्यता मिळवून देण्याची घाई नाही. राष्ट्रीय मिल मजदूर संघाची मंडळी सध्या इंदिरा-कॉंग्रेसमध्ये असली तरी अजून कॉंग्रेसऐक्याचा निर्णय लागलेला नाही. तेव्हा त्यांना पूर्णपणे उडवून टाकण्याची शरद पवारांची इच्छा नसणार. शिवाय गिरणी-कामगार हा मुख्यत: कोकण व प. महाराष्ट्र या विभागांतून बहुसंख्येने आल्यामुळे त्याच्याबाबतीत घेतलेल्या निर्णयाचे राजकीय परिणाम महाराष्ट्रातील एका मोठ्या विभागावर होतात. किंबहुना या दोन-तीन घटकांमुळे गिरणी-कामगारांचा महत्त्वाचा कोणताही झगडा हा राजकीय ठरतो. एक तर सगळा धंदाच्या धंदा हलतो. दोन लाख लोक रस्त्यावर येणे, रोजच्या शिस्तीतून बाहेर पडणे ही महत्त्वाची घटना असते. पुन्हा गिरणविभाग शहराच्या मध्यभागी असल्याने गडबडी झाल्यास शहराच्या एकूण व्यवहाराला बाधा उत्पन्न होते. शिवाय एवढ्या मोठ्या समुदायाचा पाठिंबा मिळविणे व त्यावर नियंत्रण मिळविणे हे लोकशाही राजकारणाला आवश्यक ठरते.

गिरणी-कामगारांनाही स्वत:च्या या महत्त्वपूर्ण अस्तित्वाची जाणीव झालेली आहे. मात्र त्याचबरोबर संख्येमुळेच त्यांच्यामध्ये एकजूट होणे व स्वत:च्या पायावर उभे राहणे हेही कठीण होऊन बसले आहे. एका गिरणीला हलताच येत नाही. एकदम ६० गिरण्यांतील कामगारांना घेऊनच झगडा उभा करावा लागतो. त्यामुळे अंतर्गत स्वावलंबी युनियन उभी करण्याचा विचार तो करू शकत नाही. त्याला बाहेरच्या मदतीची गरज लागते. १९४७ सालापर्यंत कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली हा कामगार राजकीयदृष्ट्या खूप जागृत झाला होता. नाविकांच्या बंडांत त्यांनी चांगलीच कामगिरी बजावली; पण नंतर मोठ्या प्रमाणात या कामगारवर्गाची सामाजिक रचना बदलली. सातारा, भोर भागातील कामगार, उत्तर प्रदेशातील ब्राह्मण व इतर जमातींचे कामगार व तेलगु कामगार मुंबईत काम करायला आले. भारतीय भांडवलशाहीच्या वाढीला मोकळी वाट काही प्रमाणात मिळाली व तिचे नेतृत्व करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाला कापडकामगारांच्यात पाया मिळाला. वेळोवेळी असंतोषाला वाट फोडण्यासाठी या कामगारांनी कम्युनिस्टांची मदत घेतली; पण बराचसा विभाग ह्या संघाला बांधलेला आणि दबलेला राहिला. त्यामध्ये पुन्हा कम्युनिस्टांच्या राजकारणाला जनतेमध्ये जसा पाठिंबा ओसरत चालला त्याचा परिणाम कापडकामगारांवर होत राहिला— इतर ठिकाणी युनियनच्या रोजच्या कामकाजावर पक्षाच्या एकूण राजकीय धोरणाचा परिणाम ताबडतोबीने होत नसतो. कापडकामगारांची पहिल्यापासूनच पक्षीय आधारावर चालण्याची परंपरा पडल्याने आताही १९७७ साली जनता पक्ष सत्तेवर आल्याचा परिणाम कापडकामगारांवर झाला. कॉंग्रेसची सर्वाधिकारशाही उलथून टाकायला जशी जनता पक्षाची मदत झाली तशीच गिरणधंद्यातील संघाची सर्वाधिकारशाही काढून टाकायला जनता पक्षाच्या युनियनची मदत होऊ शकेल, लोकमताचे वारे शिडात घेऊन त्या आधाराने थोडेसे पुढे जाता येईल असा व्यवहारवादी विचार अनेक जाणत्या कामगारांनी केला. किंबहुना 'कापडकामगार हा राजकीय आहे,' असे विधान पुष्कळदा केले जाते. हे विधान फार अस्पष्ट ठरते. क्रांतिकारकदृष्ट्या तो जागृत असता तर स्वत:च्या पायावर उभे राहून वेळप्रसंगी कम्युनिस्ट पक्षाची सुधारणावादी धोरणे झुगारून देऊन नव्या क्रांतिकारक राजकीय प्रवाहाला त्याने सुरुवात केली असती. सध्या मात्र तो परिस्थितीमुळे असहाय आहे आणि राजकीय पक्षांवर अवलंबून राहून ज्याच्या हातून आपल्या पदरात काही पडू शकेल त्याची पाठ राखायची, या व्यावहारिक पद्धतीने तो जातो आहे. म्हणूनच देशातील राजकीय घटनांकडे इतर धंद्यांतील कामगारांचे नसेल इतके बारकाईचे लक्ष कापडकामगार ठेवीत असतो. मात्र बी. आय्. आर्. कायद्यामुळे त्याला पंख कापले गेल्याची भावना असते आणि दुसऱ्याच्या मदतीशिवाय आपण उडू शकणार नाही असेही वाटत असते.

## एकजुटीची अपरिहार्यता

अशा परिस्थितीत संघ सोडून इतर चार संघटना या वेळी पगारवाढीच्या मागण्यांसाठी एकत्र आल्या. किंबहुना त्यांना एकत्र यावे लागले. गिरणीकामगार सभेला कळून चुकले की, या वेळी मागण्यांचा जो निर्णय होईल त्यामध्ये कम्युनिस्ट संघटनांना गोवून घेतले नाही तर त्यांच्या जहाल भूमिकेमुळे कामगारांचा असंतोष त्यांच्याभोवती गोळा होईल व वाटाघाटी होऊन करार झाला तरी तो उधळून लावला जाईल. केवळ स्वत:च्या ताकदीवर संघाला मागण्यांवर विरोध करता येईल याचीही त्यांना खात्री नव्हती. म्हणून १३ फेब्रुवारी रोजी एकत्रितरीत्या 'इशारा संप' करण्यात आला. त्याला ९५ टक्के कामगारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि कामगारांच्या तीव्र भावना सिद्ध झाल्या आणि याचमुळे पुढील वाटाघाटींमध्ये लक्ष घातले पाहिजे याची जाणीव शरद पवारांनाही झाली. संघालाही एका अर्थाने या संपाचा फायदाच होणार होता. कारण मालकांवर दबाव आणण्यासाठी हा पुरावा होता. प्रश्न फक्त वाटाघाटी कोणाशी व्हाव्यात, कामगारांचे खरे प्रतिनिधी कोण आणि मागण्या मिळविल्याचे श्रेय कोणाला मिळावे यासंबंधीच येगार होता. त्यानंतर २९ मार्च ही बेमुदत संपाची तारीख चार संघटनांनी ठरविली. लढ्याच्या आखणीच्या दृष्टीने ते आवश्यकच होते. कारण संपलढ्याच्या दडपणाखालीच सरकार मध्यस्थी करायला तयार होते

आणि मालक-मंडळींनाही चार विरोधी संघटनांच्या मागे किती कामगार आहेत याची जाणीव होणार होती. २९ मार्चचा संप, शरद पवारांना मालकांशी बोलण्यास पुरेसा अवधी मिळाला नाही, या कारणाखाली मागे घेतला जाऊन १६ एप्रिल तारीख निश्चित झाली.

या सर्व काळात गिरणीकामगार सभेचा सवता सुभा चालू होता. १३ फेब्रुवारीच्या संपाची हाक चारी संघटनांची मिळून असूनही त्यांच्या पोस्टर्सवर केवळ त्यांच्या संघटनेचे नाव होते. त्यांची नंतर निघालेली पत्रकेसुद्धा केवळ त्यांच्या संघटनेने चालविलेला लढा या स्वरूपाची होती. त्यांच्या भाषणातून मागण्या लोकांपर्यंत नेणे, समजावून सांगणे, लोकांमध्ये रुजविणे, आग्रह तयार करणे, शिक्षण करणे असे कार्य होत नसून संपाला शिव्या, स्वतःच्या संघटनेचा गौरव व आपल्या सरकारतर्फे मागण्या मिळवून देण्याची हमी या गोष्टींचा उल्लेख असे. त्यांची कार्यपद्धती संपूर्णपणे 'वकिली पद्धतीची' होती. पक्षीय निवडणुकांच्या स्वरूपाची होती. चारी संघटनांच्या संयुक्त सभांना त्यांचा विरोध होता. चारी संघटनांच्या कामगार-कार्यकर्त्यांचे जनरल कौन्सिल किंवा संप-कमिटी करण्याच्या कल्पनेला त्यांचा विरोध होता. अंतिम निर्णय, विशेषतः शरद पवार व फर्नांडिस यांनी दिलेला निर्णय निदान अशा प्रकारच्या कामगार-कार्यकर्त्यांच्या संयुक्त बैठकीत बहुमताने स्वीकारावा किंवा फेटाळावा, या महत्त्वाच्या सूचनेलाही त्यांचा विरोध होता. कम्युनिस्टांच्या तिन्ही युनियन्सपेक्षा त्यांचे कामगार-कार्यकर्ते जास्ती असण्याची शक्यता असूनही लोकशाही पद्धत त्यांना नामंजूर होती. बाहेर लोकशाहीचा, गुप्त मतदानपद्धतीचा आग्रह धरणारी ही संघटना लढ्याच्या बाबतीत मात्र कामगारांना निर्णयाचे स्वातंत्र्य द्यायला तयार नव्हती.

याची सर्व जाणीव कम्युनिस्ट युनियन्सना असूनही त्यांना एकजूट टिकविणे परिस्थितीमुळे भाग होते. चुकीच्या राजकीय धोरणांच्या ऐतिहासिक वारशामुळे या वेळी त्यांच्या योग्य मागण्या, त्यांची लढ्याची तयारी, जहाल पवित्रा या सगळ्या गोष्टी सर्व कामगारांना त्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आणण्यासाठी पुरेशा नव्हत्या, हे त्यांना कळत होते. शिवाय त्या तिघांतही संपूर्ण मतैक्य नव्हते. कदाचित तीन युनियन्स एकत्र येऊन लाल बावटा एक झाला असे चित्र दिसले असते तरी जुन्या कामगारांना आत्मविश्वास वाटला असता. बराच प्रयत्न, प्रचार, बैठका यांनी बराचसा कामगार विभाग त्यांच्यामागे उभा राहिला असता आणि मग गिरणी कामगारसभेवर लगेचच फारसे हल्ले न करता त्यांना चुचकारत पण वेगळे व्यासपीठ स्वतंत्रपणे उभे करता आले असते; पण राजकारण आणि कामगारांच्या वागणुकीसंबंधी अंदाज यांची गणिते तिन्हीही संघटनांची वेगवेगळी! विशेषतः लालबावटा मिलमजदूर युनियनला गिरणीकामगार सभा 'मित्रसंघटना' वाटत होती. तिला सोडून काही करायची त्यांची तयारी नाही. अशा परिस्थितीमध्ये तिन्ही कम्युनिस्ट संघटनांना गिरणीकामगार सभेबरोबरच्या एकजुटीत जायचे, लोकांना गिरणी कामगारसभेचाही अनुभव घेऊ द्यायचा हेच धोरण स्वीकारणे भाग होते. म्हणूनच आधीपासूनच तुम्ही एकजुटीला मान्यता का दिली असा प्रश्न विचारणाऱ्यांना कामगारांचे गतिशास्त्र कळत नाही असेच म्हणावे लागेल. संप ही मोठी लढाई आहे. त्यामध्ये नेतृत्व एकविचाराने चालणारे पाहिजे नाही तर लढाई आपण हरू ही भावना कामगारांमध्ये मोठी असते.

## सरकारी हात

आणि १३ एप्रिलला रात्री या नेतृत्वात फूट पडली. यामध्ये मुख्यमंत्री शरद पवार व उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्यावर विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय दिल्याचा आरोप झाला. चारी संघटनांनी मुख्यमंत्र्यांना लवाद म्हणून नेमले नव्हते. केवळ या संघटना मान्यताप्राप्त नाहीत, मालक त्यांच्याशी बोलायला तयार नाहीत या पार्श्वभूमीवर बोलणी घडवून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली होती. त्यामुळेच १३ एप्रिलला मालकांनी शेवटची तयारी म्हणून २९ रुपये ३० पैसे पगारवाढीची तयारी दर्शविली त्या वेळी चारी संघटनांनी, बोलणी थांबवा आणि मध्यस्थांना अपयश आले, असे जाहीर करायला सांगितले होते. कारण चारी संघटनांनी १२५ रुपयापासून ७५ रुपये किमान वार्षिक पगारवाढीपर्यंत खाली उतरण्याची तयारी दाखविली होती. कामगारांची संपाची मानसिक तयारी चांगली असल्याचा अंदाज असल्याने ही अपुरी तडजोड मानण्याची संघटनांची तयारी नव्हती. शिवाय इतरही अनेक महत्त्वाच्या प्रश्नांबाबत या तडजोडीमध्ये विचार झाले नव्हते. मालकांनी आडमुठेपणा दाखविला होता. आश्चर्य म्हणजे जॉर्ज फर्नांडिससुद्धा १६ सरकारी गिरण्यांचे मालक असल्याच्याच पद्धतीने विचार करीत होते. कामगारांच्या अडचणींपेक्षा सरकारला किती बोजा सहन करावा लागेल हा विचार त्यांच्या बोलण्यात प्रमुख होता. असे असूनही १३ एप्रिलला संध्याकाळी ७ वाजता चारी संघटनांच्या नेत्यांना घरी परत पाठवून ९ वाजता पुन्हा बोलावले. शेवटचा प्रयत्न करतो, तुम्हाला विश्वासात घेतल्याशिवाय आकडा जाहीर करणार नाही, असे आश्वासन दिले आणि ९ वाजता मंडळी पुन्हा बंगल्यावर पोचली तेव्हा प्रेसचे वार्ताहर तेथे हजरच होते आणि सर्वांच्या हाती एकदमच सरकारी निर्णय पडला. तो निर्णय लवादाचा ॲवार्ड आहे आणि मालक व कामगारसंघटना या दोघांना बंधनकारक आहे, अशा पद्धतीची मांडणी होती. करार नसल्यामुळे संघटनांच्या पुढाऱ्यांच्या सह्यांचीही गरज नव्हती. द्विपक्षीय बोलण्यांना संधीच नव्हती. शरद पवारांबरोबर जॉर्ज फर्नांडिसही या निर्णयामध्ये सहभागी झाल्याने यापेक्षा वरील न्यायालयात जाण्याची संधीच नाही, अशीच भावना सामान्य कामगाराची होणे सहज शक्यच होते. संपासाठी संप कोणालाच नको असतो. सहज पदरात पडले तर घ्यायची तयारी असतेच. त्यातही पुन्हा सरकारबद्दल अजूनही ममत्व आहे. सरकार आपला विचार करील आणि सरकारनेच पोटावर मारले तर कोणाकडे जायचे, ही असहाय्यतेच्या पोटी येणारी भावना येथेही आहे. सरकार भांडवलदारांचे, हे भाषणातून ऐकले तरी मनात रुजले नाही.

त्याचबरोबर याबद्दल चीडही होतीच. चारी संघटनांनी एकत्र येऊन हा निर्णय उधळून लावा अशी हाक दिली असती तरी देखील ८० टक्के पाठिंबा मिळाला असता. नेतृत्व तयार आहे. त्याने कच खाल्ली नाही, माघार घेतली नाही हे कळणे फार महत्त्वाचे होते; पण तेथेच गिरणीकामगार सभेची सरकारला जपण्याची व माघार घेण्याची वृत्ती पुढे आली आणि त्यांनी चारी संघटनांची बैठक न

घता, कोणताही लोकशाही विधिनिषेध न दाखविता तेथल्या तेथ जाहीर करून टाकले, 'आम्ही निर्णयाचे स्वागत करतो!' दुसऱ्या दिवशी चारी संघनांची ठरल्याप्रमाणे बैठक झाली. तेथेही त्यांनी स्वतःचे मत लादण्याचा प्रयत्न केला व लढ्याची सांगता करण्यासाठी संयुक्त सभा घेण्याची सूचना केली. चारी संघटनांची एकजूट पक्की, भक्कम होऊ दे, आम्हाला आत्मविश्वास वाटू दे, म्हणून आग्रह धरणाऱ्या कामगारांकडे यांनी लढा होण्यापूर्वी दुर्लक्ष केले होते. कारण मग लढ्याचे श्रेय आपल्या पदरात घेणे कठीण गेले असते; पण लढा मागे घेण्यासाठी मात्र त्यांना संयुक्त जाहीर सभा हवी होती. पापामध्येही कम्युनिस्टांनाही सामील करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तो अर्थातच चुकीचा ठरला. तीन कम्युनिस्ट युनियन्सनी निषेधसंप केला आणि अपेक्षेप्रमाणे ६० टक्के यश मिळाले. कम्युनिस्टांचे रिकामे झालेले पारडे या संप-लढ्यातील प्रचार व धोरण या कामगिरीमुळे जड झाले आणि जनता पक्षाशी संबंधित गिरणी-कामगार सभेची चढती कमान तरी या कचखाऊ धोरणामुळे निश्चित थांबली. राष्ट्रीय मिल मजदूर संघामध्ये आणि गिरणीकाम-गार सभेमध्ये मूलतः काही फरक नाही. सभा नवीन असल्यामुळे, काही लढाऊ विभाग त्यांच्यामागे गेल्यामुळे ती अजून लढाऊ, कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी वाटते; पण मूलतः तिचे धोरण सरकारला पाठिंबा देणारे आणि असंतोष दाबून धरणारे, थोडथाशा सवलती मिळवून कामगारांचा पाया टिकवून ठेवणारे असेच राहील, हे या घटनांमधून कामगार शिकले तरी बरीच कमाई झाली असे मानायला हरकत नाही. त्याचबरोबर कम्युनिस्टांनाही डाव्या एकजुटीचे व कामगारवर्गाच्या एकजुटीचे महत्त्व कळले तरीही या घटना ऐतिहासिक ठरतील.

सध्या मात्र सत्ताधारी वर्गाची व पक्षांची या डावपेचांमागील समज अशी दिसते की, राष्ट्रीय मिल मजदूरसंघाने पहिल्यापासूनच कमी पगारवाढ मागून ती मिळविली व स्वतःचा अंदाज खरा ठरला अशी शेखी मिरवायला हरकत नाही. न लढता ४५ रुपये पगारवाढ मिळाली ती केवळ जॉर्ज फर्नांडिसमुळे मिळाली असे श्रेय घेऊन जनता पक्षाची गिरणी कामगार सभाही स्वतःच्या कर्तृत्वावर व कामगारांतील सत्ताधारी पक्षाकडे आशेने जाण्याच्या प्रवृत्तीवर विसंबून राहून स्वतःचे स्थान टिकवून घेऊ शकते आणि कम्युनिस्ट युनियन्सचे अंदाज चुकले, त्यांना मिळवून देता आले नाही असा प्रचार करून त्यांचे गिरणीकामगारातील स्थान उखडून टाकता येते.

बघू या कोणाचा अंदाज खरा ठरतो! कामगारवर्गातील जाणिवांची नाडी कोणी ओळखली आहे त्याची ही कसोटी आहे. राजकीय शक्तीचा समतोल कसा तयार होईल त्याचा कस येथे लागेल. गिरणी-कामगारात सध्या तरी मुख्य भेद कम्युनिस्ट विरुद्ध बिगरकम्युनिस्ट असा पडलेला आहे. ◻

# रा. मि. म. संघ आणि मुंबईतील कापड गिरणी कामगार

भाई भोसले (सरचिटणीस)

संपादक 'माणूस' यांस,

आपल्या लोकप्रिय साप्ताहिकाचा मी नियमित वाचक आहे. आपल्या दिनांक ७ एप्रिल १९७९ च्या अंकात श्री. अविनाश सहस्रबुद्धे यांनी 'गिरणीकामगारांचा बेमुदत संप' या मथळ्याखाली लिहिलेला प्रदीर्घ लेख वाचला. आपण आपल्या साप्ताहिकात गिरणीकामगारांच्या प्रश्नासंबंधी लिहिण्याची जी आस्था दाखविलीत त्याबद्दल धन्यवाद; परंतु साप्ताहिकाच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध करण्यात आलेला मथळा विकृत नि तितकाच चुकीचा वाटला. सदरील लेखात ८ गिरण्यांतील २ लाख कामगार बेमुदत संपाच्या तयारीत असल्याचा उल्लेख केला आहे; परंतु हे २ लाख कामगार ८ गिरण्यांतील नसून ५९ गिरण्यांतील आहेत. वस्तुतः 'माणूस' सारख्या प्रतिष्ठित साप्ताहिकाने एवढी ढोबळ चूक करता कामा नये; पण ती झाली आहे. लेखक श्री. अविनाश सहस्रबुद्धे यांचा या लेखाच्या निर्मितीमधील वाटा बराच कमी दिसतो. 'मुंबई कापड कामगार संघटना' (लाल निशाण गट) या संघटनेचे संघटन चिटणीस श्री. डी. एस्. कुलकर्णी यांनी 'कामगार एकजूट' या नावाचे जे चोपडे प्रसिद्ध केले होते, त्यातील बहुतेक मजकूर व चुकीची माहिती श्री. सहस्रबुद्धे यांनी वरील लेखात घुसविली आहे. त्याचबरोबर त्यांनी काही चमत्कारिक विधाने देखील केली आहेत. उदा. भारतातील कापडाच्या किंमती जपान व हाँगकाँग या देशातील कापडापेक्षा १५ टक्के जास्तच आहेत, हे विधान वस्तुस्थितीला धरून नाही. वरील दोन देशांच्या मानाने भारतातील कापडाच्या किंमती कमी असल्याने भारत परदेशात कापडाची निर्यात मोठ्या प्रमाणावर करू शकतो.

## हे असे जनता (विरोधी) सरकार

या लेखात म्हटले आहे की, श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस सरकारने बंद पडलेल्या १०८ गिरण्या राष्ट्रीयीकरणाची खास तरतूद असलेला कायदा करून ताब्यात घेतल्या; परंतु आज जनतेच्या नावाने राज्यावर आलेले जनता सरकार व कामगार चळवळीतून पुढे आलेले आजचे उद्योगमंत्री मात्र वरील कायदा अंमलात आणावयास तयार नाहीत. राष्ट्रीयीकृत गिरण्यांना ७७ साली ६० कोटी रुपये तोटा झाला, ७८ साली ३५ कोटी रुपये तोटा झाला, तर मार्चमध्ये संपलेल्या वर्षात या गिरण्यांनी साडेतीन कोटी रुपये फायदा केला आहे. तरीदेखील जनतेच्या नावाने राज्य करणाऱ्या सरकारने मालकांना मोकळे रान ठेवले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

७४ सालातील ४२ दिवसांच्या संपाचा जो इतिहास श्री. सहस्रबुद्धे

यांनी दिला आहे, तो वर उल्लेख केल्याप्रमाणे मुंबई कापड कामगार संघटनेने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या चोपडयावरून सरळसरळ उचललेला आहे. संपूर्णपणे खोटी व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी विधाने त्यात केली आहेत. त्यात म्हटले आहे की, '४२ दिवसांच्या संपलढ्याची पहिली कमाई म्हणजे संप होऊ नये यासाठी संपाआधीच गिरणी मालक संघ व राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्यात झालेला पहिला करार!' या कराराने कापड कामगारांच्या मूळ पगारावर किमान ८ टक्के पगारवाढ देण्यात आली, हे विधानच मुळात खोटे आहे. २०० महागाई निर्देशांकावर जो २२१·६० पैसे इतका महागाई भत्ता येत होता तो पगारात समाविष्ट करून व त्यात मूळ पगार ४० रुपये मिळवून कामगारांचा किमान पगार २६१ रुपये ६० पैसे धरण्यात येऊन त्यावर ८ टक्के पगारवाढ देण्यात आली. त्यामुळे तळाच्या कामगारांचा किमान पगार २८२ रुपये ५२ पैसे झाला. १ जानेवारी १९७४ पासून तो त्यांना मिळू लागला. त्यासाठी २८ डिसेंबर १९७३ रोजी मुंबई औद्योगिक कायद्याच्या नियम ४४ (१) याप्रमाणे राष्ट्रीय मिल मजदूर संघ व गिरणी मालक संघ यांच्यात झालेल्या कराराची लेबर कमिशनर व रजिस्ट्रार ट्रेड युनियन यांच्या कार्यालयात नोंदली गेलेली प्रत पुरावा म्हणून उपलब्ध आहे.

## वडाची साल पिंपळाला

त्यानंतरही असेच बेफाट व खोटारडे विधान लेखकाने केले आहे. 'प्रत्यक्ष संप चालू असता तो फोडण्यास मदत व्हावी यासाठी संपाच्या २७ व्या दिवशी महागाईभत्त्याचा एक महत्त्वाचा करार राष्ट्रीय मिल मजदूर संघ व गिरणी मालक संघ यांनी घोषित केला.' हे विधान धादांत खोटे असून लेखकाचे अज्ञान प्रकट करणारे आहे. लेखकाला स्वतःला त्याचा अर्थ समजलेला नसताही त्याने कापड कामगार संघटनेच्या चोपडयावरून वरील हास्यास्पद विधानाची उचलेगिरी केली आहे. कारण वर सांगितलेला करार २८ डिसेंबर १९७३ साली झाला. त्यात चक्क म्हटले आहे की, २०० महागाई निर्देशांकावर येणारा महागाईभत्ता २२१ रु. ६० पैसे अधिक जुना मूळ पगार ३० रु. अधिक पहिल्या वेतनमंडळाने दिलेले १० रु. असे एकूण २६१ रु. पगार होतो व त्यावर ८ टक्के पगारवाढ दिली तर सुधारित किमान पगार २८२ रु. ५२ पैसे होतो. त्यावर चढत्या भाजणीने महागाई भत्ता (Variable Dearness Allowances) मिळण्याची तरतूद देखील २८ डिसेंबर १९७३ लाच झालेल्या करारात करण्यात आली आहे. महागाई-भत्त्याच्या बाबतीतील या आदर्श व अभिनव कराराचे महत्त्व गिरणी-कामगारांचे वयोवृद्ध नेते कॉ. डांगे यानाही समजले नाही तेथे अविनाश सहस्रबुद्धे यांच्यासारख्या पामरांची काय कथा! या चढत्या पद्धतीच्या महागाई भत्त्याच्या करारामागे एक साधे तत्त्व आहे. जसजसा कामगाराचा पगार वाढेल तसतसा त्याला महागाई भत्ता अधिकाधिक मिळत जाईल. याचा अर्थ असा की, सुधारित वेतनानुसार ४०० रु. पर्यंत पगार घेणाऱ्या कामगाराचा एक रुपया पगार वाढला तर त्यावर त्याला अधिक ५४ पैसे महागाईभत्ता मिळतो.

श्री. सहस्रबुद्धे यांनी पुढील विधानात आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शनच केले आहे. 'शिवाय दरवर्षी ४ रुपये याप्रमाणे तीन वर्षांची पगार-वाढ प्रातिनिधिक संघटनेला बाजूला सारून संपवाल्या संघटनेतील (मुंबई गिरणी कामगार युनियन) पुढाऱ्यांशी बोलणी करून मान्य करावी लागली!' या खोडसाळ विधानाचे उत्तर वरील करारातील पान नं. ५ मधील कलम ११ मध्ये दिले आहे. त्यात म्हटले आहे की, कामगारांना दरवर्षी मिळणारी ४ रु. वाढ ही ७४, ७५ व ७६ या वर्षांसाठी असेल.

## असंबद्ध विधानांची मालिका

लेखकाने अशी अनेक बेफाट विधानांची मालिका या लेखात दिली आहे. उदा. 'गेल्या १५–२० वर्षात नुकसानभरपाईच्या रकमांचे आमिष दाखवून प्रत्येक कारखान्यात अशास्त्रीय कामवाढ लादली आहे. नवीन स्वयंचलित यंत्रे बसवून कामगारांची ससेहोलपट चाल-विली आहे.' हे विधानदेखील चुकीचे आहे. कारण अशा प्रकारची कामवाढ व स्वयंचलित यंत्रे सिल्क व प्रासेसिंग उद्योगात आली आहेत, जेथे सोशॅलिस्टांची युनियन प्रातिनिधिक आहे आणि बगाराम तुळपुळे हे तिचे अध्यक्ष आहेत. वुलन धंद्यातही वरीलप्रमाणेच स्वयंचलित यंत्रसामुग्री आली. या धंद्यात डाव्या कम्युनिस्टांची युनि-यन प्रातिनिधिक असून त्यांचे पुढारी श्री. कृष्णा खोपकर हे आहेत. याचा अर्थ या तिन्ही मान्यताप्राप्त संघटना ज्या उद्योगात आहेत, तेथे नवी यंत्रसामुग्री येत आहे आणि ती कुणाला आवडो न आवडो, स्वीकारावी लागत आहे.

१९७४ च्या संपात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत पुढे काहीच झाले नाही असे जे लेखक म्हणतात, त्यात काही तथ्य नाही. बदली कामगार व स्त्री कामगार यांच्या प्रश्नांबाबत नेमलेल्या अभ्यंकर समितीच्या अहवालाबाबतही काही झाले नाही हे जे लेखक म्हणतो ते पूर्णपणे चुकीचे आहे. राष्ट्रीय मिल मजदूर संघाने बदली काम-गारांना कायम करण्याबाबत व स्त्री-कामगारांना संरक्षण देण्याबाबत २७ मे १९७७ रोजी गिरणी मालक संघाला नोटीस दिली. त्यानंतर १८ ऑगस्ट १९७८ ला बदली कामगारांना कायम करण्याबाबत गिरणी मालक संघ व राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्यात समझौता झाला. त्यानुसार गिरणी मालक संघाने आपल्या सभासद गिरण्यांना परिपत्रक पाठवून बदली कामगारांना कायम करण्याचा आदेश दिला. त्या आदेशाची अंमलबजावणी १ जानेवारी १९७८ पासून करावी असेही कळविले.

स्त्री-कामगारांना गिरणीतील विशिष्ट खात्यात जागा राखून ठेवाव्यात, असाही करार ३१ मार्च १९७८ ला झाला व त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे.

सरकारी गिरण्यांतील कापड-खात्यात काम करणाऱ्या काम-गारांच्या अनेक तक्रारी होत्या. उदा. सुताची बिमे नसल्यामुळे साचे बंद राहणे, उजेडाची नीट व्यवस्था नसणे, सूत खराब येणे, वगैरेमुळे कामगारांचे पगारही काही वर्षे कमी येत असत. त्यासाठी संघाने सतत प्रयत्न करून मुंबई औद्योगिक हितसंबंध कायद्यान्वये संघ व एन. टी. सी. (नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशन) यांचा एक लवाद नेमला. या लवादावर मी स्वतः, तसेच एन. टी. सी.चे दोघे संचालक

श्री. एम. एस. दिवेकर व श्री. डी. आर. नाईक हे होते. आम्ही एन. टी. सी.च्या १० गिरण्यांतील कापड-खात्याची प्रत्यक्ष पहाणी करून तातडीने निर्णय दिला. त्यामुळे वरील प्रकारच्या कामाच्या निकृष्ट परिस्थितीमुळे साचेवाल्यांचे जे नुकसान होत होते त्याबद्दल आता त्यांना १० ते १६ रुपयांची पगारवाढ मिळणार आहे तसेच जॉबर्सना २० रुपये पगारवाढ मिळणार आहे.

### फिनिक्स मिलचा प्रश्न

फिनिक्स मिल २१ सप्टेंबर १९७७ ला आगीच्या भक्ष्यस्थानी पडली व तिचा स्पिनिंग विभाग संपूर्णपणे जळून खाक झाला; परंतु संघाने मालकांवर दडपण आणून उरलीसुरली यंत्रसामुग्री आग लागल्यापासून आठवड्याचे आत सुरू करण्यास भाग पाडले. त्यानंतर गेले दीड वर्ष सतत महाराष्ट्र शासन व केंद्र शासन, विशेषत: त्या वेळचे व्यापारमंत्री ना. मोहन धारिया व सध्याचे उद्योगमंत्री ना. जॉर्ज फर्नांडिस यांचेकडे खेटे घातले; परंतु श्री. सहस्रबुद्धे यांनी म्हटल्याप्रमाणे केंद्र व राज्य शासन अशी दोन्ही सरकारे ती गिरणी ताब्यात घ्यायलाही तयार नाहीत, की मालकाला आर्थिक मदत आणि कर्जही मिळवून द्यायला तयार नाहीत. त्यामुळे त्या कामगारांचे भवितव्य अंधारात आहे, ही गोष्ट जरी खरी असली तरी आम्ही आमचे प्रयत्न जारी ठेवणार आहोत.

सीताराम मिलची लेखकाने दिलेली कहाणी खरी आहे; पण तेथील कापड-खात्यात जे बदली कामगार काम करीत होते त्या ५२ कामगारांना नुकतेच आम्ही कायम केले आहे. तसेच तेथील वयोवृद्ध कामगारांना त्यांची सर्व हक्काची देणी दिल्याशिवाय त्यांना आम्ही बंद करून देणार नाही. कामगारांची राहिलेली देणी देण्याबाबतही आम्ही कंपनीला कार्यक्रम आखून दिलेला आहे. त्याप्रमाणे कंपनी देणी देण्याची व्यवस्था करीत आहे.

चायना मिलमध्ये जे ऑटोमॅटिक साचे येताहेत त्याबाबतही जाऊ इच्छिणाऱ्या कामगारांना पूर्ण नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था आम्ही केली आहे. तसेच जे कामगार कामावर राहू इच्छितात त्यांना नव्या यंत्रावर शिकण्याची संधी व त्यांचा सध्याचा पगार देण्यास कंपनीस सांगितले आहे.

सुपारीबाग (इंदु मिल नं. १) या सरकारी गिरणीत जुने साचे, अपुरा प्रकाश, साच्याभोवती फिरायला अडचण अशा अनेक गोष्टींमुळे कामगारांची दमछाक होते व कामगारांचा पगारही कमी येतो असे लेखकाने म्हटले आहे; परंतु त्यांच्या या प्रश्नांच्याबाबतीत वर उल्लेख केलेल्या लवादाने जो निर्णय दिला आहे, त्याचा फायदा या कामगारांना मिळून त्यांचा पगार १० ते १६ रुपये वाढणार आहे व त्यांची तक्रार दूर झाली आहे. त्यांच्या ऑटो कपडाखात्यातील प्रश्नही वरील लवादाने हाती घेतला आहे.

सहस्रबुद्धे यांनी आपल्या लेखात संघाला मालकधार्जिणे ठरवण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून हा प्रपंच आम्हाला करावा लागत आहे हा लेख लिहिण्यापूर्वी श्री सहस्रबुद्धे यांनी आमच्या युनियनच्या कार्यालयात पायधूळ झाडली असती, तर त्यांना आवश्यक असणारी माहिती आम्ही आनंदाने पुरविली असती. □




पुस्तके

# रॉय किणीकरांची ‘ रात्र’ आणि ‘ उत्तररात्र ’

## जेव्हा स्वप्नांना आणि वेदनेला अंधाराची (आणि पुनःप्रस्थानाची सुद्धा) चटक लागते ... !

तेव्हा काळोखाचे वस्त्र झिरझिरीत होते. आणि विसविशीत स्वप्नांचा सल, वेदनेची वीणा विणण्यासाठीच जागवला जातो. अशा वेदनेचा खुरटा अंकुर रुजावा कसा ? तिच्या-तून भळभळणारा दुःखाचा पाट नित्यनूतन वाटावा कसा ? आणि ती ज्या स्वप्नांवर पोसलेली आहे, ती जीर्णजुनी स्वप्ने कव-टाळण्याइतके तरी भाबडेपण कुठून उधार आणावे ? नक्षीदार प्याल्यातील तप्त, नशीले मद्य इतके(च) चढावे की काजळीनेही आसमंत अंधारून यावा ? रक्तचंदनी पदर-प्रोताचा रंग एवढ्यात उडावा ? अंजिरी चिरी आणि पापणीत ओघळलेले निळे स्वप्न इतक्यात विसकटून जावे ? भरदार कुसुंबी काळाची लक्तरे व्हावीत ? मग शब्दांनी कशाचा आधार शोधावा ? इमान राखावे ? आणि तेच जर परके झाले तर ‘ रात्री ’च्या गडद, थंडगार अंधाराने ग्रासून तरी कसे टाकावे ? घुमसणाऱ्या एकलेपणाच्या ठिण-गीने स्वत्व उजळावे कसे ?

हा देह तुझा, पण देहातिल तू कोण
हा देह तुझा, पण देहाविण तू कोण
हा देह जन्मतो, वाढत जातो सरतो
ना जन्म मरण ना देहातिल तो म्हणतो ।।
(‘ उत्तररात्र ’ पृ. ६२)

अशा सनातन प्रश्नाने भारून टाकलेल्या या अंधाराला प्रकाशाचा कोंब फुटतच नाही. ‘ रात्र ’ आणि ‘ उत्तररात्र ’ अतृप्तीचा गडद करते आणि स्वदेशीच्या या निर्वासितासाठी असे अवेळीच गलबलून येते. शब्दांनीही साथ सोडली तर काय करावे ?

पण प्रश्नांच्या सनातनत्वाचे आणि शब्दांच्या बेभरवशी कुळाचे ज्ञान या कवीला नाही असे तरी कसे म्हणावे ? कारण,

मी कोण ? कोठला ? कुठे मला जायाचे ?
का एकच गाणे हेच तुला गायाचे
ते जुने प्रश्न आणि जुनाच त्यांचा बाण
प्राचीन तिरडिला नव्या सुतळिचा ताण
(‘ उत्तररात्र ’ पृ ५५)

या अगतिकतेला तो साक्षात् भिडलेला आहे. मग कधी ती वादळ-वाऱ्यांशी लय न जमवता आल्यामुळे येत असेल (पृ. ९ ‘ उत्तररात्र ’), तर कधी काजळकाठावरील धुंदी ओसरल्यामुळे आलेली असेल ! (‘ रात्र ’ पृ. २१, २७, ५३) कधी तरी व्यवहाराच्या पीळदार दोराने करकचून आवळलेली मान मोकळी करताना झालेल्या तीव्र धगधगलेल्या संतापातून तिचा उगम झालेला असेल. (‘ रात्र ’ पृ. ४९, ५०, ५२) या अगतिक-तेच्या नानाविध कला ‘ उत्तररात्री ’त प्रक-र्षाने प्रकट झालेल्या आहेत.

पाहिले परंतु ओळख पटली नाही
ऐकले परंतु अर्थ न कळला काही
चाललो कुठे पायांना माहित नव्हते
झोपलो परंतु स्वप्न न माझे होते
(‘ उत्तररात्र ’ पृ. ६१)

मात्र ‘ रात्री ’ला पुरून उरणारी ही अग-तिकता इथे फारशी बलवान झालेली दिसत नाही. याचे कारण, केवळ स्वप्नच नाही तर शब्दांनीही काही ठिकाणी किणीकरांच्या बेसावध मनाशी दगाफटका केला आहे. कदाचित हे त्यांनाही जाणवले असावे म्हणून तर ‘ उत्तररात्र ’ संपता संपता हे बावरलेपण त्यांना घोटाळ्यात टाकताना दिसते आणि त्या बावरलेपणातून आलेली विकलता असह्य एकाकीपण जास्तजास्तच दुभंगून टाकते. केवळ मतलबी जगाला नव्हे तर स्वतःलाही ! म्हणून मग अशा कातरवेळेस मदिरेच्या फुटक्या प्यालाचा आधारही मोठा वाटतो.

(‘ रात्र ’ पृ. ११, पृ. १७, पृ. ३५. ‘ उत्तररात्र ’ पृ. ५२, ५३)

गति अगतिक होते जेव्हा भ्रमणामधली
घ्या मद्य दाखविल निर्मळ वाट निराळी

पण हा आशावादही नपुंसक ठरतो– कारण चिमुकले पीस वाऱ्यावरच भिरभिरत रहाते– वादळाचा वेग कमी होत नाही आणि बिच्चाऱ्या त्या चिमुकल्या पिसाला आसरा सापडत नाही. कारण घरटे शोधायला लागणारी दृष्टी केव्हाच अधू झालेली असते.

किणीकरांच्या बऱ्याचशा कविता अशा अधू आहेत.

म्हणून आंधळ्या पाकोळीचे फडफडणे त्यांना फार काळ मोहित करूच शकत नाही. इंद्रियांना असलेला हा दंश काही कवितांतून चांगला जाणवतो. (‘ उत्तररात्र ’ पृ. १५, ‘ रात्र ’ पृ. १९) इरकली मोरपंखात झुलणारे तान्हुले स्वप्नही त्यांना मोहवून टाकते; पण त्यांच्या मनाचे डबके साचलेलेच रहाते आणि स्वप्नांच्या या निसरड्या शेवाळ्या-वरून घसरण्याची धास्ती वाटते. म्हणून लगेच–

कोरड्या किनारी फिरे कल्पना वेडी
मृगजळात रुतली तिची बिचारी होडी

असेही ज्ञातेपण व्यक्त होते आणि पुनश्च भयंकर घनदाट शून्याच्या निबिड अरण्यात अडखळणाऱ्या पावलांची वाटचाल ठेचकाळत सुरू होते. ( कारण त्या वाटचालीचेच करुण कौतुक जपायचे असते.)

या रात्री अक्षरशः एकट्याने भोगलेल्या. इथे कुणाचीही सोबत-संगत नाही– कधीकधी स्वतःशीही भांडण भांडणारे हे मन आहे. कारण कुठलीच माती पक्की नाही हे ध्यानात आल्यावर उच्च-उदात्त, करुणकोमल, आर्द्र धन्यधन्यतेचे इमले धडाधड कोसळतात. तेव्हा मग

भंगले इथे सिंहासन नरसम्राटांचे
स्तनमंडळ खचले उन्नत शृंगाराचे
या इथेच चढले प्रासादावर मजले
(अन्) उंदीर-घुशींचे प्रसूतिमंदिर सजले
(उत्तररात्र पृ. ३३)

असा जीवघेणा उबग खदखदतो. कांचन-सर्पांच्या वेटोळ्यात बहरलेले हे मोहाचे झाड

देखणे रहात नाही. ते सडलेले आहे हे लक्षात येते– फक्त 'स्वप्नांच्या जुन्या बाजारातीलच एक टवका उडालेले कचकड्याचे स्वप्न आपण (उधार) घेतले आहे,' ही जाणीव असली की मग त्या स्वप्नामुळे होणारा पोकळ आनंद किंवा भरदार दुःख-दोन्हींची किंमत फारशी वेगळी नसते.

पण हे सगळं ज्ञातेपण फार उशीरा येतं. सणसणीत अपेक्षाभंगाखेरीज तडे जात नाहीत. कारण इतर वेळेस जमीन नाही तरी आपले पाय स्थिर ठेवून आपण आधार, तोल सांभाळू शकतो; तरीही पावले भरकटलीच तर त्याची वाटच वेगळी होते. पुष्कळदा या वाटादेखील वेगळेपणाचा फक्त प्रबळ आभास निर्माण करून हुलकावणी देतात. तेव्हा मग–

ही जुनीच माती नवी बाहुली व्याली
हे जुनेच कुंपण नवी मेंढरे व्याली
हे जुनेच ठिपके जुळता रांगोळीचे
उंदीर धावतील बिळात रेघोट्यांचे
('उत्तररात्र', पृ. २०)

असा साक्षात्कार होतो आणि मग नेमून दिलेल्या सडकेवरून चालण्याइतका स्वस्थ-शांतपणा अंगी बाणवला जातो. हे साधले म्हणजे मग नास्तिक झाले तरी परवडते. 'ते मंदिर, फोडुनि टाका मूर्ति, लखलाभ असो भडव्यांना ती अपकीर्ती, ...नाचवी पताका काढूनि यात्रा दिंड, माउली होतसे याची रात्री रांड' असा उद्वेगही मग वितळत जातो.

परमेश्वर आणि जग यांच्याबद्दल मनात तळतळत असणारा हा उद्वेग आक्रोशाच्या स्वरूपातच जास्त दिसतो; पण हे अश्रू तरी नेक आहेत का? त्या जखमा खोलवर ओल्या आहेत का? इथेही हे मन हवालदिल होते. कारण त्याचे दुःख गर्दीतही चिरडले जाऊ शकते आणि मग

एकटा आज मी निर्जन एकांतात
द्या परत मला हो, हवे मला ते दुःख

असे मागणे त्यांना मागावे लागते. गर्दीचा; अर्थशून्य शब्दांचा रेटा दुःखाचे व्रण पुसून टाकण्याइतका प्रभावी असतो? पण किणीकरांना दुःख जाळते, वेदना सहतात त्या फक्त अंधारात! असे दुःख टिकत नाही, त्याचे कोळसे होतात. कारण किणीकरांनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे, 'जखम तीच, त्यावर माशा बसल्या त्याच' असे वाटू लागते आणि हिरवे पिंपळपान एकाएकी सुकून जाते.

'रात्र' आणि 'उत्तररात्री'तले किती तरी संदर्भ सारखेच आहेत, प्रतिमा त्याच आहेत. अर्थात हे 'खिन्न नीरस एकान्तगीत' आळवताना जुन्या, पडक्या, उद्ध्वस्त धर्मशाळेच्या कौलारी बसून गाणारा बालकवींचा 'पारवा' जवळचा वाटावा हे साहजिक आहे आणि मरणाची कात टाकून या जन्माचे हे अनिवार्य सरपटणे साहत असताना 'मुंगी अन् माणूस, मोठे कोण लहान' हाच छळणारा प्रश्न परत आ वासून उभा रहावा यातही नवल नाही. (मुंग्यांच्या या शोकगीताचे व्याकुळ स्वर 'रात्र' आणि 'उत्तररात्र' दोन्हीत आहेत. मर्ढेकरांची आठवण इथे झाल्यावाचून रहात नाही.) 'उत्तररात्री'त इंद्रिये इतकी जर्जर झालेली आहेत की, कुठलाच खेळ खेळण्याचे त्राण त्यांच्यात उरलेले नाही. (म्हणून बहुधा नपुंसक शृंगाराची फुगडी पुन्हा पुन्हा खेळवण्याचा मोह पडत असावा. पृ. ५४, ५९) पण या खिदळणाऱ्या, फसफसणाऱ्या दुनियेतच जगणे अटळ आहे. कारण 'रात्री'च्या प्रारंभीच सांगितले आहे

अर्थशून्य शब्दांच्या या स्मशानशाळेत वावरताना कुठला तरीच कोपरा एकदम बिलगतो, शब्द भावाला चिकटतात–मैत्र्य जुळवतात. कोणा एकाला तरी निदान भिजलेले व्याकुळ डोळे दिसतात. नाटक वठवता वठवता आलेल्या सराईत स्नेहाळपणाचे बुजगावणे अवचित गळून पडते. (किणीकरांना 'नाटका'ची प्रतिमादेखील किती मोहवते ते पहाण्यासारखे आहे. 'उत्तररात्र' पृ. १४, पृ. ३६) आणि कोणाचे तरी रेषा-रंग-रूप आपला सगळाच अंधार कापीत जाते. मग त्या सहवासाच्या मिणमिणत्या प्रकाशाची काठी आधाराला घेऊनच, स्वप्नांचे अपारदर्शक ओझे वाहात (कारण स्वप्नं पापण्यांना चिकटतातच–ती खरवडून काढता येत नाहीत किंवा त्यांना बाजूला फेकून देण्याइतके आपण समजूतदार होत नाही. त्यामुळे वेदनेचे गहिवर येत राहतातच!) पुढच्या अजस्र अंधाऱ्या गुहा चाचपडायच्या असतात.

पण यासाठी शब्दांचा माथा उन्नत हवा, कणखर हवा, नाही तर सूर्याला तडतडणाऱ्या सरणावर अग्नी देतानासुद्धा 'भाव' मावळून जातो आणि सगळेच कसे ढगाळ होते! किणीकरांच्या 'रात्री' अंधारून आलेल्या आहेत, उदास, खिन्न, व्याकुळ–गहिवरलेल्या सुद्धा आहेत–पण त्या निस्तेज आहेत–मध्येच कुठे तरी एखादी शलाका चमकून जाते आणि तिच्या प्रकाशात आभाळाचा तेवढा तुकडा उजळून निघतो, किंवा कुठल्या तरी रेषाच सचेतन होतात आणि जे शब्दांनाही नाही जमले ते म्हणून जातात ('रात्र' आणि 'उत्तररात्र'ची रेखाटणे उत्कृष्ट आहेत हे इथे मुद्दाम नमूद केले पाहिजे.) याचे कारण पांगळेपणाचे काही स्वतंत्र बळ असते. ते इथे लाभतच नाही. त्या केविलवाण्या अघोरी दुःखाने झडझडून कधी येतच नाही. आर्त-उदास स्वर तळापर्यंत खोल रुततच नाहीत, कारण तेवढा अवसरच दिलेला नाही. (सगळ्या कविता चार चरणात संपतात. कित्येक अनुभव त्यामुळे अधुरेच रहातात.) की शब्दांचेही महत्त्व या कवीला नाकारायचे आहे? पण संदर्भाची पडझड होताना त्यांचाच आधार आपल्याला मिळतो हेही खरेच आहे. ते मान्यही आहे. एकूण या शब्दकलेचा इलाज नाही. कारण या कवीच्या दुःख, वेदनेलाच अंधाराची, ढासळणाऱ्या रात्रीची चटक लागली आहे. (आणि अशा व्यसनाला मरणाइतका तीक्ष्ण–धारदार, दुष्ट उतारा असतो?) तेथे दुसरा (!) काय करू शकतो?

–रेखा इनामदार

उत्तररात्र
कै. रॉय किणीकर
श्रीशब्द प्रकाशन,
पृष्ठे ६२, मूल्य ८ रु.

रंगभूमी

# बेगम बर्वे : पसरलेले आणि दुभंगलेले नाटक

प्रा. लीला अर्जुनवाडकर

'संगीत बेगम बर्वे' असे काहीसे तऱ्हेवाईक नाव असलेल्या, सतीश आळेकरांच्या नव्या दोन अंकी नाटकात दोन जगे आहेत. एक जिन्याखालचे. एक जिन्याच्या वरचे. आपाततः ही दोन वेगळी वाटत असली तरी ती दोन्ही आहेत अतिसामान्य, क्षुद्र, आणि विकृत सबंधावर, नाही तर विकृत स्वप्नरंजनावर उभी असलेली. या दोन्ही जगांत दोन-दोन माणसे आहेत. सटवाईला नाही नवरा आणि खंडोबाला नाही बायको, अशा रीतीने एकत्र आलेली. गरज म्हणून एकत्र राहणारी. एकमेकांचा छळवादही सोसणारी; पण आपआपली वेगवेगळी स्वप्ने पाहणारी.

जिन्याखालच्या जगात राहतात शामराव आणि त्यांची 'बेगम' बर्वे. बालगंधर्वांचे विलक्षण लोभस व्यक्तिमत्त्व, अभिनय, स्वर्गीय गाणे यांनी प्रभावित झालेला बर्वे हा एक गोरागोमटा स्त्रीप्रकृती नट. रंगभूमीच्या दिव्य झगमगाटाच्या आसपास सतत वावरूनही अंधारातच राहिलेला. बालगंधर्वासारख्या लय-सुरांच्या सम्राटाच्या जवळ वावरूनही ज्याच्या गळ्यावरून वारे गेले आहे असा. वस्त्राना पंप करून त्या पेटवत राहणारा, तरीही सदैव अंधारातच खितपत राहिलेला. आणि सारंगनयनेसारख्या फडतूस भूमिकाच वाट्याला आलेला. बालगंधर्वांनी दिलेल्या घस लागलेल्या शेल्याप्रमाणेच त्याचे आयुष्य नाटकांच्या जरतारी स्मृतींनी भरलेलं, पण जीर्ण, फाटकेतुटके असे झालेले आहे. हा शेला, हे कृपेचे महावस्त्र ही त्याच्या जीवनाची कवचकुंडले आहेत. या गोऱ्यागोमट्या आणि कपाळकरंट्या माणसाच्या वाट्याला भूमिका जशा फडतूस आल्या तशीच संगतही आली ती फडतूस आणि छळ छळ छळणाऱ्या शामरावाची. दिवसा उदबत्त्या विकून आणि रात्री शामरावाच्या हातात गजरा बांधून त्याची 'सेवा' करणारा बर्वे मनाने जगतो एका स्वप्नसृष्टीत, एका सुवर्णलंकेत. ही आहे शारदा, रुक्मिणी, सुभद्रा, सिंधू, वसुंधरा अशा राजस नायिकांची. या भूमिका जगता जगता, जुन्या आठवणी जागवता जागवता आणि आपली स्वप्ने पाहता पाहता, मधुराभक्तीतील भावावेश झाल्याप्रमाणे बर्वे स्त्रीच बनून गेला आहे. पण त्या इंद्रजालातही भुजंगनाथ, शिशुपाल, वृंदावन, घनश्याम अशा खलनायकाच्या रूपाने लंगडा शामराव डोकावतोच त्यामुळे 'मी कुठे जाणार? मी जिन्याखाली राहतो. जाणारे जिन्यावरून जातात. मी फक्त त्यांची पावलं मोजतो' असे भान बर्वेला सतत राहते.

आपल्या शिव्याना, छळवादाने शामराव बर्वेला भावतालच्या वास्तवाची परखड जाण करून देतो. तो बर्वेच्या गोऱ्यागोमट्या चेहऱ्याचे, लांबसडक केसाचे, नखरेल चालीचं कौतुक करतो आणि त्याला 'बगम' म्हणतो. ही 'प्रॉपर्टी' आपण कंपनीच्या मालकाकडून कशी मिळवली ते सांगतो; पण त्याला 'भडव्या' ही म्हणतो आणि त्याला लाथा घालून त्याच्याकडून लागेल ते करवून घेतो.

जिन्यावरचे जग आहे जावडेकर आणि बावडेकर या वय उलटून गलेल्या पण अविवाहित कारकुनांचे. कारकुनी करून करून त्यांच्या जगातले आभाळही निळेपण सोडून सरकारी कागदांच्या रंगाचे खाकीच बनले आहे. ऑफिसमधल्या माठातल्या सरकारी पाण्याखेरीज त्यांचा उकाडा कमी होत नाही. 'अहो, आपल्यावर कुणी खूष झालं तरी समजायचं नाही. अर्धअधिक आयुष्य निघून गेलं. त्यात हे असलं थोबाड बघून सगळ्यांची पंचाईत होते. आता तर माझा मलाच कंटाळा येतो. मीच मला दिसू नये असं वाटतं. सवयीने तर आता दाढी करतानासुद्धा आरसा लागत नाही. टक्कलामुळे भांग पाडण्याचा प्रश्न नाही. बरोबर माप दिलं तरी पँटी साले लांडयाच शिवतात. देवळात गेलं तर चपला पळवल्या जातात. सिनेमाला गेलं तर दिवे जातात. च्यायला, आम्ही करायचं तरी काय? आम्हाला एक क्लब तरी काढून द्या म्हणावं वेगळा. कसल्या नलावडेबाई अन् कसलं काय? त्या आपल्या बघायला ठीक आहेत. सगळं आपलं इनवर्ड... मनातल्या मनात...' ही जावडेकरांची व्यथा.

पण हेही कळकट आयुष्य त्यांच्या स्वप्नसृष्टीत सोनेरी बनून जाते. जावडेकरांच्या मनात रुंजी घालत असते त्यांच्या ऑफिसातली विनापाश विधवा, नखरेल चालणारी, सुरमा घालणारी, सर्व काही व्यवस्थित जपलेली नलावडेबाई. तर बावडेकरांच्या मनात घोळते आहे साहेबाची देखणी मुलगी वसुधा. यांच्याविषयीच्या विकृत स्वप्नरंजनाच्या जंबो जेटमध्ये बसून हे दोन कारकून रस्त्यावरचा चहा पिता पिता पस्तीस हजार फुटांवरून विहार करतात.

जिन्याखालच्या बर्वेकडून जावडेकर दर गुरुवारी उदबत्त्या घेतात. एका विसरलेल्या 'साक्षात्कारी' गुरुवारी काही तरी अद्भुत घडेल असे बर्वे त्यांना सांगता. हे नाटक ही या साक्षात्कारी गुरुवारची कहाणी.

'थोडा चिवडा शिल्लक आहे तो घेऊन जा' म्हणून जावडेकरांनी बर्वेला सांगितलेले असते. जुगारात सर्व हरून आलेला शामराव 'बेगमे'ला शिवीगाळी करून खायला आणण्याचा हुकूम देतो. या निमित्ताने बर्वे वर जातो. जिन्याखालचे जग जिन्यावरच्या जगात प्रवेश करते. आपले स्वप्न वरच्या स्वप्नरंजनात मिसळून विहार करू लागते. ('खराखर स्वप्न आणि सत्याच्या उंबरठ्यावरचं माप ओलांडण्याची हीच वेळ म्हटली पाहिजे.' 'आयुष्यभर उराशी जपलेला श्रीकृष्ण जावडेकरांच्या रूपानं अखेर

भावला म्हणायचा.')

वरपांगी ही दोन जगे एकमेकांत मिसळलीशी वाटतात; पण फरक असा आहे की, जावडेकर–बावडेकरांच्या स्वप्नरंजनातला विमानविहार संपता संपत नाही, तर बर्वेने जाणूनबुजून सोसासोसाने चालू ठेवलेल्या स्वप्नरंजनात आपल्याला मधूनमधून जिन्याखालीही जावे लागते. पुन्हा उड्डाणही करावे लागते.

मग या कथानकाने– आणि या नाटकाला चांगले दणकून मोठे कथानक आहे– किती विश्वे धुंडाळावीत?

चिवडा आणायला आलेला बर्वे जावडे–बावडेकरांना ऑफिसातला माल घेऊन आलेली नलावडेबाई वाटते. साहेबांचे मूल पोटी वाढवणारी ही बाई साहेब जावडेकरांच्या गळ्यात बांधतात. (मात्र प्रत्यक्ष न येता) जावडेकर–नलावडेबाईंचे शुभमंगल. (सनईवादन, विवाहसोहळा हे दाखवणे ओघानेच आले.) त्यांचे सुखी वैवाहिक जीवन. बावडेकरांची होणारी पंचाईत आणि मानसिक कुचंबणा. ('वहिनी, शेजारच्या खोलीत तुमचं झोपणं माझी झोप उडवतं. रात्रभर इकडे मी तळमळत असतो. वाटतं की, शेजारच्या खोलीत वसुधा झोपलीय आणि रोज तिच्यावर बलात्कार केला जातोय.')

लग्नाच्याच वेळी साहेबांनी 'आपल्या माणसाच्या' हाती पाठवलेला जी. आर. जावडे–बावडेकरांपैकी एकाचीच नोकरी राहील, अशी धमकी देऊन गेला आहे. त्यामुळे दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीस (एव्हाना तीन महिने उलटले आहेत.) या कारकून मित्रांची मैत्री धोक्यात आलेली आहे. असुरक्षितता आणि आपले दुबळेपण या भावनांनी व्याकूळ झालेले हे दोन कारकून ओळख, वशिला शोधू लागतात–विशेषतः बावडेकर.) या निमित्ताने बरीच कारकुनी चर्चा!) त्यात त्यांना 'साहेबांचा माणूस' साहेब–नलावडेबाई संबंधाचे गुपित सांगून जावडेकरांवर दडपण आणून त्यांचा राजिनामा घ्यायला चिथावून देतो. तो स्वतः तर घरी येऊन नलावडेबाईंना साहेबांचा बंगल्यावर येण्याचा निरोप सांगतोच, पण वर तिचा हातही धरतो.त्याच वेळी घरी आपले 'विरहव्याकुल स्वागत कसे होईल याची चित्रे रंगवीत आलेल्या जावडेकरांना त्यांची 'सारंगनयना' 'एक आणि एक बरोबर तीन' असा हिशेब सांगून आपल्याला दिवस गेल्याचे सांगते. आपल्या या वयात देखील मस्टरवर नवीन माणूस पाठवणाऱ्या गुरुदत्ताविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना जावडेकरांना वेड लागायची पाळी येते. (प्रेक्षकांचीही जवळजवळ तीच अवस्था!) 'गर्भवती' सारंगनयनेला आपल्या बाळाला आपण कसे भरवू याचे कोमल चित्र जसे दिसते, तसेच जिन्याखालच्या फटीतून एक हात वर येऊन आपला पाय घट्ट पकडतो, जिन्याखालच्या अंधारात आपला अंकुर अंतर्धान पावतो आहे, असे भीषण दृश्यही दिसते. (म्हणजे बर्व्यांचे 'बर्वे' असणेही चालूच असते. म्हणून तर शामराव जुन्या नाटकांतील खलनायकांच्या रूपाने त्यांना सारखा दिसत राहतो. चिवडा, जिना हे खालच्या वास्तवाचे प्रतीक. तर उदबत्ती, बत्ती हे शेल्याप्रमाणे बर्व्यांच्या स्वप्नजीवनाचे प्रतीक.)

पण असे जरी असले तरी या नव्या नवतीच्या डोहाळकरणीची वाडी भरून तिला हिंदोळ्यावर बसवण्याची रसिकता जावडेकर अर्थातच दाखवतात. (प्रेक्षकांना हा हिंदी सिनेमा बघावाच लागतो.) सारंगनयना स्वतःच डोहाळे म्हणते. तेवढ्यात बावडेकर फुलांचे धनुष्य आणि खरा बाण घेऊन येतात आणि जावडेकरांना धमकी देऊन त्यांचा राजीनामा मागू लागतात. त्यांच्या मागोमाग 'साहेबांचा माणूस' येतो आणि पहिला जी. आर. चुकीचा होता; नव्या जी. आर. प्रमाणे दोघांचीही नोकरी राहणार असल्याचे सांगतो. (कारकुनाच्या जीवनात स्वप्ने सुरू व्हायला आणि संपायलाही जी. आर.च लागतात असे तर आळेकरांना सुचवायचे नाही?) समोरचा सजवलेला झोपाळा पाहून 'हे काय? एवढं सजवलं कशापायी?' असे तो (म्हणजे आता शामराव) विचारतो आणि 'माझं डोहाळजेवण' असे बर्वेकडून उत्तर मिळाल्यावर खलनायकी हसून 'बिनपोट वाढलेली गर्भारशी बाई बघा' असे म्हणून बर्वेचे धोतर खेचतो.

नंतरच्या अंधारामागोमाग आलेल्या क्षीण प्रकाशात जावडेकर-बावडेकर पुन्हा पहिल्या अंकातल्यासारखे बसलेले दिसतात. पुन्हा एकमेकांची ओळख करून घेतात, चहा घेतात. 'चिवडा आनायला आली ती चिकटलीच साली' असे म्हणून शामराव बेगमेला जिन्याखाली चलण्याची आज्ञा देतो; पण 'जिन्याखाली जाण्याच्या अगोदर रसिकजनांसाठी मला प्रार्थना तरी करू देत' असे म्हणून बर्वे 'चिन्मया सकलहृदया' हे संशयकल्लोळातील भरतवाक्य सुरू करतो आणि (आपल्या सुदैवाने) नाटक संपते.

या वेळपर्यंत प्रेक्षकाची जाणीव व बुद्धी शिल्लक असलीच तर त्याला पुढील गोष्टी जाणवतात.

१. आपण हे दोन तास खुर्ची सांभाळून बसू शकलो तर आपल्याला मंत्र्याचीही खुर्ची सहज सांभाळता येईल. मात्र प्रत्यक्षात चार पात्रें असूनही सहा (किंवा अधिक) व्यक्ती कल्पिताना आणि दर वेळी नवी एरिअल लावताना आपली अतोनात दमछाक झालेली आहे. (खरं म्हणजे गोष्ट लिहितालिहिताही झाली.)

२ (अ) नाटकाची कल्पना फुलवताना पण मुख्यतः प्रयोगाच्या सोयीसाठी नाटककाराने 'संगीत'नाटक लिहून जुन्या नाटकातली गाणी पुष्कळदा ओढून-ताणून घातली आहेत. कर प्रसंगाची चौकट निर्माण, घाल गाणे ही क्लृप्ती फार निर्जीव आणि रसहानिकारक आहे. त्यात ना धड मुळचे सौन्दर्य, ना धड गायनाचा गोडवा. ही सर्व गाणी अगदीच सुमार म्हटली गेली (बर्वेचे काम करणारे काळे यापेक्षा अधिक चांगले गातात, असे मला आठवते). बर्वे बोलून चालून तिसऱ्या दर्जाचा नट. तो कसे चांगले गाईल? त्याच्याकडून हेच अपेक्षित आहे, असे उत्तर असेल, तर आमच्या कानामनात गुंजत असलेली ही गाणी अशा स्वरूपात दोन तास ऐकणे ही आणखी एक प्रदीर्घ शिक्षा आहे, असेच म्हणावे लागेल.

(ब) दुसरी एक धास्ती मनात उभी राहिली. हे नाटक अशा गीत-प्रक्षेपांना फारच अनुकूल आहे. आळेकरांची महानिर्वाण, महापूर यामधली 'महा'प्रवृत्ती पाहता ते संभाषणाची आणखी काही कोंदणे बनवून आणखी काही गाणी घालून एखादा अंक वाढवण्याच्या तर मोहात पडणार नाहीत ना?

(क) पदे सारी जुनीच आहेत. प्रयोगाच्या सुरुवातीलाच शिलेदार कुटुंबीयांचे

आभार मानले आहेत. मग 'संगीत–राजीव परांजपे' हा खास निर्देश कशासाठी? त्यांनी फक्त सारंगीच्या काही सुरावटी दिल्या आणि नाटक वाजवले म्हणून? सारंगी आणि ऑर्गन यांच्या दर्जाचा मात्र आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

३. (अ) आधुनिक नाटकांमधील गुंतागुंतीचा मानसशास्त्रीय भाग आणि जुन्या संगीत रंगभूमीवरची संगीताची मोहमयी झगझगीत दुनिया– ही दोन जगे साधण्याचा लेखकाने केलेला प्रयत्न पूर्ण फसला आहे. हे नाटक अनेक अंगांनी चिरफळ्या उडालेले, फुटलेले झाले आहे. 'बेगम बर्वे'ला केंद्रस्थानी कल्पून उलगडा करीत जावे तर जावडेकरांना तेवढेच महत्त्व आहे असे दिसते. बरे, त्यांचे स्वप्नरंजन केंद्रभूत असे म्हणावे तर 'बेगम बर्वे'च्या नाटकीय दुनियेशी त्याचा मेळ बसत नाही. जावडे-बावडेकरांचे निरंकुश स्वप्नरंजन, बेगम बर्वेने मुद्दाम पांघरून घेतलेला स्वप्नांचा बुरखा आणि शामरावाचा एका पायाने लंगडा पण दोन्ही पाय जमिनीवर घट्ट रोवून उभा असलेला व्यवहारीपणा– या तीन पातळ्या लेखकाला अभिप्रेत असाव्यात. मग शामराव स्वतः स्वप्नातलेच संदर्भ देऊन स्वप्न मोडून टाकतो, हे कसे काय? शिवाय तो स्वतः 'साहेबांचा माणूस' बनून येतोच. हे सारे नाटक 'सामुदायिक स्वप्नरंजन' म्हणायचे का? हे तरी कसे पटावे?

(ब) तसे जर मानायचेच असेल तर वर सांगितलेल्या कथानकाच्या अफाट महापुरातून बर्वे, जावडेकर-बावडेकर या लोकांच्या विटक्या, कळाहीन जीवनातील जीवघेणी विषण्णता आपल्यापर्यंत नेमकी पोचणार तरी कशी? नाटकातील तीन वेगवेगळ्या पातळ्यांमधील दुर्बोधतेमुळे प्रेक्षक केवळ गटंगळ्या खाऊ लागतो. मधून मधून येणारे छान विनोद एवढीच फळी प्रेक्षकाला आधारासाठी मिळते. ही दुर्बोधता येऊ नये यासाठी अभिनयाची घाटणी दर वेळी बदलली तर? नुसता गाँग किंवा प्रकाशयोजना यांनी प्रेक्षकांना बोध होण्याच्या मर्यादेतील हे नाटक नाही. गुंतागुंतीचे संबंध दाखवणाऱ्या रचनेत दुर्बोधता अपरिहार्यच आहे का? बावडेकर सूत्रधाराला म्हणतात– 'तुम्ही सोंगं का बोलत नाही?' तसेच आळेकरांनाही विचारायला हवे.

(क) स्वप्नरंजन ही क्लृप्ती वापरून नाटक लिहिताना, मला वाटते, लेखकाने कथानक एका ट्रॅकवरूनच नेण्याची खबरदारी घेतली पाहिजे. ट्रॅक्स मिसळता उपयोगी नाही. अशी मिसळ जेवढी जास्त, तेवढी दुर्बोधता आणि घोटाळा अधिक! अद्‌भुत वातावरण किंवा विनोदी प्रसंग यांची गुंफण या उपायाने करणे हमखास यशस्वी होऊ शकेल. 'चिटी चिटी बँग बँग' किंवा 'सिक्रेट लाइफ ऑफ वॉल्टर मिटी' या चित्रपटांतल्याप्रमाणे. पण जर या उपायाने आयुष्यातील कारुण्याचे चित्रण करायचे असेल तर तो अतिशय जपून वापरला पाहिजे. तो एकाग्रच राहिला पाहिजे. कारुण्यही दाखवायचे आहे. फँटसीही चालेल. विनोद तर हवाच हवा. उपरोध ही तर माझी खास खेळी– अशा भाराभर चिंध्यांच्या मोहात पडून कसे चालेल?

(ड) मला हे कळते की, नाटकीय काल आणि प्रत्यक्ष काल (dramatic and real time) या दोन संकल्पना वेगवेगळ्या आहेत. प्रत्यक्षात जी गोष्ट घडायला दोन तास लागतील ती नाटकात पाच मिनिटांत दाखवता येईल किंवा उलटही होईल. पण या नाटकात नक्की किती कालावधी अपेक्षित आहे? दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला 'तीन महिने होऊन गेले' असा उल्लेख आहे. नाटकाच्या सुरुवातीचा व शेवटचा शामरावाच्या तोंडचा उल्लेख ध्यानात घेतला तर सर्व भाग एका रात्रीत घडलेला असावासे दिसते. हे अर्थात अधिक रास्त. पण हे सारे लेखकाने ताणावे ताणावे किती? म्हणजे स्वप्नरंजन या उपायाचीच मर्यादा अशी आहे की, तो जेवढा कमी कालावधीचा असेल तेवढा तो अपेशी ठरण्याचा संभव कमी. मर्डर ऑन दि क्रीक ब्रिज या एका बारा-पंधरा मिनिटांच्या लघुपटात गळ्याभोवती फास टाकलेल्या माणसाला मृत्यू येऊन त्याची मान लटकी पडेपर्यंत त्याला काय स्वप्ने दिसतात याचे अतिशय थरारून सोडणारे आणि प्रत्ययकारी चित्रण आहे. हा प्रसंग पिंजून वाढवला असता तर त्यातल्या उत्कटतेचा बिंदूही शिल्लक राहिला नसता. नाटकाचे विश्व आभासाचे असते हे तर खरेच. लेखक आपल्या कुवतीप्रमाणे ते काहीसे ताणू शकतो हेही खरे; पण त्यालाही काही तर्कशास्त्र, मर्यादा आहेत. त्या न सांभाळल्याने शिवण उसवून ठिकठिकाणी कापूस बाहेर येऊन बेडौल झालेल्या तक्क्यासारखी या नाटकाची स्थिती झाली आहे.

(इ) हे प्रपंचाने लिहिले एवढ्यासाठी की, आळेकरांची मूळ कथावस्तू आहे खरोखरीच छान. तिच्यावर अर्ध्या तासाची अतिशय सुरेख कारुण्यपूर्ण एकांकिका होऊ शकली असती. पण त्यांनी दोन अंकी नाटक लिहिण्यासाठी एका बाजूला नको तेवढी कथानकाची गुंतागुंत व दुर्बोधता, तर दुसऱ्या बाजूला झोपाळ्यावरच्या डोहाळजेवणासारखे डोळ्यांना खुपणारे अतिवास्तव प्रसंग यांच्या द्वारा कथावस्तू पिंजून पिंजून काढली आहे. – 'बुड्ढीके बाल' असतात तशी. या गोलमाल पसाऱ्यात नाटकाला आवश्यक अशी समर्थ सूचकता व आकार कुठेच राहत नाही. आळेकरांच्याच शब्दांत म्हणजे हे नाटक 'अनादिअंत नसलेले' (म्हणजे आद्यंत नसलेले?) होऊन जाते. सूत्रधार आणि बावडेकर यांच्या संभाषणाची पहिली दहा-पंधरा मिनिटे नाटकाच्या दृष्टीने खरोखरीच भाकड आहेत. नाटक सुरू होते नंतरच सूत्रधार हा संगीत नाटकाच्या पठडीत आवश्यक असला तरी या नाटकाच्या विषयाच्या दृष्टीने हवाच आहे का? तो व शामराव एक दाखवून निश्चित काय साधले?

(फ) मी वर म्हटलेच की, ही गाणी अशा तऱ्हेने व एवढा वेळ ऐकवत नाहीत. त्यांच्याबाबतीत आणखीही एक अडचण आहे. ज्यांना ही पदे, त्यांचा जुना जमाना, जुने संदर्भ यांची सुतराम कल्पना नाही त्यांना त्याचे काय अप्रूप? आणि ज्यांना ती माहिती आहेत त्यांना केवळ त्या पदांचे सूर ऐकणेही पुरेसे वाटेल. जास्त गाण्याची जरुरीच नाही.

४. (अ) आळेकरांचे या प्रयोगातील काम केवळ दृष्ट लागण्याजोगे आहे. 'महानिर्वाण'-मधील त्यांचे शब्दोच्चार फार जलद, अस्पष्ट, एकमेकांत गुंतलेले होते; पण 'बेगम बर्वे'मध्ये स्पष्ट शब्दोच्चार, उचित वेषभूषा, नेपथ्य, अतिशय प्रभावी हालचाली आणि अन्य आंगिक अभिनय यांनी आळेकरांनी खरोखरीच बाजी मारली. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. सर्व प्रयोगभर त्यांनी नेटकेपणाने 'बॅटिंग'ची जबाबदारी आणि मेढेकरांनी दुसरी बाजू सहाय्यक फलंदाज म्हणून सांभाळली.

(ब) काळयाच्या गाण्याविषयी वर जे लिहिले तेच त्यांच्या अभिनयाविषयीही म्हणायला हवे. दोन तास या पद्धतीचा अभिनय बघून डोळे खरोखर दुखायला लागतात, यावर कोणी म्हणतील 'गंधर्वी' अभिनयांचे काय? पण त्यांचाही अभिनय न आवडणारे लोक पुष्कळ होते आणि दुसरे असे की, त्या काळातील अभिनयाचा व त्या नाटकांचा संदर्भही वेगळा होता. हा अभिनय आता एवढा वेळ आणि अशा नाटकात 'बघवत नाही हो, खरंच बघवत नाही!'

(क) मोहन आगाशांनी आपले काम नेहमीच्या सफाईने केले. [ते गाइले देखील!] पण शामराव लंगडा दाखवण्याची खरोखरीच आवश्यकता होती का? 'वारा सारखाच भैंचोद! पण बेगम तुझा सूर आणि माझा मात्र पाय' असे तो म्हणतो. या चटपटीत वाक्याचा नाटकाला काय उपयोग? आगाशांसारख्या समर्थ अभिनेत्याला लंगडेपणाची कुबडी हवीच होती? अशा काही तरी ढोबळ लकबी वापरल्याखेरीज नाटकांचे हल्ली भागेनासेच झाले आहे की असे काही व्यंगही शामराव बर्वे यांच्यासारख्या संबंधांची मानसशास्त्रीय उपपत्ती आहे?

(iv) भरतवाक्याच्या वेळी नाटकीय चार पात्रांच्या जोडीला ऑर्गनवादकाशेजारचे नंदू पोळ टुणकन उडी मारून स्टेजवर येतात. [वरून एखाद्याने उडी का नाही मारली?] विंगमधून एकदोघे येतात व हे सारे मिळून भरतवाक्य म्हणतात. नाटकबाह्य पात्रांनी यात भाग घेण्याचे प्रयोजनच कळले नाही.

५. नाटकातले काही विनोद खरोखर अतिशय छान आहेत. विशेषत: जावडेकरांच्या तोंडचे पण नुसता उत्तम अभिनयही विसकटलेले नाटक सावरू शकत नाही, तर विनोद कुठून ते करणार?

म्हणजे शेवटी आपण ज्या महत्त्वाच्या प्रश्नाशी येऊन पोचतो तो हा की चांगल्या नाटकाचे वाईट प्रयोग जरूर होतील; पण वाईट नाटकाचे चांगले प्रयोग होतील का?

सतीश आळेकरांचे हे नाटक वाईट आहे असे म्हणण्यापेक्षा ते एक विसकटलेले, पसरलेले आणि दुभंगलेले नाटक आहे असे मी म्हणेन. मूळ कथाबीज निश्चित चांगले आहे; पण त्याच्या प्रकृतीनुसार त्याची नेटकी निगराणी करणे आळेकरांना जमलेले नाही. साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण करायची असते आणि आळेकरांनी तर एकशेपाच उत्तरांचा प्रपंच केला आहे. त्यांना प्रेक्षकांनी मार्क कसे आणि किती द्यायचे? ❋

# स्वप्नरंजनाच्या विविध पातळ्या

संजीव मंगरूळकर

'बेगम बर्वे'च्या नाट्यवाचनाचा प्रयोग ऐकण्याचा योग प्रथम आला, तेव्हा ते नाटक ऐकून झालेली माझी प्रतिक्रिया बरीचशी गोंधळाची होती. बरंच काही विसंगत, विकृत असं लेखन, त्यात अधूनमधून जाणवणाऱ्या बौद्धिक चलाख्या आणि या सगळयाआडून मध्यमवर्गीयांवर, त्यांच्या बुळेपणावर, अस्मितेवर, त्यांच्या निष्ठांवर केलेली शेरेबाजी असं काहीसं या नाटकाचं स्वरूप जाणवलं. नाटकात सलग असं विचाराचं सूत्र सापडेना आणि जे काही तुटकतुटक सापडलं ते आळेकरांच्या आधीच्या नाटकांमधूनही जाणवणारं बरंच ढोबळ असं वाटलं. एकूणच नाटककार आळेकरांनी घेतलेली ही नवीन बौद्धिक फिरकी तर नव्हे अशीही शंका आली. ही प्रतिक्रिया इतपत विस्तारानं लिहिण्याचं कारण इतकंच की, त्यानंतर या नाटकाचा प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यावरही कित्येकांची प्रतिक्रिया थोड्याफार फरकाने अशीच झालेली दिसली. व्यक्तिश: माझ्या बाबतीत मात्र ही प्रतिक्रिया बरीच अल्पजीवी ठरली. नाटकावर थोडा अधिक विचार केल्यावर काही प्रमाणात सुसूत्रता जाणवू लागली आणि नाटकाचा प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यावर बऱ्याच अंशी खुलासा झाला. वरवर दिसते तितके हे नाटक उथळ नाही हे जाणवलं.

## षंढपणाची कथा?

नाटकाचा प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यावर मला सुसूत्रपणे दिसला तो कुणा बावडेकर–जावडेकर यांचा पूर्णत्वाला पोचलेला षंढपणा (Total impotence). उतारवयाला लागलेल्या, सरकारी नोकरीत नि:सत्त्व झालेल्या या दोन हतभागी व्यक्ती वर्षानुवर्ष मस्टरवर सही करण्याचं फक्त एकच काम नेमानं केल्यामुळं त्यांनी आपला पुरुषार्थच गमावला, इतका की, अजूनही त्यांची लग्नंसुद्धा झालेली नाहीत. त्यांचा हा षंढपणा फक्त एवढ्याचपुरता मर्यादित नाही तर तो पुरता सर्वसमावेशक आहे. त्यामुळंच त्यांना खोलीत उकडू लागतं, घामानं चिकचिकाट होतो तेव्हा फॅन विकत घेण्याचा क्रियाशील मार्ग सापडत नाही तर सरकारी कचेरीतला माठ पळवून आणणं अधिक सयुक्तिक वाटतं. कारण भाड्याच्या पाण्याला सरकारी पाण्याची सर नाही हेच खरं!

आजवर दडपल्या गेलेल्या आपल्या भावनांना मार्ग देण्यासाठी मग दोघेही आपापल्या स्वप्नरंजनात मश्गूल होतात. बावडेकर आपल्या बॉसच्या मुलीवर प्रेम करू लागतात, तर जावडेकरांना ऑफिसातल्याच नलावडेबाईंमध्ये आपली प्रेयसी सापडते, 'बेगम बर्वे' हे या दोघांच्या समाईक रूमच्या जिन्याखालीच राहाणारं पात्र. एके काळी नाटकात दुय्यम स्त्रीपार्ट करणाऱ्या या पुरुषाच्या अंगी अजूनही बराच स्त्रीपणा उरलेला आहे. तो असाच जिन्याखाली शामराव नामक कुणा जुन्या नाटकातल्या खलनायकाबरोबर राहातो आणि उदबत्त्या विकून तो आपल्या या कुटुंबाचा चरितार्थ चालवतो.

एका अद्भुत गुरुवारी ह्या सगळया नाटकाला वेगळंच वळण मिळतं. दाराशी आलेल्या बर्वेला जावडेकर अचानक आपलीच प्रेयसी (नलावडेबाई) समजतात आणि मग पुढं घडतं ते सगळंच अगदी अॅब्सर्ड. जावडेकर रातोरात या नलावडेबाईंशी (म्हणजेच बेगम बर्वे या पुरुषाशी) लग्न करतात आणि त्यांचा सुखी संसार चालू होतो. पुढे बेगम बर्वेला चक्क दिवस जातात आणि या गोड बातमीने जावडेकरांना हर्षवायू होण्याची पाळी येते. वरवर विसंगत आणि विकृत वाटणाऱ्या या घटनांमधून मला दिसला तो पराकोटीचा षंढपणा. बेगम बर्वेलाच आपली बायको म्हणून मानणाऱ्या जावडेकरांचा षंढपणा. 'केवळ आपणही लग्न करू शकतो' या कल्पनेतच ते मश्गूल आहेत. या कल्पनेव्यतिरिक्त शारीरिक सुख प्रत्यक्ष उपभोगण्याची कुवत तर त्यांच्यात उरलेली नाहीच; पण भेकडपणा तर इतका की, बेगम बर्वेला दिवस गेले हे कळल्यावर 'असे कसे?' असा

साधा प्रश्नही त्यांच्या मनाला शिवत नाही. त्यासाठी शामरावालाच आपल्या खलनायकाच्या रूपात पुढे यावे लागते आणि तो सगळ्या स्वप्नरंजनाला अखेर सुरुंग लावतो. जावडेकरांचा षंढपणा इतर कुठल्याच वस्तुनिष्ठ कथानकातून इतक्या प्रभावी आणि ठोसपणे मांडता आला नसता.

जावडेकरांच्या 'सरकारी' जीवनातील हिरवळी दोनच. एक– त्यांचे आपल्या पत्नीवरील (बेगम बर्वेवरील) प्रेम आणि दोन– त्यांचे आपल्या मित्रावरील (बावडेकर) प्रेम. पैकी बेगम बर्वेच्या प्रेमाचा असा विचका होतो आणि मित्रप्रेमाचाही पोकळपणा अगदी अनपेक्षितपणे त्यांच्यासमोर उभा राहातो. जावडेकर–बावडेकर या दोघा जिवलग मित्रांपैकी कुणा तरी एकाची नोकरी जाणार असा एक खोटा व जी. आर. आणून शामरावच हेही काम उरकतो. आपली नोकरी जाणार या एका कल्पनेनेच बावडेकर इतके पिसाळतात की ते आपले मित्रप्रेम वगैरे पुरते विसरून, जावडेकरांच्या बायकोवरच अनैतिकतेचा आरोप करतात. अगदी धनुष्यबाण हातात घेऊन जणू जावडेकरांच्या अब्रूच्या चिंधड्या उडवण्याचा प्रयत्न करतात. अखेर हाही जी. आर. चुकीचा असल्याचे शुभवर्तमान घेऊन खलनायक शामराव येतो तेव्हा दोघाही मित्रांना नोकरी टिकल्याचे समाधान मिळते खरे; पण आपापली भेसूर रूपे अगदी नागड्या स्वरूपात पाहाण्याची किंमत त्यांना त्यासाठी द्यावी लागते. एका पुरुषाबरोबर संसार थाटणारे जावडेकर आणि एका खोट्या जी. आर. साठी आपल्या मित्राच्या अब्रूचे धिंडवडे काढणारे बावडेकर! या विलक्षण अनुभवाने दोघेही इतके हादरून जातात की, जणू त्यांना परस्परांचा अगदी नव्यानेच परिचय होतो. नाटकाचा शेवट होतो तेव्हा ते दोघेही परस्परांचा परिचयच करून घेत असतात.

'बेगम बर्वे'चा प्रयोग पाहिल्यानंतर मला जाणवलेलं नाटकाचं रूप हे असं होतं; पण यात 'बेगम बर्वे'पेक्षा देखील जावडेकर-बावडेकरांची वेदनाच मला प्रकर्षाने जाणवली. बेगम बर्वेचं वैफल्य मात्र तितकंसं जाणवेना. त्यासाठी नाटककार सतीश आळेकर यांची भेट घेण्याचं मनात आलं. याखेरीज नाटकातील इतरही काही कच्च्या दुव्यांबाबत त्यांचा अभिप्राय या निमित्तानं घेता येण्याजोगा होता. त्यांच्याबरोबरील चर्चेचा गोषवारा पुढे देत आहेच, त्याआधी या नाट्यप्रकाराविषयी काही विचार मांडावेसे वाटतात.

## स्वप्नरंजनातून आशयनिर्मिती

तंत्रदृष्ट्या आळेकरांच्या नाटकाचे स्वरूप सकृद्दर्शनी खूपच विचकवणारे आणि धक्कादायक असते. कुठल्याही नाटकातून एक ढोपट गोष्ट शोधण्याची सवय झालेल्या रसिकाला हा प्रकार असह्य होतो. कारण अशी सरळसोट गोष्ट या नाटकाला नाहीच. संपूर्ण नाटक घडते ते स्वप्नरंजनाच्याच विविध पातळ्यांवर. 'बेगम बर्वे'मधली सगळीच पात्रे अशीच आपल्या स्वप्नरंजनात मग्न झालेली आहेत; पण हे नाटक कुणाच्याच एकाच्या स्वप्नरंजनाचे चित्रण नाही, तर तो या सर्व स्वप्नरंजनाच्या 'बेरिज' परिणामाचा नाटककाराने काढलेला आलेख आहे. त्यामुळे या नाटकातील कुठल्याही एका घटनेला अनेक परिमाणे लाभतात. त्यामुळे बेगम बर्वे जावडेकरांशी बोलताना नाटककंपनीच्या मालकाविषयी बोलतो तेव्हा जावडेकरांना त्यांच्या ऑफिसचे साहेब त्या जागी जाणवतात. कारण कंपनीचा मालक आणि साहेब यांचे बेगम बर्वे आणि जावडेकर (अनुक्रमे) यांच्या जीवनातील स्थान समांतर असते. तसेच बर्व्यांच्या कंपनीचा नोकर शामराव जावडेकरांच्या जीवनात मात्र साहेबांचा शिपाई बनून येतो. या तंत्रामुळेच सकृद्दर्शनी जाणवणारी विसंगती निर्माण होते आणि नाटकातून साधा, सरळ अर्थ काढणेदेखील दुष्कर होते; पण यातून एक अतिशय वेगळाच परिणामही साधला जातो. एकाच घटनेवरील विविध व्यक्तींच्या प्रतिक्रिया एकाच वेळी विचित्र होऊ शकतात आणि एकाच कुंचल्यातून एक बहुरंगी चित्र साकारते. कुठल्याही अनुभवाची अभिव्यक्ती या तंत्रामुळे अतिशय नेमकी (direct) होते.

## अभिव्यक्तीवर मर्यादा

अभिव्यक्तीच्या या तंत्रामुळे आशयाचा ठोसपणा वाढत नसला तरी आशयाची खोली मात्र गवसत नाही. 'बेगम बर्वे'मधली सगळीच व्यक्तिमत्त्वे या प्रतीकात्मतेमुळेच अतिशय संकुचित वाटतात. जावडेकरांचे पूर्ण विश्वच मुळी त्यांची नोकरी, बावडेबाई, बर्वे, साहेबांचा शिपाई, माठ, गुरुदेव दत्त, उदबत्ती यात मर्यादित झालेले दिसते. नाटकातल्या प्रत्येक पात्राच्या मर्यादा अशाच मोजून दाखविता येतील. परिणामी नाटकातल्या कुठल्याही अनुभवाचे चित्रण याच चौकटीत व्हावे लागते. त्यामुळे कुठल्याही अनुभवाच्या सूक्ष्म छटांचा आविष्कार शक्य होत नाही. त्यामुळेच खूप आनंद झाल्यावरही जावडेकर 'दत्ता, दत्तिटल्या' इतपतच प्रतिक्रिया व्यक्त करू शकतात. पुढे 'भारतमाता की जय' म्हणल्याशिवाय त्यांना कुठलाच पर्याय उरत नाही. यातूनही जावडेकरांचे मानसिक दौर्बल्य दिसत असले तरी त्यांच्या आनंदाची तीव्रता दिसत नाही.

या मर्यादित अनुभवविश्वामुळे संपूर्ण नाटकात एक तोचतोपणा जाणवत राहतो आणि पहिल्या अंकानंतर एक प्रकारचे शैथिल्य येते. अखेरच्या काही प्रवेशांमध्ये येणारी गती वगळता दुसऱ्या अंकात हा संथपणा जाणवतो. या सर्व भागात तुरळक बौद्धिक चकमकाटाखेरीज इतर काही दिसत नाही. या सर्व बाबतीत मात्र तंत्रापेक्षादेखील नाटककार म्हणून आळेकरांच्याच मर्यादा जाणवतात.

प्रत्यक्ष प्रयोगाच्या इतर तांत्रिक बाबी मात्र खूपच समाधानकारक आहेत. जावडेकरांच्या भूमिकेत स्वतः सतीश आळेकर अफलातून काम करतात. इतरही कामे टी. ए. च्या परंपरेला साजेशी आहेत. अपवाद फक्त रमेश मेढेकरांचा. त्यांच्या भूमिकेत मात्र सुधारणेला खूपच वाव आहे. चंद्रकांत काळे यांनी गायनाची बाजूही भक्कम सांभाळली आहे. त्यांचा गायनाच्या वेळचा कृत्रिम, लाडिक अभिनय, त्या वेळी आळेकरांचे मान लटकावून ताल देत उभे राहाणे, या सगळ्याचाच खास उल्लेख करावासा वाटतो.

नाटकाच्या तंत्राबद्दल अशीच एक बारीकशी शंका. बेगम बर्वेच्या डोहाळजेवणासाठी रंगमंचावर वरून खाली झोपाळा उतरवण्यामागचा हेतू समजू शकत नाही. प्रेक्षकांना धक्का देण्याचा तर हा सोस नाही? कारण आळेकरांच्या यापूर्वीच्या नाटकातही असेच प्रकार आढळतात आणि त्या वेळीही अशा चमत्कारांच्या सयुक्तिकतेविषयी हीच शंका येते. असा एखादा बारीकसा मुद्दा

वगळता दिग्दर्शक म्हणूनही आळेकरांची कामगिरी सारख्याच तोलाची वाटते.

याच नाटकाच्या संदर्भात श्री. सतीश आळेकर यांच्याशी चर्चा केली ती पुढे देत आहे—

**प्रश्न :** 'बेगम बर्वे' हे नाटक आपल्या आतापर्यंतच्या नाटकांपेक्षा तंत्रदृष्ट्या पूर्ण वेगळे आहे की ते त्याच तंत्राचा अधिक परिपूर्ण आणि developed असा आविष्कार आहे ?

**उत्तर :** आजवर मी आपल्या पारंपारिक 'तमाशा' तंत्राचा उपयोग नाटकात केलेला आहे. कारण मला नाटकाचे विषय त्याच्या मांडणीसकटच दिसतात. अर्थात् हे सगळे नंतरचे विचार आहेत. मला लिहिताना 'रंगमंचावरचे' नाटक दिसत असते.

'बेगम बर्वे' मधे आपल्या जुन्या मराठी संगीत नाटकांच्या संहितेसकट इतर बऱ्याच गोष्टींचा उपयोग केला आहे. जुन्या अनेक नाटकांतील वैशिष्ट्ये वेगळ्या अर्थाने ह्या नाटकात आलेली आढळतील.

उदा० : सर्व काही बेतलेले व ओबड-धोबड वाटणे, योगायोग, पडद्यांचा वापर, स्टेजच्या खोलीचा वापर न करणे, फूटलाइट्सला समांतर अशी पात्रांची हालचाल असणे, खूप शब्दांची पल्लेदार वाक्ये, ऑर्गनचा आवाज, गाणी, दोघांचे बोलणे नेमके तिसऱ्याने ऐकणे किंवा ऐकले अशी भीती निर्माण होणे, स्वगत म्हणणे, नाटकाची सुरवात नांदीने होऊन शेवट प्रार्थनेने होणे, नटी—सूत्रधाराचा प्रवेश इ० नाटकात वरील सर्व गोष्टींचा उपयोग कमी-अधिक प्रमाणात केला आहे.

**प्रश्न :** हे नाटक आहे तरी कुणाचे ? 'बेगम बर्वे'चे की जावडेकर/बावडेकरांचे ?

**उत्तर :** नाटकात चार भिन्न व्यक्तिमत्त्वाची पात्रे आहेत. ह्या व्यक्तिमत्त्वांचा जुनाटपणा, खुजेपणा नाटकातून सतत जाणवतो. चारही पात्रे स्वप्नरंजनात रमणारी आहेत. स्वप्नरंजनाच्या विविध पातळ्यांनी जोडलेल्या ह्या चार व्यक्तिमत्त्वांच्या परस्पर संबंधाचे हे नाटक आहे. स्वप्नरंजनास कारणीभूत होणारा सर्वांत महत्त्वाचा दुवा म्हणजे बर्वे — म्हणून नाटकाचे नाव 'बेगम बर्वे' शेवटी नाटक हे खऱ्या अर्थाने नाटककाराचेच असते.

**प्रश्न :** अखेर बर्वे शामरावजवळ राहण्यामागचे आकर्षण कोणते ? फक्त शारीरिक सुख हेच की आणखीही काही ?

**उत्तर :** शामरावचे बर्वेवर अवलंबून असणे ही त्याची शारीरिक गरज आहे. कारण तो लंगडा आहे. त्याचबरोबर टांगा टाकून सतत कुणाला तरी ताब्यात ठेवण्याची सवय त्याला जडली आहे. प्रवृत्ती खलनायकी आहे.

पण बर्वेच्या मनाची जडण-घडणच अशी झाली आहे की, पुरुषी मनात सतत 'स्त्रीला' जोपासले गेले. ह्या 'बायकी'पणाने त्याच्या अंतर्मनाचा इतका ताबा घेतला की आपले स्त्रीला जोपासणे ही त्याची नैसर्गिक गरज बनली. आपण सतत अबला बनून कुणाच्या तरी स्वाधीन असावे ही भावना बनली व ती कायमची झाली. शामराव बर्वे उदबत्त्या विकू लागले.

शामरावाचे शारीरिकदृष्ट्या अवलंबून असणे व बर्वेचे मानसिक गरज म्हणून अवलंबून असणे ह्या गोष्टी न बदलणाऱ्या आहेत, ह्याची जाणीव नाटकाच्या शेवटी दोघांना होते आणि पुढील संवाद होतो—

**शामराव :** चल ! बेगम जिन्याखाली. पुढे भरायचे राहिलेत.

**बर्वे :** चला ! अखेर पडद्यामागचा अंधारच आमचा !

अशी जाणीव दोघांना झाल्यावर दोघे आपल्या जिन्याखालच्या विश्वात परत जातात.

जावडेकर / बावडेकर, शामराव / बर्वे ह्यांना नाटकाच्या शेवटाला असे 'साक्षात्कार' होतात होताच नाटक संपते 'समलिंगी संभोग' हा या नाटकाचा विषय नाही. म्हणूनच शामराव / बर्वे ह्यांचे समलिंगी संबंध होतो किंवा नाही हा माझ्या दृष्टीने अत्यंत गौण मुद्दा आहे. □

---

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............

# मॅक्झिम गॉर्की

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

---

परिस्थितीची कल्पना दिली होती. पत्रात गोविंदरावांनी कळविले होते–

'अमळथे, तालुका सिदखेडे, जि. धुळे येथील गरिबांच्या पिकाची जी नुकसानी झाली त्याबद्दल त्यांना नुकसानभरपाई मिळावी असे आपल्या उपस्थितीत ठरले होते. आता नुकसानभरपाई देण्यात वेळ होत आहे. मुदत संपली आहे म्हणून आपण त्या गरिबांना नुकसानभरपाई मिळेल अशी व्यवस्था लगेच करावी अशी विनंती मी समक्ष भेटून आपल्याला काल रात्री केली व आपण ती मान्य केली. त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

काल रात्री आपल्याला मी खालील गोष्टी अमळथ्याबाबत सांगितल्या आहेत.

१. अमळथ्याच्या दलित, आदिवासी व कोळी लोकांनी गावच्या सरकारी जमिनीत जी शेती केली होती ती पीक हाती येण्यापूर्वीच गावच्या पुढारी मंडळींनी नाश करून टाकली. आपल्या उपस्थितीत झालेल्या सभेत त्या गरिबांना नुकसानभरपाई देण्याचे ठरले. एक महिन्यात ती नुकसानभरपाई मिळणार होती. ती मिळाली नाही. ती लगेच मिळावी.

२. सरकारी जमीन जाहीर झालेल्या धोरणाप्रमाणे लोकांना देण्यात यावी.

३. आज गावच्या गरिबांना कामाला बोलावले जात नाही. त्यांना रोजगार हमीतून काम मिळण्याची व्यवस्था लगेच व्हावी.

वरीलबाबतीत आपण कलेक्टर व तहसीलदारांना ता. २१ ला बोलावले आहे व त्यांना आवश्यक त्या सूचना देतो असे आपण सांगितले. त्याप्रमाणे व्यवस्था व्हावी. काय झाले ते कळवावे.'

माहितीसाठी वरील पत्राची प्रत गोविंदरावांनी जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडेही पाठवली.

त्याप्रमाणे हालचाल होऊन मोर्चा झाल्यावर दुसऱ्या दिवशी मुंबईला उत्तमरावांच्या घरी व कार्यालयात अमळथ्याचे दलित प्रतिनिधी व निवडक जमीनदार मंडळी यांच्यात वाटाघाटी झाल्या; पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. जमीनदार मंडळींनी कराराला अनेक फाटे फोडले. ज्याचे जितके नुकसान झाले त्याला तितके नुकसान जमीनदार मंडळींकडून–नुकसान करणाऱ्यांकडून भरून मिळणे, हा १० फेब्रुवारीला अमळथे पंचायतीत उत्तमरावांच्या साक्षीने झालेल्या कराराचा मुख्य आशय. तोच आता नाकारला–बदलला जात होता. नुकसानभरपाई मिळण्यास पात्र-अपात्र कोण आहेत याची चौकशी सुरू झाली. नुकसान झाले त्यापैकी दलित कोण, बिगरदलित कोण, कुणाच्या इतर ठिकाणी जमिनी आहेत, कुणाच्या नाहीत वगैरे मुद्दे उपस्थित केले गेले. वास्तविक हे सर्व गैरलागू होते; पण त्यातच बैठकीचा सर्व वेळ खर्ची पडला. अशा चाळण्या लावल्यामुळे नुकसानभरपाईचा अंदाज एकदमच खाली घसरला. अनधिकृत सरकारी अंदाजाप्रमाणे सुमारे ४०० ते ४२५ पोती धान्याचे नुकसान झालेले आहे. जमीनदार मंडळींनी जेमतेम ८८ पोती धान्य नुकसानभरपाईदाखल जमवून देण्याची तयारी दाखवली. कडब्याचे कलम तर जमीनदारांनी उडवूनच लावले. दलित प्रतिनिधी वैतागले व त्यांनी जमीनदारांनी देऊ केलेले ८८ पोती धान्य तिथल्या तिथे जमिनदारांनाच 'दान' करून टाकले. इतकेच काय, वाटाघाटीसाठी पुन्हा मुंबईला जायचेसुद्धा नाही असाही त्यांचा निर्णय झाला. झोपडू दगा सोनावणे हे या बाबतीत विशेष दुखावलेले दिसले. भाड्यापुरते पैसे प्रथम गोळा करणे हाच व्याप. तो कर्ज काढून करायचा, रात्रीचे जागरण करून मुंबई गाठायची, तेथे जेवाखायचे, राहायचे हाल करून घ्यायचे आणि सचिवालय ते मंत्र्यांचा बंगला या दरम्यान सारखी पळापळ करायची, पळापळ करूनही तास न् तास ताटकळत बसायचे, हा सर्व प्रकार कोणत्याही स्वाभिमानी माणसाला चीड आणणाराच आहे. शिवाय ही सगळी पैशाची, वेळेची, तब्येतीची नासाडी करून घेऊन दलित प्रतिनिधींच्या पदरात भ्रमाच्या भोपळ्याशिवाय दुसरे काय पडले ? सगळेच दलित प्रतिनिधी या अनुभवामुळे मुंबईभेटीला वैतागलेले दिसले.

प्रश्न आहे उत्तमरावांचा. त्यांच्या उपस्थितीत झालेला करार जमीनदार मंडळीकडून तंतोतंत अमलात आणवून घेण्याची जबाबदारी ते स्वीकारणार की टाळणार ? त्यांनी जमीनदार मंडळींना कराराला फाटे फोडू देण्यास परवानगी का द्यावी ? जमीनदार मंडळी असा करार करायला, नुकसानभरपाई द्यायला मुळातच तयार नव्हती. त्यांना योग्य ती समज देऊन उत्तमरावांनी नुकसानभरपाई द्यायला तयार केले. यामुळे उत्तमरावांना दलितांची सहानुभूती लाभली; पण नंतरची टाळाटाळ व दिरंगाई पाहून ही सहानुभूती संपुष्टात येण्याची शक्यता नाकारून कसे चालेल ? शिवाय धुळे जिल्ह्यातील व इतर ठिकाणचे पक्षातील व पक्षाबाहेरील राजकीय प्रतिस्पर्धी या घटनेचा वेडावाकडा कसा उपयोग करून घेतील, याचाही नेम नाही. नैतिक आणि राजकीय अशा दोन्ही पातळींवर उत्तमरावांची कसोटी पाहणारा हा प्रसंग आहे व फार काळ हा प्रसंग लांबणे धोक्याचेही आहे. करारावर उत्तमरावांच्या वतीने धुळे जिल्हा जनता पक्षाचे एक नेते श्री. दशरथ पाटील यांची सही आहे. आम्ही त्यांना भेटलो. नुकसानभरपाई दलितांना ठरल्याप्रमाणे मिळाली पाहिजे असा त्यांचाही आग्रह दिसला. मग शासकीय पातळीवरच टाळाटाळ, विलंब का सुरू आहे ? पत्रकार परिषदेत उत्तमरावांनी सांगितले की, ते अधिकाऱ्यांच्या अहवालाची वाट पाहात आहेत. अहवाल आल्यावर कारवाई होईल. उत्तमरावांच्या डोळ्यासमोर सर्व प्रकरण घडलेले आहे. त्यांनी समक्ष गावाला भेट देऊन सर्व माहिती घेतलेली आहे. यातील कराराची मुख्य घटना त्यांच्या पुढाकारानेच घडून आलेली आहे. मग आता कुठल्या अहवालाची ते कशासाठी वाट पाहात आहेत ? दलितांनी या वाट पाहण्याचा, अहवाल येण्याचा अर्थ काही दुसरा-तिसराच लावला तर यापुढे त्यांना तरी दोष कसा देता येईल ? का यात आता नवीन काही राजकीय रागरंग मिसळत चालले आहेत ?

## राजकीय रागरंग

अमळथ्याला पोलीस पाटलाच्या घरी आम्ही बोलत बसलो होतो. पोलीसपाटील यांना या प्रकरणी निलंबित केले गेलेले आहे. जमीनदार मंडळींनी केलेल्या अत्याचाराची, पिकाच्या लुटालुटीची

हकीकत त्यांनी वेळेवर वरिष्ठांना कळविण्यात हलगर्जी केली, म्हणून ही शासकीय कारवाई तडकाफडकी करण्यात आली, असे कळले; पण वस्तुस्थिती वेगळी असावी. दलितांच्या बाजूने हे पोलीस पाटील सुरुवातीला मध्यस्थी करीत होते. दलितांनाही त्यांची मदत होत असे. यांचा आणखी एक अपराध म्हणजे यांचे बंधू गावातल्या विरुद्ध पार्टीचे आहेत व सध्या या पार्टीचे इंदिरा कॉंग्रेसशी सख्य आहे, हा. या भागात असे चित्र बऱ्याच ठिकाणी आढळते. जनता पक्षावर नाराज असलेले सरळ इंदिरा कॉंग्रेसला जवळ करतात. अमळथ्यालाही चित्र वेगळे नाही. जमीनदारांच्याच दोन फळ्या; पण एक जनताकडे व दुसरी इंदिरा कॉंग्रेसकडे. यांची गावातली नावे सरपंच पार्टी आणि पोलिस पाटील यांची पार्टी. आम्हाला पोलीस पाटील भेटले नाहीत. ते बाहेर गेलेले होते. त्यांचे बंधू भेटले. ते नुकतेच इंदिरा कॉंग्रेसच्या 'जेलभरो' आंदोलनात सहभागी होऊन सुटून आले आहेत. आपला पोलीस पाटील भावाचा निष्कारण राजकीय बळी दिला गेला आहे असे त्यांचे मत आहे व तेथे उपस्थित असलेल्या सर्वांनी या मताला पुष्टीही दिली. ही सगळीच मंडळी व त्यांची गावातली साथीदार पार्टी नुकसानभरपाईच्या प्रश्नावर दलितांच्या बाजूने आज उभी राहायला तयार आहे. त्यांचे म्हणणे झाल्या प्रकाराबद्दल सर्व जमीनदारवर्गाला सरसकट दोषी धरणे चूक आहे. फक्त जयसिंगराव पाटलांच्या गटाने म्हणजे सरपंच पार्टीने हा अत्याचार घडवून आणला, पिके लुटून आणली. याच गटाकडून सर्व नुकसानभरपाई वसूल केली गेली पाहिजे. तहसीलदाराने या मंडळींनाही नुकसानभरपाईबाबत चाचपडून पाहिले; पण या मंडळींनी दाद दिली नाही. मी त्यांना विचारले, 'तुम्ही हे जाहीरसभेत सांगाल का? किती लोक तुमच्या मताचे असतील?' त्यांनी होकार दिला व संख्याही खूप सांगितली. मी त्यांना पुढे विचारले, 'तुम्ही दलितांना काम का नाकारले?' 'जयसिंगराव गटाने नाकारले असेल. आम्ही तर उद्या सुद्धा काम देऊ!' असे या मंडळींनी सांगितले. शहानिशा करून घेण्याइतका वेळ नव्हता पण गोविंदरावांच्या डोक्यावरचे एक ओझे या आश्वासनामुळे थोडे हलके होणार होते. दलितमंडळींना काम मिळवून देण्यासाठी त्यांना आता रोजगारमंत्र्यांचे पाय धरावे लागणार नव्हते. एकदा तेही करून झाले होते; पण सात मैलांवर काम काढू असे सांगितले गेले. एवढ्या लांबवर दलितमंडळी अजून जायला तयार होत नव्हती. उधार-उसनवारी करून अद्याप दिवस ढकलता येत होता; पण आता गावातच काम मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती.

समजा, असे काम मिळाले, चालू संघर्षात ही मंडळी दलितांच्या बाजूने उभी राहिली तर तयार होणारे राजकीय चित्र कसे असेल?

□

आम्ही बसलो होतो, गप्पा सुरू होत्या, तेवढ्यात जळगावचे वृत्तपत्र आले. अमळथे प्रकरणी जळगावला संघर्ष वाहिनीच्या तरुणांनी उत्तमरावांना अडवून काही प्रश्न विचारल्याची बातमी पहिल्या पानावर ठळक अक्षरात या वृत्तपत्राने दिली होती. या तरुणांचे कौतुक होत होते व बातमीही मोठ्या चवीने वाचली जात होती.

राजकारणाचे असे रागरंग या अमळथा प्रकरणात मिसळू लागलेले आहेत.

□

अमळथ्याहून निघताना मी सवर्ण समाजापैकी काही शेतकऱ्यांना विचारले: 'हा प्रकार यंदाच का व्हावा? जमिनी तर गेली वीस वर्षे दलित-हरिजन यांच्याकडे होत्या. अशी उभी पिके तुडवून-लुटून नेली असे पूर्वी कधी घडले नाही. मग यंदाच हा हल्ला का?' या शेतकऱ्यांनी दिलेले उत्तर या नव्या संघर्षावर चांगलाच प्रकाश टाकणारे आहे. ते म्हणाले: यंदा पीक जबरदस्त आले होते. मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतातही असे जोरदार पीक इतक्या वर्षात आलेले कुणी पाहिले नव्हते. पीक पाहून डोळे फाटून जात होते. नदीकाठच्या जमिनी. शिवाय यंदा गाळ साठून आला. त्यामुळे हा चमत्कार घडून आला असावा. हेवा वाटणे, मत्सर जागा होणे अगदी स्वाभाविक होते. बडे जमीनदार आतून जळत होते. एवढे पीक हरिजनांच्या-दलितांच्या घरात गेले तर ते आणखीनच माजल्याशिवाय कसे राहतील? शिवाय वर्षभर ते कोणाकडे कामालाही येणार नाहीत. हा व्यावहारिक हिशोब आणि हेवा-मत्सर यामुळे परंपरागत पुढारपण केलेल्या पाटीलमंडळींची डोकी भणाणून गेली आणि त्यांनी पिके उद्ध्वस्त करून आपली आग शांत करून घेतली. एका दगडात दोन पक्षी मारले.'

□

बेलछीला माणसांची हत्या झाली.
अमळथ्याला पिकांची नासधूस-लूट झाली.
आविष्कार वेगळे.
मनोवृत्ती एकच.

## लोककथा ७९

अमळथ्यातील दलित रूढ अर्थाने दलित नाहीत. त्यातील काही छोटे जमीनदार आहेत व छोट्या-मोठ्यांची ही तेढ आहे. उघडच आहे, जातीपातींच्या भिंती कोसळतील व अमळथ्यातील सगळे छोटे, गरीब व मध्यम गरीब एकत्र येऊन बड्यांना आव्हान देतील. ग्रामीण भागात ठिकठिकाणी असे नवे चित्र उदयास येत आहे. यातून बेलछीचे हत्याकांड उद्भवले, कांझावालासारखी प्रकरणे निर्माण झाली. चित्र आता 'लोककथा ७८' प्रमाणे साधे-सरळ, एकतर्फी अन्याय—अत्याचाराचे, दडपशाहीचे राहिलेले नाही. त्यामुळे 'लोककथा ७९' वेगळी आहे. अमळथ्याच्याच दलितांची नवी मागणी काय आहे? 'ठीक आहे. आमच्यापैकी काहीजणांनी अतिक्रमणे केली हे खरे असेल; पण गावातल्या इतरांनी केलेल्या अतिक्रमणांचे काय? त्यांचीही चौकशी करा आणि सगळ्यांना समान कायदा-न्याय लावा.' असे दलितमंडळी आता उघडउघड बोलू लागली आहेत. त्यांनी यासंबंधीची माहितीही जमा केली आहे अनेकांनी खळ्यांसाठी सरकारी जमिनीचा वापर केलेला आहे. दोनजणांची तर पक्की घरे सरकारी मालकीच्या जमिनीत उभी आहेत. 'अनेक वर्षे ही अतिक्रमणे खपवून घेतली गेली. मग दलितांच्या अतिक्रमणांबद्दल गदारोळ कशासाठी?' हा दलितांचा प्रश्न निरुत्तर करणारा आहे. आज अमळथ्यातील दलित फक्त झालेले नुकसान भरून मागत आहेत. उद्या सरकारी जमिनींवर सधन शेतकऱ्यांनी बेकायदा बांधलेल्या घरांवर दलितांनी मोर्चे आणले, ती पाडून टाकण्याचा आग्रह धरला, तर कोणत्या तोंडाने त्यांचा निषेध करणार? आजवर खाली दबलेला समाजस्तर असा वर उठू पाहत आहे, आक्रमक बनत आहे. पूर्वापार पुढारपण केलेला स्तर यामुळे चिडून-संतापून नव्याने वर येणाऱ्या स्तराला धाकदपटशाने पुन्हा खाली दडपू पाहत आहे.

मराठवाड्यात तरी दुसरे काय घडले?

बडे जमीनदार, सवर्णातला वरचा थर 'धडा शिकवण्याच्या' मनःस्थितीत आहे.

दलित व मध्यम गरीब एकत्र येत आहेत.

एक नवा वर्ग-वर्ण-कलह यातून ग्रामीण भागात फैलावू शकतो.

जर परंपरागत आर्थिक—सांस्कृतिक पुढारपण केलेल्या वर्गाने काळाची पावले ओळखून वेळीच सुज्ञपणा दाखवला नाही तर!

अमळथ्याला हा सुज्ञपणा दाखवला जाईल अशी अपेक्षा दलितमंडळी अद्याप तरी बाळगून आहेत. □

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# सुनयना

## आणखी एक चाकोरीचा आरा

'सुनयना' पाहून आल्यापासून आकाशाकडे पाहिल्यानंतर मला आकाश दिसतच नाही, फक्त मने दिसतात. कधी ते मन सुनयनाचे (रामेश्वरी) असते, कधी राजूचे (नासिरुद्दीन शाह) असते, तर कधी डॉ. इंद्रजितचे (विजयेंद्र) असते, एवढाच काय तो फरक. यातील प्रत्येकाचेच मन आभाळाएवढे किंबहुना आभाळापेक्षाही मोठे असल्याचा हा परिणाम आहे. 'सुनयना 'ची कथा सांगितली म्हणजे हे नक्की काय लफडे आहे, ते तुमच्या लक्षात येईल.

राजू नावाचा एक तरुण खेड्यातून मुंबईत येतो. या एकाच वाक्यातून राजू = भोळाभाबडा, खेडवळ तरुण-अर्थातच मुंबईत त्याच्यावर गुदरलेले भयंकर प्रसंग इत्यादी गोष्टी उलगडत जातात. तर अशा या राजूची 'सुनयना' नावाच्या आंधळ्या फुलवालीशी ओळख होते, पहिल्या एक–दोन भेटींनंतर लगच तिच्या 'आँखों की रोशनी' परत मिळवून देण्यासाठी राजू प्रयत्नशील होतो. त्यात त्याला डोळ्यांचा डॉ. इंद्रजित भेटतो. पैशाची खटपट करण्याच्या प्रयत्नात (राजू, त्याला मिळणारे पैसे–हा आणखी एक मोठा किस्सा; लेकिन वो किस्सा बाद में) राजू जेलमध्ये जातो–तब्बल दीड वर्ष. दरम्यानच्या काळात सुनयनाची दृष्टी परत आलेली, डॉ. इंद्रजित हे सुनयनावर बऱ्यापैकी आशिक झालेले. शेवटी ही आभाळाएवढ्या मनाची सुनयना, जी दीड वर्ष राजूची वाट पाहत असते, डॉक्टरला हिरवा सिग्नल देते. आता त्यांची सगाई होणार, तेवढ्यात राजू जेलमधून सुटून येतो. मग राजूची आणि डॉ. इंद्रजितची 'कोणाचे मन मोठे' अशी थोडीशी चढाओढ होऊन राजू व सुनयनाची सगाई होते.

राजूला पैसे मिळण्याचा किस्सा–राजूला असा एक इसम भेटतो, जो दारूच्या नशेत असताना राजूला 'तू माझा मोठा भाऊ' असे म्हणून आपल्या तिजोरीची चावी त्याच्या हातात कोंबतो आणि शुद्धीवर आल्यावर त्याला चोर ठरवतो. असे तीन–चारदा होते.

अशी ही नेहमीच्या अतर्क्य घटनांनी भरलेली 'सुनयना 'ची कथा. संपूर्ण कथेत राजू, त्याचे सुनयनाजवळ येणे, पुन्हा दूर जाणे, पुन्हा जवळ येणे, पुन्हा दूर जाणे आणि या झोक्यांमागची कारणे वगळता 'घडणे' नामक प्रकार काहीही नाही. शिवाय हे लांब जाणे–जवळ येणे प्रकरण इतके चीड आणणारे आहे! कारण सगळीकडे आतापर्यंत 'श्री ४२० 'पासून 'रामपूर का लक्ष्मण 'पर्यंत दाखवविलेले तेच भाबड्या, गावंढळ माणसाचे गबाळग्रंथी उपद्व्याप. पुढेपुढे त्याच्या या उचापतींबद्दल अन् उद्योगांबद्दल सहानुभूती न वाटता आत्यंतिक राग येऊ लागतो. संपूर्ण चित्रपटाचे 'कारण' ठरणारी राजू ही व्यक्तिरेखा याच एकमेव एकसाचीपणामुळे ढेपाळलेली आहे.

शिवाय उगाचच कुठे तरी तिसरा बिंदू निर्माण करून प्रेमाचा त्रिकोण निर्माण करणे आणि त्यातील जे दोन बिंदू सांधले जावेत, अशी भाबड्या प्रेक्षकाची मनोमन इच्छा असते, बरोबर ते बिंदू सांधून टाकून प्रेक्षकाला इच्छापूर्तीचे अपेक्षित समाधान देणे ही नेहमीचीच युक्ती 'सुनयना 'च्या कथेतूनही साधली आहेच. एकदा शेवटापर्यंत संपूर्ण कथा सुज्ञ प्रेक्षकाच्या लक्षात आली की, त्याला वेगवेगळ्या असंबद्ध घटनांच्या डिस्नेलॅंडमध्ये हिंडवून 'आता काय होणार ?'चे बागुलबुवे किती वेळ दाखवीत बसणार ?

संपूर्ण चित्रपटात नासिरुद्दीन शाहने राजूची अत्यंत पडेल भूमिका शक्य तेवढी सावरण्याचा प्रयत्न केला आहे. 'राजश्री प्रॉडक्शन 'च्या आतापर्यंतच्या लौकिकाला साजून त्यांनी अन्य कोणा प्रेम किशन वा सत्यजितची निवड केली असती, तर त्या राजूचे काय झाले असते, याची कल्पनाही करवत नाही. विशेषतः नासिरुद्दीन शाहच्या आतापर्यंतच्या शिवम् (निशांत), भोला (मंथन), सुनील (भूमिका) आणि सर्फराजखान (जुनून) या सर्व भमिकांच्या मालिकेत हा राजू फारच वेगळा आणि सुखद विविधता आणणारा ठरतो. राजूचे भाबडेपण, चांगुलपण, त्याचे सुनयनावरील निरागस प्रेम हे सगळेच आत्यंतिक सहजतेने नासिरुद्दीन शाहने उभे केले आहे. अगदी 'सुनयना, सुनयना' या स्वप्नगीताच्या प्रसंगातही हा राजू राजूच राहतो, झुलपे उडवीत नायिकेभोवती उड्या मारणारा हिरो बनत नाही.

राहता राहिले विजयेंद्र आणि रामेश्वरी. विजयेंद्रच्या वाट्याला पुन्हा एकदा 'चितचोर 'मधलीच भूमिका नाव बदलून आली आहे. आणि संपूर्ण भूमिकेत 'विशेष काही न करणे' एवढेच त्याला करायचे असल्याने त्याचे पडद्यावरील दर्शन असह्य होत नाही. रामेश्वरीलाही उघड्या डोळ्यांनी शून्यात पाहणे व न बोलता खाली पाहत राहणे एवढेच काम आहे. ( या चित्रपटाचे चित्रीकरण चालू असताना तिला काही तरी अपघात होऊन तिचा डावा डोळा दुखावला होता; त्यामुळे 'सुनयना, सुनयना' या स्वप्नगीताच्या वेळी तिचे सर्व शॉट एक तर डावा डोळा झाकला जाईल अशा रीतीने वा लांबून घेतलेले आहेत; तरीही कधीमधी जेव्हा कॅमेरा डोळ्यांवर येऊन थांबतो, तेव्हा डाव्या डोळ्यातील दोष जाणवतोच. नेमका हा दोष स्वप्नगीतासारख्या नाजूक जागीच जाणवावा, हे फारच खटकले. असो. त्याबाबतीत कोणालाच जबाबदार धरता येत नाही. )

चित्रपटाचे गीतकार व संगीतकार आहेत रवींद्र जैन. चित्रपटातील 'सुनयना, इन बहारों को तुम देखो और मैं तुम्हें देखते हुए देखूं' आणि 'मेघा, ओ रे मेघा' ही दोन गीते अतिशय गोड आहेत.

प्रेक्षकांच्या मनातील हळुवार भाबडेपणाला कुरवाळणाऱ्या राजश्री प्रॉडक्शनच्या चाकोरीतील हा आणखी एक आरा.